**प्रास्ताविक:** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 13/02/2011 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 57 अन्वये Vistaas Digital Media Limited., Mumbai यांना मोबाईलवर ऑनलाईन दर्शन सुविधा श्री साईभक्तांचे सेवेकामी तीन वर्षाकरीता सुरु करणेस मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार त्यांना दिनांक 07/03/2011 रोजी कार्यादेश देण्यात आलेला होता. श्रींचे मोबाईलवरील ऑनलाईन दर्शन सुविधा पुरविणेस Vistaas Digital Media Private Limited यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दिनांक 21/03/2014 अखेर संपुष्टात आली असल्याने निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सदर सुविधा कार्यादेशातील तिसऱ्या वर्षाच्या दरानुसार चालु ठेवणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 05/06/2014 रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर पुढील कालावधीकरीता जी उच्चत्तम रॉयल्टी ठरेल तो दर Vistaas Digital Media Private Limited यांना रॉयल्टी स्वरुपात संस्थानला द्यावा लागेल, या अटीवर श्रींचे मोबाईलवर लाईव्ह दर्शन सुविधा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत Vistaas Digital Media Private Limited यांचेमार्फत चालु ठेवणेत यावी व त्यांना लेखी कळविणेत यावे, असे ठरले. त्यानुसार संबंधीत कंपनीस दिनांक 06/06/2014 रोजीचे ई-मेल व्दारे कळविण्यात आले असुन त्यांनी सदर दर देणेस दिनांक 06/06/2014 चे ई-मेलव्दारे व दिनांक 09/09/2014 रोजीचे ई-मेल/पत्राव्दारे तयारी दर्शविली आहे.

तरी मोबाईलवरील लाईव्ह दर्शन सुविधेकामी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही होणेकामी विविध पुरवठाधारकांकडुन पुढील तीन वर्षाकरीता दर निश्चित करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर (www.sai.org.in) दि.03/09/2014 ते दि.08/10/2014 या कालावधीत ई-निविदा मागविणेकामी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या पुरवठाधारकांच्या ई-निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडण्यात येऊन त्यातील उच्चत्तम देणगी धारकास पुढील तीन वर्षाकरीता कार्यादेश देता येईल.

**मागणी:** मोबाईलवरील लाईव्ह दर्शन सुविधेकामी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही होणेकामी विविध पुरवठाधारकांकडुन पुढील तीन वर्षाकरीता दर निश्चित करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर (www.sai.org.in) दि.03/09/2014 ते दि.08/10/2014 या कालावधीत ई-निविदा मागविणेकामी

जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या पुरवठाधारकांच्या ई-निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडण्यात येऊन त्यातील उच्चत्तम देणगी धारकास पुढील तीन वर्षाकरीता कार्यादेश देता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** तांत्रिक, आर्थिक व कायदेशीर.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** मोबाईलवरील लाईव्ह दर्शन सुविधेकामी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही होणेकामी विविध पुरवठाधारकांकडुन पुढील तीन वर्षाकरीता दर निश्चित करणेकामी पुरवठा धारकांकडुन प्राप्त झालेल्या ई-निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडण्यात येऊन त्यातील उच्चत्तम देणगी धारकास पुढील तीन वर्षाकरीता कार्यादेश देण्यासाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.८८९** **मोबाईलवरील ऑनलाईन दर्शन सुविधा पुरविणेकामी एकही ई-निविदा प्राप्त झाली नाही. मात्र संस्थानचे आवक विभागामार्फत दोन निविदा प्राप्त झालेल्या होत्या.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आवक विभागामार्फत प्राप्त झालेल्या दोन्हीही निविदा रद्द करणेत येऊन, प्रस्तावितकामी फेर ई-निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५** **साईधर्मशाळा येथील डॉरमिटरी हॉल्सकरीता सिंगल बेडस खरेदीकामी निम्नतम दराचे निविदासादरकर्ते यांचेशी अंतिम दराविषयी चर्चा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद :-**

अधिनियमाचे कलम-२१ मधील पोटकलम (१) च्या खंड (त्र) अन्वये भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :-**

| अ.नं. | निर्णय क्र. व दिनांक | झालेला निर्णय |
|---|---|---|
| ०१ | ३६४, दि.२८/०४/२०१२ | यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साईआश्रम प्रकल्पातील भाग-०२ येथील हॉलसाठी कॉटस् खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात, याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,८५,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. |
| ०२ | ९६३, | निविदा सादरकर्त्यांनी सादर केलेल्या कॉटच्या नमुन्यांची |

| | | |
|---|---|---|
| | दि.०८/१२/२०१२ | समितीने पाहणीकेली. यानंतर चर्चा होऊन, खरेदी करावयाच्या कॉटचा वापर हा साई आश्रम प्रकल्पाचे भाग-०२ येथील डॉरमेटरी हॉल्समध्ये करावयाचा असल्याने ते मजबुत होण्याचे दृष्टीने सदर कॉटसचे डिझाईन सुधारीत करुन त्यानुसार निविदासादरकर्त्यांकडून एक नमुना आगोदर तयार करुन घ्यावा व सदरचे नमुने पाहून अंतिम निर्णय घेण्यात यावा, असे ठरले. |
| ०३ | ७१८,<br>दि.०८/१०/२०१३ | यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम प्रकल्पाचे भाग-०२ येथील हॉलसाठी एम.एस. सिंगल बेडस् खरेदी करणेसाठी पुरवठाधारकांकडून बेडसचे नमुने मागविणेत यावे असे ठरले. |
| ०४ | ९४२,<br>दि.१३/१२/२०१३ | यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भाग-०२ येथील हॉलसाठी बनविण्यात आलेल्या एम.एस. सिंगल बेडेचे नमुन्यांची मा. कार्यकारी अधिकारी यांनी पाहणी करुन योग्य नमुन्याची निवड करावी व निवडलेल्या नमुन्यांची खरेदीकामी ई निविदा मागणी करणेत यावी, असे ठरले. |

**मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेश :-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील PIL No. १८/२०११ मधिल सिव्हील अॅप्लिकेशन नं.१२६९५/२०१२ व १४३७२/२०१२ वर दि.२०/०२/२०१३ रोजी झालेल्या आदेशातील कलम १२ अन्वये मे. कोर्टाने सदरहू कामासाठी येणारे रक्कम रु.१,८५,६०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी दिलेली आहे.

**प्रस्ताव** :-

मा. व्यवस्थापन समितीचे दि.१३/१२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णयानुसार इकडील विभागामार्फत ई निविदा प्रक्रियेव्दारे निविदा मागविणेत आल्या असता १३ ठेकेदारांनी ई निविदा सादर केल्या होत्या. प्राप्त झालेल्या ई निविदांचा लिफाफा क्र. १ उडण्यात आला असता त्यापैकी ०४ निविदासादकर्ते विहीत किमान पात्रता निकषांचे आधारावर पात्र ठरले होते. सदरहू पात्रताधारक ०४ ठेकेदारांचे निविदेतील लिफाफा क्र. २ (Commercial Bid) दि.१७/०७/२०१४ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उघडण्यात आल्या असता, निविदा सादरकर्त्यांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालिलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | समर स्टील इंडस्ट्रीज, जळगांव | स्टीलफॅब फर्निचर्स प्रा.लि., पुणे | गोदरेज अॅण्ड बॉईस कं., लि., पुणे | स्पेसवूड फर्निचर्स प्रा.लि., नागपूर |
|---|---|---|---|---|---|
| 01 | M. S. (CRCA) Beds for Sai Ashram P-II: (Internal Size length -1830 mm, width-762 mm, As per | **77,26,320/-** | 83,12,640/- | 1,22,85,840/- | 1,39,44,000/- |

| | Drawing) 1680 Nos. | | | | |
|---|---|---|---|---|---|

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलपैकी मे. समर स्टील इंडस्ट्रीज, जळगांव यांनी निम्नतम दर दिलेले आहेत. त्यांना पुढील सभेमध्ये बोलविणेत येऊन अंतिम दर निश्चित करणेत यावा असे ठरले आहे. सदरहू निर्णयाचे इतिवृत्त अद्याप इकडील विभागाकडे प्राप्त झालेले नाही.

वर नमूद निर्णयानुसार मे. समर स्ट्रील इंडस्ट्रीज, जळगांव यांचे प्रतिनिधीस आजचे सभेपुढे उपस्थित राहणेकरीता बोलविणेत आलेले आहे. तरी त्यांचेशी चर्चा होऊन, याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८९०** **साईधर्मशाळा येथील डॉरमिटरी हॉल्सकरीता सिंगल बेडस खरेदीकामी निम्नतम दराचे निविदासादरकर्ते मे. समर स्टील इंडस्ट्रीज, जळगांव हे सभेसमोर उपस्थित होते. समितीने त्यांचेबरोबर कॉटसच्या दर व दर्जाबाबत चर्चा केली. चर्चेअंती त्यांनी निविदादरामध्ये सुट देणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी मे.समर स्टील इंडस्ट्रीज, जळगांव यांचे रु.७७,२६,३२०/- मात्र अंतीम निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.६** **श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवानिमित्त करावयाचे विकास कामासंबंधी सादरीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे महानिर्वाणास दि.19 ऑक्टोबर 2018 विजयादशमी रोजी 100 वर्षे पूर्ण होतिल. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानतर्फे दि.01 ऑक्टोबर 2017 ते दि.19 ऑक्टोबर 2018(विजया दशमी) या कालावधीत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष साजरे करण्यात येणार आहे. या शताब्दी वर्षात लाखो साईभक्त श्री साईंच्या महासमाधीचे दर्शनार्थ शिर्डी येथे भेट देतील. याप्रमाणे शिर्डीस भेट देणाऱ्या साईभक्तांचे सोयी सुविधेकरीता शिर्डी शहर व लगतचे परिसरामध्ये मोठया प्रमाणावर पायाभूत सुविधा उभारणे गरजेचे आहे. त्याकरिता विकास प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने अंतिम कृती आराखडा तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र.सासंवि/ 2013/ प्र.क्र.1/ का.16 दि.22/10/2013 व दि.25/02/2014 अन्वये सन्मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

**अ)** वरीलप्रमाणे महासमाधी शताब्दी सोहळयाचे पुर्वतयारी करीता अंतिम कृती आराखडा तयार करणेसाठी मार्गदर्शन म्हणून संस्थान अधिकाऱ्यांनी आळंदी देवाची, नाशिक कुंभमेळा, गरु-ता-गद्दी त्रिशताब्दी सोहळा नांदेड येथिल विकास कामांची पहाणी केली व संबंधित ठिकाणचे व्यवस्थापकांशी / अधिकाऱ्यांशी चर्चा करुन अनुषंगिक माहिती घेणेत आली.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवानिमित्त करावयाच्या विकास आराखडयाची अमंलबजावणी ही खालील प्रमाणे तीन स्तरांवर करावी लागणार आहे.

01. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी हाती घ्यावयाचे विकास प्रकल्प.

02. शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे मार्फत हाती घ्यावयाचे विकास प्रकल्प.

03. इतर शासकीय / निमशासकीय विभागांमार्फत हाती घ्यावयाचे विकास प्रकल्प.

**ब)** शताब्दी सोहळयानिमित्त प्रारुपकृती आराखडयात समाविष्ट करावयाच्या विकास कामांसाठी विविध 17 शासकीय / निमशासकीय विभागांकडून अंदाजपत्रके मागविणेत आली आहेत. त्यापैकी 08 विभागांकडून एकूण 1693 कोटी रुपयांचे विकास कामांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. तसेच 02 विभागांनी निरंक अहवाल दिला आहे. तसेच उर्वरीत 07 विभागांकडून अद्याप प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत.

**क)** श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवानिमित्त प्रारुप कृती आराखडा तयार करणेसाठी सल्लागार संस्था नेमणेकामी अशा प्रकारच्या मोठया स्वरुपाचे काम करणाऱ्या नामांकीत अशा संस्थांकडून प्रस्ताव मागविणेत आले होते.

मा. त्रिसदस्य समितीचे दि.12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र.479 अन्वये खाली नमूद पाच सल्लागार यांनी मोठया स्वरुपाची कामे केलेली असून त्यांचा वार्षिक टर्नओव्हर मोठया स्वरुपाचा असल्याने त्यांचेकडून फी बाबतचे वाणिज्यिक प्रस्ताव मागविणेस मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | सल्लागार संस्थेचे नांव |
|---|---|
| 1 | Tata Consulting Engineers Ltd, Noida |
| 2 | International Consultants & Technocrats Pvt. Ltd, New Delhi. |
| 3 | Fortrees Infrastructure Advisory Services, Mumbai |
| 4 | STUP Consultants Pvt Ltd, Navi Mumbai |
| 5 | Ernst & Young LLP, Hyderabad. |

त्यानुसार संस्थानचे जा.क्र.2388/2014, दि.13/08/2014 रोजीच्या पत्रान्वये सल्लागार यांचेकडून प्रस्ताव मागविणेत आले आहेत. सदरहू प्रस्तावाबाबत दि.05/09/2014 रोजी प्रि-बीड मिटींग संस्थानचे शिर्डी येथील सभागृहात घेण्यात आली आहे. सल्लागार संस्थांना त्यांचा अंतिम तांत्रिक व वित्तीय प्रस्ताव सादर करणेसाठी दि.13/10/2014 पर्यंत मूदत देण्यात आली आहे. सदरहू प्रस्ताव प्राप्त झालेनंतर मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेत येतील.

तरी श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव सन 2017 - 2018 निमित्त करावयाचे विकास कामांबाबत सादरीकरण करणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८९१** **आजचे सभेसमोर श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवानिमित्त करावयाच्या नियोजीत विकास कामांच्या प्रारुप आराखडयाचे सादरीकरण करणेत आले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचे सादरीकरण पाहून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**०१.** मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्प त्वरीत हाती घेणेसाठी येणारे खर्चास मान्यता मिळणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे या प्रकल्पाच्या नकाशांची सॉफ्ट कॉपी संस्थान वकिलामार्फत सादर करणेत यावी.

**०२.** संस्थान पाणीपुरवठा योजनेतील सध्याचे साठवण तलावाची क्षमता वाढविणे नवीन आर.सी.सी. साठवण तलावाचे बांधकाम करणेबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.

**०३.** नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे बांधकाम करणेसाठी आवश्यक कार्यवाही करणेत यावी.

**०४.** शेती महामंडळाकडील ३६४ हेक्टर जमीन संस्थानला मिळणेबाबत प्रयत्न करावा. तसा प्रस्ताव महाराष्ट्र शेती महामंडळ यांचेकडे पाठविणेत यावा व प्रस्तुत जमिनीतील बांधकामांचे प्रयोजन निश्चित करणेत यावे.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

-------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.७** **साईटेक प्रकल्पामार्फत नव्याने विकसीत करण्यात येणा-या संगणकीय प्रणालीचे प्रात्यक्षित दाखविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :** 1) मा. व्यवस्थापन समीतीचे दि. 05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 393.

2) मा. व्यवस्थापन समीतीचे दि. 17/07/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 592.

**प्रास्ताविक : अ]** श्री साईबाबा संस्थानचे तीनही उत्सवाच्या कालावधीत श्रींचे मुर्ती व समाधीचे वस्त्र स्विकारणेबाबत मा. व्यवस्थापन समीतीचे दि. 05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 393 अन्वये ज्या साईभक्तांना श्रींना वस्त्रे अर्पण करावयाची आहेत, त्याचा दिवस व वेळ संगणकावर सॉफटवेअर व्दारे नोंदणी करुन घेण्यात यावी. उत्सव वगळता इतर दिवशी साईभक्तांनी श्रींना अर्पण केलेली वस्त्रे ज्या दिवशी घालणेत येतील, त्या दिवशी त्या साईभक्तास

भ्रमणध्वनीवर संदेश दिला जाईल, अशा प्रकारचे सॉफटवेअर प्रायोगीक तत्वावर साईटेक प्रकल्पाअंतर्गत तयार करुन घेण्यात यावे, असे ठरले. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना सद्याचे सॉफटवेअर मध्ये वरील प्रणाली विकसीत करणेकामी योग्य ते बदल करणेकामी सुचित करण्यात आले होते. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना सद्याचे सॉफटवेअर मध्ये मा. व्यवस्थापन समीतीचे दि. 05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 393 नुसार योग्य ते बदल करणार आहे. मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार सदर प्रणाली कार्यान्वीत करणेपुर्वी प्रणालीचे प्रात्यक्षीक मा. व्यवस्थापन समीतीपुढे सादर करावे व त्यांनी सुचविलेल्या सुचनेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे सुचित केले आहे. मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी श्रींचे मुर्ती व समाधीचे वस्त्र स्विकारणे बाबत सद्याच्या प्रणालीमध्ये प्रास्तावीत बदलांचे प्रात्यक्षीक मा. व्यवस्थापन समीतीपुढे सादर करता येईल.

**ब]** मा. व्यवस्थापन समीतीचे दि. 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 799. अन्वये साईटेक प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून विविध विभागांचे संगणकीय प्रणाली कार्यान्वित करणेकामी कार्यादेश देण्यात आलेला आहे. संस्थानचे श्री साई प्रसादालय विभागासाठी वापरण्यात आलेले रिकामे तेला-तुपाचे डबे खर्ची टाकणेबाबत मा. व्यवस्थापन समीतीचे दि. 17/07/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 592 नुसार तेला तुपाचे एकुण डबे, रिकामे झालेले डबे व रिकामे डबे कुठे वापरण्यात आले याच्या नोंदी ठेवण्यात येऊन त्याचा मासीक अहवाल मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे समोर व वार्षिक अहवाल मा. त्रिसदस्य समीती समोर सादर करण्यात यावा तसेच यासाठी साईटेक प्रकल्पाअंतर्गत अद्यावत प्रणाली विकसीत करण्यात यावी, असे ठरले. त्यानुसार सदरकामी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना सद्याचे सॉफटवेअर मध्ये वरील प्रणाली विकसीत करणेकामी योग्य ते बदल करणेकामी सुचित करण्यात आले होते. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सद्याचे सॉफटवेअर मध्ये मा. व्यवस्थापन समीतीचे दि. 17/07/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 592 नुसार योग्य ते बदल केलेले आहे. मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार सदर प्रणाली कार्यान्वीत करणेपुर्वी प्रणालीचे प्रात्यक्षीक मा. व्यवस्थापन समीतीपुढे सादर करावे व त्यांनी सुचविलेल्या सुचनेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे सुचित केले आहे. मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी प्रास्तावीत केलेल्या कार्यप्रणालीचे श्री साई प्रसादालय विभागासाठी वापरण्यात आलेले रिकामे तेला-तुपाचे डबे खर्ची टाकणेबाबत सद्याच्या प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल केले असुन त्याचे प्रात्यक्षीक मा. व्यवस्थापन समीतीपुढे सादर करता येईल.

**क]** मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांनी दिलेल्या निर्देशानुसार संस्थानचे भक्तनिवास इमारतीच्या प्रत्येक माळयावरील रुम रजिस्टर ऐवजी संगणक प्रणाली कार्यान्वीत करणेबाबत सुचित करण्यात आले होते. त्यानुसार दि. 18/08/2014 रोजी सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांचेशी समक्ष चर्चा होऊन प्रथम व्दारावती भक्तनिवासच्या एका माळयावर प्रायोगीक तत्वावर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना सद्याचे सॉफटवेअर मध्ये भक्तनिवासच्या माळयावरील प्रणाली विकसीत करणेकामी योग्य ते बदल करणेकामी सुचित करण्यात आले होते. मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी भक्तनिवास इमारतीच्या प्रत्येक माळयावरील रुम रजिस्टर ऐवजी संगणक प्रणाली कार्यान्वीत करणेकामी प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल केले असुन त्याचे प्रात्यक्षीक मा. व्यवस्थापन समीतीपुढे सादर करता येईल.

**ड]** श्रींचे समाधीला सन 2018 मध्ये शंभर वर्ष पुर्ण होत असुन श्रींचे शताब्दी महोत्सवाची माहिती संस्थानचे ऑनलाईन वेबसाईटव्दारे देश-विदेशातील भक्तांना मिळावी तसेच श्रींचे शताब्दी महोत्सवाकामी  भक्तांचे अभिप्राय देखील आपणास प्राप्त व्हावे, याकामी मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार संस्थानचे ऑनलाईन वेबसाईटवर एक स्वतंत्र वेबपेज बनविणेकामी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना सुचित करण्यात आले होते. मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी श्रींचे शताब्दी महोत्सवाची माहिती व ऑनलाईन वेबसाईटवर सद्यस्थितीत भक्तांसाठी उपलब्ध असलेली माहिती संबंधीचे प्रात्यक्षीक मा. व्यवस्थापन समीतीपुढे सादर करता येईल.

**मागणी :** मा.व्यवस्थापन समीतीचे उपरोक्त “अ” व “ ब” प्रस्तावातील निर्णयानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी श्रींचे मुर्ती व समाधीचे वस्त्र स्विकारणेबाबत व श्री साई प्रसादालय विभागासाठी वापरण्यात आलेले रिकामे तेला तुपाचे डबे खर्ची टाकणेबाबत प्रणाली विकसीत करणेकामी तसेच “क” मधील मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांनी दिलेल्या निर्देशानुसार संस्थानचे भक्तनिवास इमारतीच्या प्रत्येक माळयावरील रुम रजिस्टर ऐवजी संगणक प्रणाली कार्यान्वीत करणेकामी सद्याचे सॉफटवेअर मध्ये योग्य ते बदल केलेले आहे. उपरोक्त च्डछ मध्ये मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार श्रींचे समाधीला सन 2018 मध्ये शंभर वर्ष पुर्ण होत असुन श्रींचे शताब्दी महोत्सवाची माहितीकामी बनविण्यात आलेले वेबपेज व वेबसाईटवर सद्यस्थितीत भक्तांसाठी उपलब्ध असलेली माहिती संबंधीचे प्रात्यक्षीक मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार सदर “अ”, “ ब”, “क” व “ड” प्रणाली कार्यान्वीत करणेपुर्वी प्रणालीचे प्रात्यक्षीक मा. व्यवस्थापन समीतीपुढे सादर करणेस मान्यता असावी, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :** मा.व्यवस्थापन समीतीचे उपरोक्त "अ" व " ब" प्रस्तावातील निर्णयानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी श्रींचे मुर्ती व समाधीचे वस्त्र स्विकारणेबाबत व श्री साई प्रसादालय विभागासाठी वापरण्यात आलेले रिकामे तेला तुपाचे डबे खर्ची टाकणेबाबत प्रणाली विकसीत करणेकामी तसेच "क" मधील मा. उपकार्यकारी अधिकारी सोा., यांनी दिलेल्या निर्देशानुसार संस्थानचे भक्तनिवास इमारतीच्या प्रत्येक माळयावरील रुम रजिस्टर ऐवजी संगणक प्रणाली कार्यान्वीत करणेकामी सद्याचे सॉफटवेअर मध्ये योग्य ते बदल केलेले आहे. उपरोक्त "ड" मध्ये मा. उपकार्यकारी अधिकारी सोा., यांचे निर्देशानुसार श्रींचे समाधीला सन 2018 मध्ये शंभर वर्ष पुर्ण होत असुन श्रींचे शताब्दी महोत्सवाची माहितीकामी बनविण्यात आलेले वेबपेज व वेबसाईटवर सद्यस्थितीत भक्तांसाठी उपलब्ध असलेली माहिती संबंधीचे प्रात्यक्षीक मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार सदर "अ", " ब", "क" व "ड" प्रणाली कार्यान्वीत करणेपुर्वी प्रणालीचे प्रात्यक्षीक मा. व्यवस्थापन समीतीपुढे सादर करणेचे मान्यतेस्तव सविनय सादर

**निर्णय क्र.८९२** **आजचे सभेत माहिती तंत्रज्ञान विभागाने समिती अध्यक्ष व सदस्यांसमोर साईटेक प्रकल्पामार्फत नव्याने विकसीत करण्यात येणा-या संगणकीय प्रणालीचे प्रात्यक्षिक सादर केले व प्रकल्पाची/ प्रणालीची समर्पक माहिती दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित अ, ब, क व ड प्रमाणे साईटेक प्रोजेक्ट अंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत सदर प्रणाली प्रात्यक्षिकाप्रमाणे विकसीत व कार्यान्वीत करुन घेण्यात यावी. तसेच जनसंपर्क कार्यालयामार्फत देण्यात येणा-या व्ही.आय.पी. पासमधून १५ वर्षा पर्यंतच्या मुलांना वगळणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.८** **श्री साईबाबा संस्थानकडे नियुक्त असलेल्या उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता निवासव्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम 2004 मधिल तरतूद :-

21(1) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, 1961, च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल :-

झ) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे; अशी तरतूद आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम 2004 मधिल कलम 13 (4) नुसार संस्थान विश्वस्त व्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमाने तिचे कर्तव्ये व काम पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकारी व्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणुक करता येईल अशी तरतूद आहे.

प्रस्ताव:- मा. कार्यकारी अधिकारी यांचे व्यतिरिक्त संस्थानकडे उपकार्यकारी अधिकारी यांची नियुक्त करणेत आलेली आहेत. सध्या त्यांना निवासव्यवस्थेकामी 970.00 चौ.फुट क्षेत्रफळाचे फ्लॅट उपलब्ध करुन देण्यात आले आहे. उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता निवासस्थानांचे बांधकाम करणे आवश्यक आहे. यापुर्वी मा.कार्यकारी अधिकारी यांचेसाठी संस्थानचे सर्व्हे नं. 107,108 व 109 पैकी मधील जागेत 2020 चौ.फुट क्षेत्रफळाचा बंगला निवासासाठी बांधणेत आलेला आहे. त्याचप्रमाणे उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता बंगल्याचे बांधकाम करणेस हरकत नाही. अशी मा. कार्यकारी अधिकारी यांचे समवेत समक्ष चर्चा झाली आहे.

महाराष्ट्र शासनाचे, सामान्य प्रशासन विभागाचे निर्णय क्र. शानिवा-1509/प्र.क्र.320/09/23-अ, दि.19/04/2011 अन्वये गट अ श्रेणीतील अधिकाऱ्यांकरीता 1750 चौ.फुट क्षेत्रफळाचे शासकीय निवासस्थाने अनुज्ञेय ठरविण्याचा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार संस्थानचे उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता 2000 चौ.फुट क्षेत्रफळाचे निवासस्थाने बांधता येतील त्यासाठी रु.1500/- प्रती चौ.फुट याप्रमाणे अंदाजे रु.30 लक्ष मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरहू बंगल्याचे बांधकाम संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. 107, 108 व 109 पै. मधील जागेत (सध्याचे रोज गार्डन) करता येईल महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र. टिपीएस-1609/2777/प्र.क्र.346/09/नवि-9 दि.08/07/2010 अन्वये धर्मदाय नोंदणीकृत संस्थांच्या धर्मशाळा/ भक्तनिवास इमारतींना अतिरिक्त 0.50 चटई क्षेत्र निर्देशांक प्रदान करणेबाबत निर्णय झालेला आहे. सदर बंगल्यांचे बांधकाम करणेसाठी सदरहू शासन निर्णयानुसार नमूद शासकीय विभाग व शिर्डी नगरपंचायत यांचेकडून बांधकाम परवानगी घेणेबाबत कार्यवाही करता येईल.

मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. 107,108 व 109 पैकी मधील जागेमध्ये उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता निवास व्यवस्थेसाठी बंगल्यांचे बांधकाम करणेस तसेच या बांधकामासाठी आर्किटेक्ट यांचेकडून बांधकामासाठी आराखडे अंदाजपत्रके तयार करुन घेता येईल असा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे

दि.13/12/2013 रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील नि.क्र. 948 अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाबाबत व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य यांनी उपलब्ध जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन निर्णय घेण्यात यावा असे ठरले."

तथापी वेळेअभावी मा. अध्यक्ष सो, यांचेमार्फत पहाणी होऊ शकली नाही. त्यामुळे दि.०६/१०/२०१४ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांनी सदर ठिकाणी पहाणी केली. त्यावेळी खालिलप्रमाणे उपस्थिती होती.

१. मा. श्री. राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी,

२. मा.श्री. अप्पासाहेब शिंदे उप कार्यकारी अधिकारी,

३. श्री. आर.बी. आहेर उप कार्यकारी अभियंता

४. श्री.एस.एम.जोरी, उप अभियंता

यांनी दि.06/10/2014 रोजी मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. 107,108 व 109 पैकी मधील जागेमध्ये उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता बंगल्याचे बांधकाम करणेसाठी पाहणी केली त्यावेळी तेथिल विद्यमान साईसहवास क्र.२ इमारतींचे उत्तरेकडील मोकळ्या जागेत सुमारे १५०० चौ.फुट बांधकाम करणेसाठी मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत यावा अशी चर्चा झाली.

तरी मौजे शिर्डी येथील संस्थानचे सर्व्हे नं.107,108 व 109 पैकी मधील जागेत उपकार्यकारी अधिकारी यांचेकरीता बंगल्याचे बांधकाम करणेसाठी तत्वतः मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.९** **समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी आणि दिक्षीत वाडा या पुरातन वास्तुंचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेसाठी सल्लागार नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक 21/10/2013 रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समिती सभेत उपरोक्त विषयाबाबत खालिलप्रमाणे निर्णय क्र.859 संमत करण्यात आलेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी व दिक्षितवाडा या इमारतींना रासयनिक प्रक्रियेव्दारे कोटींग करण्याचे कामासाठी ASI यांचेमार्फत कामाचा सविस्तर रुपरेषा ठरवून प्रस्ताव मागविणेत यावा. त्यासाठी मा. डायरेक्टर जनरल, ASI, नवी दिल्ली यांना मा. कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत विनंती पत्र पाठविणेत यावे, असे ठरले."

उपरोक्त निर्णयानुसार Director General, Archacological Survey of India (ASI) , New Delhi यांना संस्थानतर्फे जा.नं.4153, दि.14.12.2013 रोजीचे पत्राव्दारे विषयांकित पवित्र पुरातन वास्तुंचे जतन व सुदृढीकरण करण्याचे दृष्टीने मार्गदर्शन करणेबाबत विनंती करण्यात आली होती. त्यास

अनुसरुन ASI यांचेकडील खालिल अधिकाऱ्यांनी दि.10.02.2014 रोजी शिर्डी येथे भेट देऊन वर नमूद वास्तुची पहाणी केली.

01) श्री.पी.जी. देशमुख, Asstt. Superintending Archaeological Engineer

02) डॉ. तेजस गर्गे, Asstt. Archaeologist

सदर पहाणीचा अहवाल श्री. ए.एम.व्ही. सुब्रमन्यम, Superintending Archacologist, Aurangabad यांचेमार्फत दि.03.03.2014 रोजीचे पत्राव्दारे Director General, ASI यांना सादर करणेत आलेला आहे. त्याची छायांकीत प्रत सोबत अवलोकनार्थ जोडली आहे. तथापी सदर प्रत औपचारीक स्वरुपात प्राप्त झालेली नाही.

त्यानंतर अद्याप Director General, ASI यांचे कार्यालयाकडून उत्तरादाखल कुठलेही पत्र प्राप्त झालेले नाही. त्यामुळे त्यांना दि.26.12.2013 रोजी इमेलव्दारे व जा.नं.1360, दि.20.06.2014 चे पत्राव्दारे स्मरण देण्यात आले. त्यानंतरही त्यांचेकडून प्रतिसाद मिळालेला नाही. याबाबत दि.03.10.2004 रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांनी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी आणि दिक्षितवाडा या पूरातन वास्तुंचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेबाबत सूचना दिलेली आहे. याप्रमाणे स्ट्रक्चरल ऑडीट करणेसाठी सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे. तरी त्यासाठी IIT Bombay, VJTI Mumbai, COEP, Pune या नामांकीत अभियांत्रिकी शिक्षण संस्थांना विचारणा करुन त्यांचेकडून सेवा घेता येईल. अथवा याकरीता वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे नामांकीत सल्लागार संस्थांकडून प्रस्ताव मागविता येतिल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८९४** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी आणि दिक्षीत वाडा या पुरातन वास्तुंचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेकामी सल्लागाराची नेमणूक करणेसाठी IIT Bombay, VJTI Mumbai, COEP, Pune या नामांकीत अभियांत्रिकी शिक्षण संस्थांना विचारणा करण्यात यावी. जर या तीनही संस्था सल्लागार म्हणून सेवा देण्यास तयार नसतील तर याबाबत जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, नामांकीत सल्लागार संस्थांकडून प्रस्ताव मागविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **श्री साईबाबा फाऊंडेशन, (रजि. ऑफिस- साईबाबुजीनगर, ओंगळ, प्रशासकीय कार्यालय, चैन्नई) यांनी त्यांचे शिर्डी येथील सत्संग केंद्राकरीता संस्थान मालकीचे स.नं.५४ व ५५ मधील जागेतून १०'x २५०' जागा विकत अथवा अदलाबदलीच्या स्वरुपात मिळणेबाबतचा प्रस्ताव.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद-**

अधिनियमाचे कलम १७ (समितीची कर्तव्य व अधिकार) मधील पोट कलम (3) "विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही. विकण्यात येणार नाही. किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही."

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी सिव्हील अॅप्लीकेशन नं.१२०५६/२०१२, पी.आय.एल. नं.१८/२०११ मध्ये दिनांक १६ आक्टोंबर, २०१२ रोजी समितीला खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

**(6) We direct that, without prior permission of this Court, the Committee,-**

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or
immovable properties of the respondent No.2- trust;

(b) shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2- trust;

(c) shall not take any major financial decision of whatsoever nature;

**प्रस्तावना–**पी.सुब्बाराजा, सचिव, श्री साईबाबा फाऊंडेशन,(रजि.ऑफीस-साईबाबुजी नगर,ओंगळ, प्रशासकीय कार्यालय, चेन्नई ) यांनी त्यांचे शिर्डी येथील **'साईपथम'** या सत्संग केन्द्राकरीता संस्थानमालकीची मौजे शिर्डी येथील स.नं.५४ व ५५ मधील जागेतून १०'x२५०' फुट लांबीचा प्लॉट विकत अथवा बदली जागेच्या स्वरुपात मिळावा अशी विनंती इकडील कार्यालयास दि. ८ ऑगस्ट, २०१४ रोजी प्राप्त झालेल्या सोबतच्या पत्रान्वये केलेली आहे.

सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२८/८/२०१४ रोजी झालेल्या सभेत विचारार्थ ठेवण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ६८२ पुढीलप्रमाणे झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा फाऊंडेशन, (रजि. साईबाबुजी नगर, ओंगळ, प्रशासकीय कार्यालय, चेन्नई) यांचे भारतात तसेच परदेशात २०० पेक्षा अधिक सत्संग केंद्र आहेत. या सत्संग केंद्रामार्फत साईबाबांचे विचारांचा व शिकवणीचा प्रचार/ प्रसार करण्याचे काम करणेत येते. त्यांनी मागणी केलेप्रमाणे मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीचे स.नं.५४ व ५५ मधील जागेतून १०'x२५०'जागा त्यांना देणे व त्या बदल्यात संस्थानसाठी सोयीची असलेली कोणती व किती मोजमापाची जागा ते देण्यास तयार आहेत. तसा सविस्तर प्रस्ताव त्यांचेकडून घेण्यात येऊन, सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले."

**प्रस्ताव –** श्री साईबाबा फाऊंडेशन यांनी मागणी केलेल्या संस्थान मालकीचे जमीनीचा तपशील खालीलप्रमाणे.

| गाव | गट नं. | जमीन मालकाचे नाव | मागणी केलेले | दर | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

| | | | क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|---|
| शिर्डी | ५४ व ५५ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. | १०'x२५०' २३२.३४ चौ.मी. | १२,६०० /- प्र.चौ. मी. | २९,२७,५० ९/- |

पी.सुब्बाराजा, सचिव, श्री साईबाबा फाऊंडेशन यांचेकडून सविस्तर प्रस्ताव मागविणेत आला असता त्यांनी दि.३०/९/२०१४ व ६/१०/२०१४ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील स.नं.५४ व ५५ मधील १०'x२५०'जागेच्या बदली खालील तिन पर्यायापैकी जागा खरेदी करुन देण्याचे प्रस्तावीत केले आहे.

**पर्याय क्र. १**

| गाव | गट नं. | जमीन मालकाचे नाव | क्षेत्र | दर | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| शिर्डी | ५५/११ | मच्छिंद्र सोन्याबापू कोते | ८.२५ आर | ९,४००/- प्रती चौ. फुट | ७७,५५,०० ०/- |

परंतु दिनांक ०७/१०/२०१४ रोजीचे पत्रान्वये पी. सुब्बाराजा, सचिव, साईबाबा फाऊंडेशन यांनी कळविले आहे की, पर्याया क्र. १ मधील क्षेत्र ८.२५ आर असे चुकून झालेले आहे. त्यापैकी फक्त ३.५० आर क्षेत्र देणार आहे. तरी क्षेत्र ८.२५ ऐवजी ३.५० आर हे ग्राहय धरण्यात यावे. त्यानुसार सुधारीत पर्याय क्र.१ हा खालील प्रमाणे आहे.

**सुधारीत पर्याय क्र. १**

| गाव | गट नं. | जमीन मालकाचे नाव | क्षेत्र | दर | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| शिर्डी | ५५/११ | मच्छिंद्र सोन्याबापू कोते | ३.५० आर | ९,४००/- प्रती चौ. फुट | ३२,९०,००० /- |

**पर्याय क्र.२**

| गाव | गट नं. | जमीन मालकाचे नाव | क्षेत्र | दर | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| शिर्डी | ५५/१५ | नंदु पोपट जाधव | २.५ आर | ९,४००/- प्रती चौ. फुट. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शिर्डी | ५५/१५ | संचलाल भिकचंद लोढा | १.२५ आर | ९,४००/- प्रती चौ. फुट. | |
| | | एकूण क्षेत्र | ३ आर ७५ चौ.मीटर | | ३५,२५,०००/- |

**पर्याय क्र.३**

| **गाव** | **गट नं.** | **जमीन मालकाचे नाव** | **क्षेत्र** | **दर** | **एकूण किंमत** |
|---|---|---|---|---|---|
| निमगाव | १७३/१ | कैलास साहेबराव काथोरे | ४ आर. | ८५१०/- प्रती चौ. फुट (एकुण किंमत) | ३४,०४,०००/- |

**विभागाचे मत-** वरील पैकी पर्याय क्र.२ श्री. नंदु पोपट जाधव व श्री. संचलाल भिकचंद लोढा यांची जमीन संस्थान जमीनीचे लगत आहे. त्यामुळे सदरची जमीन बदल्यात स्विकारणे योग्य राहील असे मत आहे.

सदरहू प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.८९५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा फाऊंडेशन यांचे भारतात तसेच परदेशात २०० पेक्षा अधिक सत्संग केंद्र असून या सत्संग केंद्रामार्फत साईबाबांचे विचारांचा व शिकवणीचा प्रचार/ प्रसार करण्याचे काम करणेत येते. त्यांचे शिर्डी येथील सत्संग केंद्रामध्ये प्रदक्षिणा मार्गासाठी संस्थान मालकीचे स.नं.५४ व ५५ मधील जागेतून १०'x २५०' जागा (२३२.३४ चौ.मी., किंमत रु.२९,२७,५०९/-) देण्यास व त्याबदल्यात त्यांचेकडून प्रस्तावात नमुद केलेल्या पर्याय क्र.०२ मध्ये उल्लेख केलेली जागा (३ आर ७५ चौ.मी., किंमत रु.३५,२५,०००/-) संस्थान जागेच्या लगत व अधिक सोईस्कर तसेच संस्थान देत असलेल्या जागेच्या किंमतीचा तुलनात्मक दृष्टया विचार करता जास्त किमतीची असल्यामुळे संस्थानसाठी घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच वरील आशयासह सर्व अनुषंगीक बाबींचा समावेश करुन संस्थान वकिलामार्फत सिव्हील अर्ज मा.औरंगाबाद खंडपीठामध्ये तातडीने सादर करणेत येऊन, सदर प्रस्तावास मा.खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.११ दिपावली सुट्टीचे कालावधीत तसेच डिसेंबर- २०१४ मधील नाताळ सुट्टीव नववर्षा निमित्ताने होणारे गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूदः-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट – कलम (१) च्या खंड (ख) अन्वये ''रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे'' या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (1) च्या खंड (ग) अन्वये ''भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा सामरंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे'' या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** दिनांक २३ ऑक्टोंबर ,२०१४ ते दि.०६ नोव्हेंबर,२०१४ अखेर १५ दिवस दिपावली सणानिमित्त तसेच दिनांक २५ डिसेंबर, २०१४ ते दि.०२ जानेवारी,२०१५ अखेर ०९ दिवस शैक्षणिक व इतर कार्यालयांना सुट्टया आहेत. या कालावधीत साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्याने, साईभक्तांचे सोयीसाठी तात्पुरते निवास व्यवस्थेकरीता खालील ठिकाणी एम.एस. पाईपचे स्ट्रक्चर असलेले ताडपत्रीचे छतासह कापडी मंडप, टाकणे आवश्यक आहे.

**अ. दिपावली मंडप (कालावधी दि.२३/१०/२०१४ ते दि.०६/११**/२०१४ अखेर १५ दिवस)-

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | साईज | परिमाण (चौ.फुट) |
|---|---|---|---|
| ०१ | लाडू विक्री काउंटर समोर | ३०'x६०' | १८००.०० |
| ०२ | समाधी मंदिरासमोर सभाकुंड येथे | ६१'x६१' | ३७२१.०० |
| ०३ | उदी काऊंटर | ४५'x२०'<br>२०'x१५' | ९००.००<br>३००.०० |
| ०४ | गुरुस्थान मंदिरासमोर एम.एस. पाईप फ्रेममध्ये ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप टाकणे | ४५'x३०' | १३५०.०० |
| ०५ | गेट नं. ०३ चे बाहेरील बाजुस एम.एस. पाईप फ्रेममध्ये ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप टाकणे | २०'x३०' | ६००.०० |
| | | एकूण चौ.फुट | ८,६७१.०० |

अंदाजे रु.१.०० प्रती चौ.फुट प्रती दिवस प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च वरिल तक्त्यात नमूद केलेप्रमाणे दिपावली सुट्टीचे कालावधीकरीता श्री साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.१,३०,०६५/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

**ब.   नाताळ मंडप (कालावधी दि.२५/१२/२०१४ ते दि.०२/०१/२०१५ अखेर ०९ दिवस)-**

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | साईज | परिमाण (चौ.फुट) |
|---|---|---|---|
| अ | मंडप व्यवस्था | | |
| ०१ | गुरुस्थान समोर पश्चिम बाजूस दक्षिण – उत्तर असा | ४५' x ३०' | १३५०.०० |
| ०२ | उदी काऊंटर समोरील रेलींगवर | ४५'x२०'<br>२०'x१५' | ९००.००<br>३००.०० |
| ०३ | नगर-मनमाड रोड पश्चिम बाजू फुटपाथ | ४३१'x ८'-३" | ३५५५.७५ |
| ०४ | पिंपळवाडी रोड उत्तर बाजू फुटपाथ | १५४'x६'-८" | १०२७.१८ |
| ०५ | लाडू विक्री काउंटर समोर | ६०'x३०' | १८००.०० |
| ०६ | पिंपळवाडी रोड गेट नं. २ ते महालक्ष्मी मंदिरापर्यंत दर्शन रांगेसाठी | ३२०'x१८'-६" | ५९२०.०० |
| | एकूण चौ.फुट | | १४८५३.०० |
| | अंदाजे रु.०.७२ प्रती चौ.फुट प्रती दिवस प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च | | ९६,२४७.०० |
| ब | श्री साईप्रसादालयातील भोजन प्रतिक्षालय रेलींगला संरक्षक कठडे बांधणेकामी बांबुची ४ फुटी उंचीची बॅरेकेडींक करणे | ६५१ | ६५१.०० |
| | एकूण र.फुट | | ६५१.०० |
| | अंदाजे रु.४.४० प्रती र.फुट प्रती दिवस प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च | | २५,७८०.०० |
| क | साईनगर मैदानाकडे जाणा-या रस्त्यावर स्वागत कमान उभारणे (1 दिवस) | २०x१५ फुट | ०१ नग |
| | अंदाजे रु.१ प्रती नग प्रती दिवस प्रमाणे | | ३,०००/- |
| ड | साईनगर मैदान येथे शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी ग्रीनरुमसह स्टेजची उभारणी करणे | ३०x२० फुट | ६०० चौ.फुट |
| | अंदाजे रु.३८.५० प्रती चौ.फुट प्रती दिवस प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च | | २३,१००/- |

**प्रस्तावः-** उपरोक्तप्रमाणे नमूद केलेल्या तपशिलानुसार मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी आता फक्त २२ दिवसांचा कालावधी शिल्लक आहे.

त्यामुळे निविदा प्रक्रिया पूर्ण करुन त्यानंतर मंडप उभारणीसाठी पुरेसा कालावधी मिळावा याकरीता वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे त्वरीत निविदा मागविणे आवश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे दिपावली व नाताळ सुट्टीचे कालावधीत होणारे गर्दीचे निमित्ताने साईभक्तांचे सोयीसाठी मंडप इतर अनुषंगिक सुविधा उभारणे ही नित्याची व आवश्यक बाब असल्याने याकामी येणारे अंदाजे रु.२,७८,१९२/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,७८,१९२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------

**विषय नं.१२** **मा.व्यवस्थापन समिती दि.१२.०६.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.४५५ निरस्त करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **प्रस्तावनाः-** सन २०१४-२०१५ या वर्षा करीता साईआश्रम भक्तनिवास विभागाचे दैनंदिन कामकाजाकरीता, आवश्यक हाऊसकिपींग कामासाठी ई-निविदा सूचनाची जाहिरात देऊन ई-निविदा मागविण्यास मा. व्यवस्थापन समिती दि.१५/०२/२०१४ चे सभेतील निर्णय क्र १६४ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

१) उपरोक्त निर्णयानूसार सदर कामी दुस-यांदा दि.०५/०४/२०१४ रोजी ई-निविदा सूचना जाहिरात प्रसिध्द केल्या नंतर मुदतीत सहा ई-निविदा आल्या. नियमाप्रमाणे लिफाफा नं.१ व महाराष्ट्र राज्याच्या संकेतस्थळावर निविदाधारकांनी अपलोड केलेले कागदपत्रे डाऊनलोड करुन त्यांचा तुलनात्मक तक्ता करण्यात आला.

२) या प्रक्रियेत तीन निविदाधारक पात्र होऊन, दि.१२/०६/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती समोर पात्र निविदाधारकांचे बीड ऑफ कोटेशन (BOQ) उघडण्यात येऊन तीनही कंपनी प्रतीनिधींशी दराबाबत चर्चा-वाटाघाटी करुन निर्णय क्र.४५५ खालील प्रमाणे संमत झाला होता.

" यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले." दरम्यान

३) संस्थानचे विधी विभागामार्फत संस्थान वकिलाव्दारे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे सदर हाऊसकिपींग कामाकरीता एक वर्षाचा अंदाजे खर्च रुपये ९ कोटी २४ लाख या रकमेच्या खर्चासाठी व नवीन ठेकेदाराची नेमणूक होई पावेतो. आहे त्याच अटी शर्तीवर मे. बी.व्ही.जी. इंडीया लि. पुणे यांना मुदतवाढीचे मान्यतेसाठी दि.२७/०६/२०१४ रोजी सिव्हील अॅप्लिकेशन सादर करण्यात आले होते. त्यावर दि.०४/०७/२०१४ रोजी मा.

कोर्टाने जाहिरात देण्यास व संबंधितांकडून कोटेशन मिळाल्यावर पुढील आदेशासाठी अर्जदाराने अर्ज करावा, असा निर्णय दिल्याने,

४) परत एक वर्षासाठी फेर ई-निविदा सूचनेची जाहीरात देणे व फेर ई-निविदा मागविणे या कामी या विभागामार्फत परत दि.१६/०७/२०१४ रोजी प्रस्ताव सादर करुन त्यास मान्यता मिळाली. त्यानुसार नव्याने राबविलेली फेर ई-निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आलेली आहे.

**प्रस्तावः-** मा.□□□□□□□ व्यवस्थापन समिती दि.१२/०६/२०१४ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.४५५ अन्वये ई-निविदा सूचनेची अंतिम प्रक्रिया संदर्भातील मान्यतेसाठीचे सिव्हील अॅप्लीकेशन मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे दाखल करता येणार नाही. सबब, सदरचा निर्णय मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेत निरस्त करावा लागेल, यास देखील दि.१६/०७/२०१४ रोजी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता मिळालेली आहे.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः-** एका वर्षासाठी नव्याने ई-निविदा सूचना जाहिरात देऊन, सदरची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून मा. व्यवस्थापन समिती दि.१२/०६/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.४५५ निरस्त करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१३ कपडे धुणे/ इस्त्री करणे या लॉन्ड्री कामाच्या बीलापोटी अग्रिम (अॅडव्हान्स) रक्कम मिळणेबाबत लॉन्ड्री कॉन्ट्रॅक्टर यांचा अर्ज.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

२१(१) चा (ग)- भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

२१ (२) पोट-कलम (१) चा (ख) भक्तांना राहण्याकरिता व वापरण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे.

**प्रस्तावनाः-** साईआश्रम भक्तनिवास या विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर, चादर व टॉवेल धुणे/इस्त्री करणेचे कामासाठी मे.साई श्रध्दा लॉन्ड्री अॅन्ड सर्व्हिसेस, प्रो.श्री विजय अशोक चव्हाण, सावळीविहीर यांना जा.नं. एसएसएस/वशी-साभनि/५८०४/२०१३ दि.२०/०३/२०१३ अन्वये एक वर्षाचे कॉन्ट्रॅक्ट दि.२०/०३/२०१३ ते दि.१९/०३/२०१४ या कालावधीसाठी देण्यात आलेले होते. त्याची मुदत दि.१९/०३/२०१४ रोजी अखेर संपली. त्यानंतर

उपरोक्त संदर्भ क्र.२ मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५/०२/२०१४ सभेतील निर्णय क्र.१६६ नुसार, साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर, चादर व टॉवेल, आहे त्याच मागील वर्षाच्या दरामध्ये एक वर्ष (दि.२०/०३/२०१४ ते दि.३१/०३/२०१५) या कालावधीसाठी कपडे धुणे/इस्त्री करुन घेणेबाबत मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार मे.साई श्रध्दा लॉन्ड्री अॅन्ड

सर्व्हिसेस, प्रो.श्री विजय अशोक चव्हाण, सावळीविहीर यांचेकडून या विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर, चादर व टॉवेल धुणे/इस्त्री करुन घेणेचे कामकाज करुन घेण्यात येत आहे.

**प्रस्तावः-** मा.व्यवस्थापन मंडळात झालेल्या निर्णयानुसार, लॉन्ड्री खर्चाचे कामास मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात विधी विभागाकडील जा.नं.एसएसएस/वशी/-विधी/७२/२०१४ दि.२७/०६/२०१४ नुसार सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करण्यात आलेले आहे. सदर अॅप्लीकेशनवर मा. कोर्टाने अद्याप पर्यंत निर्णय दिलेला नाही. त्यामुळे संबंधीत कॉन्ट्रॅक्टरला आजपावेतो कार्यादेश देण्यात आलेला नाही. संबंधीत कॉन्ट्रॅक्टरकडून माहे एप्रिल, २०१४ पासून ते आज पर्यंत या विभागाकडील साईभक्तांच्या वापरासाठी दररोज लागत असणारे बेडशीट, उशी कव्हर, चादर व टॉवेल धुणे/इस्त्री करुन घेणेबाबतचे काम करुन घेण्यात येत आहे व यापुढेही काम करुन घ्यावे लागणार आहे, तथापी त्यांचे बील माहे एप्रिल, २०१४ पासून अदा करणे बाकी आहे.

मे.साई श्रध्दा लॉन्ड्री अॅन्ड सर्व्हिसेस, प्रो.श्री विजय अशोक चव्हाण, सावळीविहीर यांनी माहे एप्रिल, २०१४ ते जुलै, २०१४ अखेर बीलापोटी ८०% रक्कम अंदाजे रु.१२ लाख ८० हजार अग्रिम (अॅडव्हान्स) रक्कम मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

सदर कॉन्ट्रॅक्टरचे माहे एप्रिल, २०१४ पासून ते जूलै, २०१४ अखेर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कपडे धुणे/इस्त्री कामाचे बील अदा करणे बाकी आहे.

| अ.नं. | माहे | झालेले बील | एकूण रक्कमेवर होणारी ८० % अग्रिम रक्कम |
|---|---|---|---|
| १ | एप्रिल,२०१४ | ३,५१,२३२/- | रु. १६,४१,३९०/- X ८० % |
| २ | मे,२०१४ | ४,०४,११२/- | |
| ३ | जुन,२०१४ | ४,४६,४५८/- | |
| ४ | जुलै,२०१४ | ४,३९,५८८/- | |
| एकूण चार महीन्याची अदा करावयाची रक्कम | | १६,४१,३९०/- | रु. १३,१३,११२/- (८० %) अग्रिम रक्कम |

मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडून जो पर्यंत संस्थानला निर्णय प्राप्त होत नाही तो पर्यंत मे.साई श्रध्दा लॉन्ड्री अॅन्ड सर्व्हिसेस, प्रो.श्री विजय अशोक चव्हाण, सावळीविहीर यांना कार्यादेश देता येत नाही.

परंतू मा.व्यवस्थापन मंडळाच्या झालेल्या निर्णयानुसार संबंधीत कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून मागील वर्षाच्या दरामध्ये एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ व येणा-या खर्चास मान्यता मिळाली असल्याने भक्तांच्या सुखसुविधासाठी सदरचे काम संबंधीत कॉन्ट्रॅक्टर यांचे कडून करुन घेण्यात येत आहे.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः-** साईभक्तांना निवासा संदर्भात पुरविण्यात येणा-या सुख सुविधा अत्यंत उपयोगी व संवेदनशील असल्याने ही सुविधा पुढे कार्यान्वित असून संबंधीत कॉन्ट्रॅक्टरकडून झालेल्या माहे एप्रिल, २०१४ ते जुलै, २०१४ अखेरच्या कामाचे बील स्विकारुण,

१) या कालावधीच्या होणा-या बीलाच्या रकमेवर ५०% रक्कम रु.८,२०,६९५/- अशी होते. ही अग्रिम (अॅडव्हान्स) रक्कम देणे, तसेच साईभक्तांना पुरविण्यात येणा-या सुखसुविधा खंडीत होऊ नये म्हणून

२) जोपर्यंत मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडून खर्चाबाबत संस्थानकडे मान्यता मिळत नाही तो पर्यंत माहे ऑगस्ट, २०१४ पासून दरमहा होणा-या बीलापोटी ५०% रक्कम किंवा प्रती महा रु.२,००,०००/- संबंधीत कॉन्ट्रॅक्टरला अग्रिम (अॅडव्हान्स) रक्कम म्हणून लेखाशाखा विभागामार्फत दरमहा अदा करता येईल असे नम्र मत आहे.त्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे सिव्हील अर्ज क्र.५८१२/ २०१४ दाखल केलेला होता. दरम्यानचे कालावधीमध्ये मा.खंडपीठाने सदर अर्जावर दि.२६.०९.२०१४ रोजीचे आदेशान्वये प्रस्तावित खर्चास मान्यता दिलेली असल्यामुळे मे.साई श्रध्दा लॉन्ड्री अॅन्ड सर्व्हिसेस, प्रो.श्री विजय अशोक चव्हाण, सावळीविहीर यांना देय असलेल्या बीलाची पूर्ण रक्कम त्वरीत अदा करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम निवासस्थान)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१४ स्वच्छता साहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** आरोग्य विभागामार्फत संस्थान इमारती आणि परिसरातील साफसफाई केली जाते. साफसफाईचे कामासाठी स्वच्छता साहित्याची नेहमीच गरज असते यासाठी आवश्यक लागणा-या साहित्याची खरेदी वारंवार करण्यापेक्षा वार्षिक खरेदी करण्यात येते. सध्या आरोग्य विभागाकडील साहित्य वापरुन संपत आलेले आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५/०३/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २४२ ने रु. ६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता दिलेली आहे सदरची कार्यवाही खरेदी विभागामार्फत चालू आहे. सदरचे साहित्य व विभागाकडील शिल्लक असलेले साहित्य मिळून ऑगस्ट २०१४ अखेर पर्यंत पुरेसे आहे. तो पर्यंत सन २०१४-२०१५ (सप्टेंबर - २०१४ ते मार्च – २०१५) या कालावधीसाठी लागणा-या साहित्याची खरेदीची कार्यवाही पुर्ण होईल. करीता दि. १७/०७/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सन २०१४-२०१५ चे वार्षिक खरेदीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.५७५ ने सदरहु प्रस्ताव रद्द करणेत येऊन नविन सुधारीत प्रस्ताव तयार करणेत यावा असे ठरले.

आरोग्य विभागासाठी सन २०१४-२०१५ (सप्टेंबर - २०१४ ते मार्च – २०१५) करिता दैनंदिन कामासाठी आवश्यक आसणा-या साहित्याची यादी सोबत परिशिष्ठ अ जोडले आहे. परिशिष्ठातील अ. नं. ०१ ते ०४ नुसार साहित्य खरेदीकामी अंदाजे रु. **९,६८,०००/-** (अक्षरी रु. नऊ लाख अड्डसष्ट हजार ) मात्र खर्च अपेक्षित आहे. सन २०१४-२०१५ चे बजेट खरेदी विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे. सदरचे साहित्य, खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदी करावे लागेल.

तरी सोबतचे परिशिष्ठातील यादीप्रमाणे साहित्य खरेदी करणेसाठी येणा-या अंदाजे रुपये ९,६८,०००/- (अक्षरी रु. नऊ लाख अड्डसष्ट हजार) मात्र चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.८९९ यावर सविस्तर चर्चा होऊन, आरोग्य विभागासाठी आवश्यक असलेले स्वच्छता साहित्य विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,६८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१५ श्री.प्रकाश वसंत सामंत, मुंबई कार्यालय यांचा मानधनात वाढ होऊन मिळणेबाबत दि.१४.०७.१४ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** मुंबई कार्यालय येथून संस्थानव्दारे प्रकाशित होणाऱ्या साईलीला मराठी, हिन्दी व इंग्रजी व्दैमासिकाचे संगणकीय अक्षर जुळवणीचे काम श्री.प्रकाश वसंत सामंत, कंत्राटी पध्दतीने रु. 2,500/- (रुपये दोन हजार पाचशे मात्र) एकूण मानधनावर अर्धवेळ करत आहे. त्यांनी संदर्भ क्रं.03 दि.14/07/2014 रोजीचे अर्जाने

"मी, प्रकाश वसंत सामंत, संस्थानच्या मुंबई कार्यालयामध्ये संस्थान प्रकाशित साईलीला (मराठी) व श्री साईलील (इंग्रजी व हिंदी) या व्दैमासिकांची संगणकीय अक्षरजुळणी करण्याकरीता कंत्राटी पध्दतीने कार्यरत आहे. सदरचे काम मुख्य काम वेळोवेळी मुंबई कार्यालयातील अत्यंत महत्वाची व तातडीची तत्सम कामे मी गेल्या 13 वर्षांहून अधिक काळ करीता आलो आहे. या कामाकरीता मला दरमहा रु.2500/- मानधन दिले जाते. त्या मानधनातून रु.250/- आयकर वजा करुन प्रत्यक्षात मला रु.2250/- मिळतात. मागील 10 वर्षात मला देण्यात येत असलेल्या या मानधनात काहीच वाढ झालेली नाही. तरी कृपया वाढती महागाई लक्षात घेऊन माझ्या मानधनात योग्य ती वाढ करुन मिळावी". असे नमूद केलेले आहे.

श्री.सामंत हे साधारणत: सन 2000 पासून संस्थान प्रकाशित होणाऱ्या साईलीला व्दैमासिकाचे संगणकीय अक्षर जुळवणीचे काम करत आहे. सदर

कामापोटी त्यांना संदर्भ क्रं. 01 दि.21/07/2004 रोजीचे आदेशाने एकूण रु.2500/- मानधन देण्यात येत आहे.

श्री सामंत यांचे दि.14/07/2014 रोजीचे अर्जाबाबत कार्यालय अधिक्षक, मुंबई कार्यालय यांनी खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविला आहे.

1. श्री सामंत हे मुख्यत: सस्थानच्या साईलीला (मराठी) व श्री साईलीला (इंग्रजी - हिंदी) या मासिकांच्या सर्वसाधारण व विशेष अंकांची संगणकीय अक्षरजुळणी, मुद्रितशोधानानंतर संगणकीय अक्षरजुळणीत दुरुस्ती, आवरण व आतील पृष्ठांची सजावट व मांडणी इत्यादी कामे करतात.

2. श्री.सामंत हे सर्वसाधरणपणे प्रत्येक आठवडयाला चार दिवस असे प्रत्येक महिन्याला, 16 दिवस जवळजवळ 60-65 तास काम करतात. याप्रमाणे त्यांनी त्यांच्या येथील कामाच्या प्रारंभापासून आतापर्यंत काम केलेले आहे. हे येथील कार्यालयातील सर्वच कर्मचारी जाणतात.

3. श्री सामंत हे, त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या मुख्य कामाव्यतिरिक्त संस्थानच्या इतर संगणकीय अक्षरजुळणीतील आलेखस्वरुपी, तत्सम तातडीची व आवश्यकतेनुसार संस्थानच्या इतर प्रकाशनासाठी संगणकीय अक्षरजुळणी आदी कामे वेळोवेळी करुन देत असतात.

4. श्री.सामंत यांनी मानधनात वाढ करुन मिळणेबाबत केलेली विनंती उचित असून, त्यांना अदमासे रु.4500-5000 वाढ देण्यात यावी, असे वाटते.

तरी श्री.प्रकाश वसंत सामंत, मुंबई कार्यालय यांची दि.14/07/2014 रोजीचे अर्जातील विनंती, सदर विनंतीबाबत मुंबई कार्यालय अधिक्षक यांचा दि.16/09/2014 रोजीचा अभिप्राय, त्यांचे कामाचे स्वरुप, कामाचा कालावधी तसेच दरम्यानचे कालावधीत इतर स्थायी / अस्थायी कर्मचाऱ्यांच्या वेतनात वेळोवेळी झालेली वाढ या सर्व बाबींचा विचार करता त्यांना सध्या देणेत येणारे रु.2,500/- या मानधनात उचित वाढ करुन, त्यांना दरमहा रु.4,500/- मात्र इतके मानधन देणेस हरकत नाही, असे नम्र मत आहे.

तरी श्री प्रकाश वसंत सामंत, (संस्थान प्रकाशित साईलिला मराठी, इंग्रजी, हिंदी या अंकाची संगणकीय अक्षर जुळवाजुळवी व तत्सम इतर कामे करणेकरीता) मुंबई कार्यालय यांचे मानधन वाढीचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.प्रकाश वसंत सामंत, मुंबई कार्यालय यांचा अर्ज व प्र.अधिक्षक, मुंबई कार्यालय यांचा अभिप्राय विचारात घेता उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१६ देनंदिन होणा-या श्रींचे अभिषेक पुजेसाठी साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** समाधी मंदिरामध्ये साईभक्त अभिषेक पूजेची प्रथा पुर्वीपासुन आहे. सदर अभिषेक पूजेसा एका तासाचा कालावधी लागतो. अभिषेक पूजेचे स्वरुप व त्याचे विधी खालीलप्रमाणे आहे.

१. ललाटे तिलकं कुर्यात- भक्तांनी आपल्या कपाळाला कुंकू लावुन घेणे.

२. भक्ता प्रतिनीधी (पुजारी) मार्फत आचमन प्राणायाम, देश कालाचा उच्चार करुन भक्तांना गोत्र व उच्चार व संकल्प करण्यास सांगितला जातो.

३. गणपती, सुर्य, दिप, भूमी स्मरण पूर्वक नमस्कार केला जातो.

४. श्री गणपतीची पंचोपचार पूजा व गणपतीस गणपती अथर्वशीर्ष या स्तोत्राचा अभिषेक व पूजा केली जातो.

५. शंख, घंटा यांचे पूजन करुन वरुणाची पुजा केली जाते.

६. श्रीसाईबाबांच्या प्रतिमेची पुर्वांग पूजा (पंचामृत) करुन ‘पुरुषसुक्त’ या स्तोत्राचा अभिषेक केला जातो.

७. उत्तरांगा पुजा अंतर्गत वस्त्र, गंध, हळद, कुंकू, अक्षदा, हार, अलंकार इ. पूजा होते. नंतर १०८(एकशे आठ) अष्टोत्तरशत नामावली म्हटली जाते. त्यावेळी भक्तांना ताटामध्ये अक्षदा वाहण्यास सांगितली जाते.

८. श्रींना धुप, दिप नैवेद्य दाखविला जातो.

९. श्रींचे आरती प्रदक्षिणा मंत्रपुष्पांजली होते.

१०. भक्तांना मईप्सित प्रार्थना करण्यास सांगितले जाते, नंतर अर्पण संकल्प केला जातो.

अभिषेक पुजेची व्यवस्था सत्यनारायण हॉलचेवर करणेबाबत दि.२८.०७.२००७ रोजीचे सभेतीला निर्णय क्र.५७२ अन्वये ठरलेला असून त्यामध्ये खालीलप्रमाणे पुजा विधी करण्यात येते.

श्रींचे अभिषेक पूजेकरिता सध्या श्रीसत्यनारायण पूजेच्या हॉलच्या वर श्रींची पितळी मुर्ती स्थापीत करण्यात आलेली असून या ठिकाणी प्रत्येक बॅचमध्ये १०० साईभक्त अभिषेक पूजाकरतात. दैनंदिन २ बॅचमध्ये अभिषेक पूजा करण्यात येतात. अभिषेक पूजेकरिता लेखाशाखामर्फत प्रत्येक जोडीस (पती-पत्नी) रु.१०१/- प्रमाणे पावती दिली जाते. पुजेपुर्वी साईभक्तांना प्रत्येक तिकीटास एका स्टीलचे ताटामध्ये हळद, कुंकू, अक्षदा, फुले, उदीचे पॅकेट, लाडूचे पॅकेट, श्रीफळ इ. साहित्य दिले जाते. अभिषेक पूजेदरम्यान मंदिर विभागाचे पुजारी यांचेमार्फत श्रींच्या मुर्तीस जल व दुधाने मंत्रोच्चाराने अभिषेक घाताला जातो. त्यावेळी साईभक्त पुजा-याने सांगितलेला संकल्प म्हणतात. अभिषेक पूजा पुर्ण झाल्यानंतर पूजेस बसलेला साईभक्त स्टीलचे ताटामध्ये ठेवलेल्या अक्षदा पुजा-याने सांगितल्याप्रमाणे श्रीसाईबाबांचे अष्टोत्तरशत नामावलीने स्टीलचे ताटामध्ये अर्पण करतात, नंतर तेथे असलेल्या श्रींचे मूर्तीचे दर्शन घेऊन ताटामध्ये देण्याता आलेले हळद, कूंकु, पुष्प व नामावलीच्या अक्षदा श्रींना अर्पण करतात व उदी पॅकेट, लाडूप्रसाद व श्रीफळ प्रसाद म्हणून सोबत घेऊन जातात.

सध्याच्या या पूजापद्धती ऐवजी श्रीसत्यनारायण पूजेप्रमाणे चौरंग ठेऊन अभिषेक पूजा करण्याची असल्यास व नमूद केलेल्या पूजा साहित्याबरोबरच पुढीलप्रमाणे पूजा साहित्य ठेऊन पूजा करता यीईल. यामध्ये प्रत्येक बॅचेसचे १०० जोडप्याकरिता लागणारे पूजा साहित्याचे २ सेट ग्रहीत धरलेले आहे.

| अ.नं | वस्तुचे नाव | प्रति जोडपे प्रत्येकी नग | १०० जोडप्या करिता एकूण नग x ०२ सेट | किंमत प्रति नग (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | तांब्याचे मोठे ताम्हण | ०१ | २०० नग | ७००/- | १,४०,०००.०० |
| ०२ | तांब्याचे मध्यम ताम्हण | ०१ | २०० नग | ५५०/- | १,१०,०००.०० |
| ०३ | तांब्याचे लहान ताम्हण | ०१ | २०० नग | २५०/- | ५०,०००.०० |
| ०४ | तांब्याचे कलश (गडवा) | ०१ | २०० नग | ३७५/- | ७५,०००.०० |
| ०५ | तांब्याचे फुलपात्र | ०२ | ४०० नग | १२५/- | ५०,०००.०० |
| ०६ | तांब्याचे संध्यापळी | ०१ | २०० नग | ५०/- | १०,०००.०० |
| ०७ | तांब्याचे अभिषेकपात्र | ०१ | २०० नग | ३००/- | ६०,०००.०० |
| ०८ | तांब्याचे निरंजन | ०१ | २०० नग | २५०/- | ५०,०००.०० |
| ०९ | पितळी अगरबत्तीदानी (अगरबत्ती स्टॅन्ड) | ०१ | २०० नग | ५०/- | १०,०००.०० |
| १० | पितळी श्रीसाईबाबांची मुर्ती | ०१ | २०० नग | २५०/- | ५०,०००.०० |
| ११ | पितळी श्रीसाईबाबांची मुर्ती | ०१ | २०० नग | २५०/- | ५०,०००.०० |
| १२ | लाकडी सागवाणी १ चौरंग २ पाट(मजूरीसह) | ०३ | ३०० नग / १०० सेट | ३२००/- प्रति सेट | ३,२०,०००.०० |
| | एकूण | १५ | | | ९,७५,०००.०० |

सध्या अभिषेक पूजा सकाळी ७ ते ८ व सकाळी ९ ते १० दोन बॅचमध्ये करण्यात येतात. पूजासाहित्य देणेकरिता एक मदतनीस कर्मचारी देण्यात येतो. श्रीसत्यनारायण पूजेप्रमाणे मांडणी करुन अभिषेक पूजा करावयाची असल्यास तीन मदतनीस कर्मचारी द्यावे लागतील. तसेच बांधकाम विभागामार्फत अभिषेक

हॉल सर्व बाजुंनी बंदीस्त करावा लागेल. तसेच भांडी धुणेकरिता मोरीची तसेच पाण्याची व्यवस्था करावी लागेल.

तरी उपरोक्तप्रमाणे साहित्य खरेदी करणेकामी एकूण रु.९,७५,०००/- (अक्षरीरुपये नऊ लाख पंचाहात्तर मात्र) खर्च अपेक्षीत आहे. तरी उपरोक्त नमूद केलेले श्रींचे अभिषेक पूजेमध्ये सत्यनारायण पूजेप्रमाणे स्वतंत्र पूजा विधी मांडणे व भक्तांकडुन पूजा करुन घेणेकामी व उत्तम दर्जाचे साहित्य खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व साहित्य खरेदीसाठी होणारे खर्चास मान्यता असावी. उपरोक्तप्रमाणे साहित्य कोणी साईभक्त देणगी देत असल्यास साहित्य देणगी स्विकारण्यास मान्यता असावी ही विनंती. तरी त्याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्रींचे अभिषेक पूजेमध्ये सत्यनारायण पूजेप्रमाणे स्वतंत्र पूजा विधी मांडणे व भक्तांकडुन अभिषेक पूजा करुन घेणेकामी उत्तम दर्जाचे साहित्य खरेदी करणेसाठी विहित पध्दतीने निविदा मागविणेस व त्यासाठी येणा-या रु.९,७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१७ केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल (C.I.S.F.) यांचेमार्फत कन्सल्टंट सेवा घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** उप कमान्डन्ट केंद्रीय औदयोगिक सुरक्षा बल,भारतीय टाकसाळ छापखाना,नासिक महाराष्ट्र यांचे दि.07.10.2014 रोजीचे पत्र प्राप्त झाले असून सदर पत्रात केंद्रीय औदयोगिक सुरक्षा बल (महाराष्ट्र) हे भारत सरकारच्या केंद्रीय सुरक्षा दलांपैकी एक महत्वाचे व अत्यावश्यक सुरक्षा दल आहे.ज्यामध्ये सुरक्षा तज्ञांचा समावेश असुन सहकारी व खाजगी क्षेत्रांना सुरक्षा व त्यावरील विचारविमर्श करण्यासाठी सहायता करत आहे. तरी केंद्रीय औदयोगिक सुरक्षा बलाच्या व्यापारीक धोरणांनुसार मला आपल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांच्याशी संपर्क साधुन संस्थानला सी.आय.एस.एफ च्या सल्लागार सेवेविषयी विचार विमर्श करण्याचे आदेश देण्यात आलेले आहे.या संदर्भात वरिष्ठांकडून मिळालेले सी आय एस एफ च्या कार्यपद्धती वरील मार्गदर्शक सुची व पुस्तीका आपल्या संदर्भासाठी पाठवत आहे.जर श्री साईबाबा संस्थानला सुरक्षा संदर्भात सी आय एस एफ च्या मार्गदर्शनाची / सल्ल्याची आवश्यकता असेल व ती त्यांना हवी असेल तर आमची सदर सेवा पुरविण्याची तयारी असुन मी आपला शतश: आभारी राहील तरी या स्थितीत आपण मला लेखी स्वरुपाची विनंती सी आय एस एफ ला देण्याचे करावे जेणे करुन ते मला वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यास मदत होईल.आपल्या होकाराची प्रतिक्षा करत आहे आपण मिटींगसाठी जो वेळ दिला त्याबद्दल मी आपला ऋणी आहे." असे नमूद केले आहे.

त्यानुषंगाने मा.उप कमान्डन्ट, केंद्रीय औदयोगिक सुरक्षा बल,भारतीय औदयोगिक सुरक्षा बल, नाशिक यांचे मार्फत खाजगी सुरक्षा एजन्सीला तसेच कायम -सुरक्षा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे,मंदिर व मंदिर परिसराचे सुरक्षेबाबत आढावा घेऊन त्यांप्रमाणे सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करणेबाबत, तज्ञाच्या मार्गदर्शन / सल्ल्याची आवश्यकता आहे.त्याप्रमाणे त्यांनी सदर काम करण्याची तयारी संदर्भिय पत्राद्वारे दर्शविलेले आहे. तथापी सदर पत्रात त्यांनी याकामी सदर सेवा ही विनामुल्य अथवा अल्पश: मानधन तत्वावर देणेबाबत असा कोणताही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे त्यांचे पत्रास अनुसरुन त्यांना उलट टपाली उत्तर देणेकामी सदर विषयावर चर्चा होऊन निर्णय होणे आवश्यक आहे.

करीता मा. उप कमान्डन्ट, केंद्रीय औदयोगिक सुरक्षा बल, भारतीय औदयोगिक सुरक्षा बल, नाशिक यांचे मार्फत श्रींचे मंदिर व मंदिर परिसराचे सुरक्षिततेच्या दृष्टीने मार्गदर्शन घेणेकामी कन्सलटंन्ट म्हणून त्यांची विनामुल्य अथवा अल्पशा मानधन तत्वावर नेमणूक करणे संदर्भात याबाबत चर्चा करुन निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.९०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे मंदिर व मंदिर परिसराची सुरक्षितता ही बाब अत्यंत महत्वाची असल्यामुळे सुरक्षा यंत्रणा, फायर-सेफ्टी, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा वगैरे सुरक्षाविषयक मार्गदर्शनासाठी केंद्र शासनाच्या केंद्रीय औदयोगिक सुरक्षा बल सारख्या चांगल्या संस्थेचे मार्गदर्शन घेण्याची संस्थानला आवश्यकता आहे. मार्गदर्शन घेणेसाठी सदर संस्थेची विनामुल्य अथवा मानधन तत्वावर कन्सल्टंट म्हणून नेमणूक करणेकामी त्यांचेकडे सविस्तर विचारणा करणेत यावी.**

**तसेच केंद्रीय औदयोगिक सुरक्षा बल संस्थेकडून श्रींचे मंदिर व मंदिर परिसराच्या सुरक्षेसाठी सुरक्षा कर्मचारी घ्यावयाचे झाल्यास त्यांचे वेतन व मानधन यावर किती खर्च येईल याबाबत सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१८ श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को. ऑप. सोसायटीस स्नानगृह या व्यवसायास दि.०१.११.२०१४ ते दि.३१.१०.२०१५ या कालावधीसाठी मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.08/10/2013 रोजीचे सभेतील विषय नं.64, निर्णय क्रं.764 चे ठरावास अनुसरुन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना मासिक परवाना फी रुपये 10,000/- मात्र व विदयुत बील-मीटर रिडिंगप्रमाणे वेगळे आकारुन संस्थानचे सर्व्हे नं.3 मधील जनरल स्नानगृह चालविण्याचे व्यवसायास (मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची

मान्यता घेण्यात येऊन) दि.01/11/2013 ते दि.31/10/2014 या एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देणेत यावी असे ठरले.

प्रस्तुत मा.त्रिसदस्य समितीचे निर्णयाप्रमाणे मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेसाठी संस्थानने सिव्हिल ॲप्लीकेशन नं. 3686/2014 Claim:- Civil Application for grant of permission for leasing out premises of the Sansthan on leave and licence basis in favour of Union Bank of India, State Bank of India, Prasar Bharti Broadcasting Corporation of India & Shri Sai Sansthan Employees Credit Co. Society, shirdi. दाखल करणेत आले होते. त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.02/05/2014 रोजी खालील प्रमाणे आदेश दिलेला आहे.

"..By application (No.3686/2014),the Committee has urged for permission to execute agreement of leave and licence in favour of Union Bank of India and State Bank of India for the purpose of installation of ATM machines and providing a space for a Bank on year to year basis and for providing facility of broadcasting of various religious programmes of Shri Saibaba on leave and licence upon execution of leave and licence agreement, agreement and for providing facility of Hot Water, Cold Drinks and General Stores and for that purpose grant of necessary permission.

Considering day today management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decisions.

Application (No.3686/2014) allowed accordingly.."

उपरोक्त आदेशास अनुसरुन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना जा.नं.एसएसएस/वशी-विधी/813/2014, दि.15/05/2014 रोजी दि.01/11/2013 ते 31/10/2014 अखेर मुदतवाढ आदेश दिलेला आहे. तसेच त्यानंतर करारनामा करणेत आलेला आहे.भक्तांनकडुन गरम पाण्यासाठी प्रति बादली रु.3 आकारणेबाबत सोसायटीस दर ठरवुन दिलेला आहे.

आता श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.ऑप सोसायटी लि.शिर्डी यांनी जा.नं.श्रीसासंएक्रेसो/164/14 दि.24/09/2014 पत्रान्वये संस्था साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी आपले संस्थानचे जनरल स्नानगृह (पिपंळवाडी रोड लगत) येथे चालवत असलेल्या स्नानगृह या व्यवसायाची मुदत दि.31/10/2014 रोजी संपुष्टात येत असल्याने साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी सदर व्यवसाय संस्थेस पुढिल पाच वर्षा करीता चालविण्यास मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे.

संस्थानचा अधिनियम 2004 मधील कलम 17(3)मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

..विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्व मंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडुन एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही... त्याचप्रमाणे.

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे कार्टातील जनहित याचिका नं. 18/2011 मधील सिव्हिल अर्ज नं. 12056/2012 मध्ये

दि.16/10/2012 रोजी दिलेल्या आदेशामध्ये Without prior permission of this Court the Committee shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent No.2 Trust; असा असुन त्यात मा.कोर्टाच्या परवानगी शिवाय संस्थानचे चल वा अचल मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारे ति-हाईत व्यक्तीचा हक्क निर्माण होईल असे पाऊल उचलू नये असा आदेश झालेला आहे.परंतु मा.उच्च न्यायालयाने मागील वर्षाचे म्हणजे दि.01/11/2013 ते दि.31/10/2014 मुदतीसाठीचे जनरल स्नानगृह सोसायटीस चालविणेस देणेबाबतचे लिव्ह □ण्ड लायसन्स मुदतवाढीचे सिव्हिल □प्लीकेशन नं. 3686/2014 मध्ये दि.02/05/2014 रोजी दिलेल्या आदेशानुसार (Considering day today management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decisions. ) मा.त्रिसदस्यी समितीची मान्यता घेऊन मुदतवाढ देता येईल.असा मा.कोर्टाचा आदेश झालेला आहे याबाबी विचारात घेता.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.ऑप सोसायटी लि.शिर्डी यांचे दि.24/09/2014 रोजीचे पत्रास अनुसरुन सोसायटीस जनरल स्नानगृह (पिंपळवाडी रोड लगत) पुढिल एक वर्षाकरीता मागील मासिक परवाना फी रु.10,000/-(अक्षरी रु.दहा हजार मात्र) मध्ये 10% वाढ करुन (10,000 X 10% = 1000 + 10,000 = 11,000) रक्कम रु.11,000/-(अक्षरी रु.अकरा हजार मात्र) व विद्युत बील-मीटर प्रमाणे वेगळे आकारुन गरम पाणी पुरविणेचे व्यवसाय दि.01/11/2014 ते दि.31/10/2015 या एक वर्षाच्या कालावधीसाठी मुदत वाढ देता येईल.पुढिल विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को. ऑप. सोसायटी, शिर्डी यांना जनरल स्नानगृह (पिंपळवाडी रोड लगत) या व्यवसायास दि.०१.११.२०१४ ते दि.३१.१०.२०१५ या कालावधीसाठी पुर्वीचेच अटी/ शर्तीवर मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन व विद्युत बील मीटर रीडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१९ वाहन क्र.एमएच-१७/ व्ही-८४८३ चे अपघात बाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील वाहन क्र. एमएच**-17/**व्ही**-8483 (**महिंद्रा झायलो**)** चा वापर संस्थानचे कार्यालयीन कामाकरीता करण्यात येत आहे. सभाकामकाज विभागाचे मागणीनुसार, सदर वाहन दि**.28/08/2014** रोजी सभाकामकाज विभागाचे, श्री सतिष कासार, श्री कांदळकर, कामगार अधिकारी, श्री. नवले सा ो . यांनी मा.जिल्हाधिकारी कार्यालय येथे मिटींग कामी घेवुन जाणे करीता श्री बाळु रायभान काळे (कायम वाहन चालक) यांना पाठविण्यात आले होते.

अहमदनगर येथुन शिरडीला येतेवेळी अ.नगर-मनमाडरोडवर राहुरी फॅक्टरीजवळ गुंजाळनाका येथे रात्री **07.00** वाजता रस्त्याचे डावे बाजुने एक ट्रॅक्टर अचानक रोडवर आला व रोड क्रॉस करण्याचा प्रयत्न केला परंतु ट्रॅक्टर चालकास ट्रॅक्टर कंट्रोल न करता आलेने तो संस्थान वाहनावर येवुन आदळला त्यामुळे संस्थान वाहन रोडडिव्हायडरवर जाऊन आदळले. ट्रॅक्टर संस्थान वाहनावर आदळल्यावर सदर ट्रॅक्टर चालक ट्रॅक्टर अपघातस्थळापासुन ट्रॅक्टर घेवुन पळुण गेला. सदर अपघात बाबत वाहन चालक, श्री बाळु रायभान काळे यांनी तातडीने कार्यालयास दुरध्वनीवरुन कळविले. सदर अपघातात वाहनातील कोणीही जखमी झालेले नाही. तसेच अपघाताबाबत राहुरी पोलीस स्टेशन, राहुरी यांना खबर दिली.

अपघात झालेनंतर राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, श्री सुनिल पाटील व पोलीस हेड कॉंस्ट्रेबल, श्री खोंडे हे घटनास्थळी हजर झाले. त्यावेळी त्यांना अपघात पंचनामा करुन संस्थान वाहन राहुरी कारखाना येथील पेट्रोल पंपावर लावले.

दि.**29/08/2014** रोजी सदरचे वाहन शिरडी येथे परत आणल्यानंतर विमाधारक कंपनीचे सर्व्हेयर यांना अपघातग्रस्त वाहनाचा सर्व्हे केला यामध्ये वाहनाचे बोनेट, हेडलाईट, फ्रन्ट शो, शॉकअब्सर सस्पेंशन रॉड, निअर आर्म, फेन्डर, रेडीएटर असेम्बली, बॉल जॉईट, भंपर ब्रॅकेट फ्रंट, क्रॉसमेंबर इ. पार्टचे नुकसान झालेले आहे.

सदर अपघात बदल दि.**29/08/2014** रोजी दि न्यु इंडीया श्युरन्स कंपनी लि. यांना सुचनापत्र दिलेले असुन दि.**02/09/2014** रोजी कागदपत्रांची पुर्तता करुन नुकसान भरपाई पोटी अपघात विमा क्लेम केलेला आहे. वाहन क्र. एमएच-**17**/व्ही-**8483** ची दुरुस्ती करीता श्री साई सर्व्हिस सेंटर, साकुरी यांना दाखविले असता वाहन दुरुस्ती करीता अंदाजे रु.**1,20,328/-** पर्यंत खर्च येणार असलेचे सोबतचे कोटेशनद्वारे कळविलेले आहे.

वाहन दुरुस्तीचा खर्च सुरुवातीस संस्थानला करावा लागणार असुन, विमा कंपनीचे नियमानुसार क्लेम मंजुर झाल्यानंतर रक्कम संस्थान खाती जमा होणार आहे.

तरी वाहन क्र. एमएच-**17**/व्ही-**8483** चे दुरुस्तीचे काम साई सर्व्हिस सेंटर, साकुरी यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणाऱ्या रु.**1,20,328/-** पर्यंतचे खर्चास मान्यतेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.९०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागाकडील वाहन क्र. एमएच-17/व्ही-8483 चे दुरुस्तीचे काम साई सर्व्हिस सेंटर, साकुरी यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणाऱ्या रु.1,20,328/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------

**विषय नं.२० संस्थानला प्राप्त होणा-या मौल्यवान खड्यांचे (Precious Stones) मुल्यांकनकारांची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला दक्षिणापेटीव्दारे देणगी स्वरूपात येणा-या मौल्यवान खडयांचे (Precious Stones) व मौल्यवान खडयांचे दागीन्यांची तपासणी करणेकामी नेमणूक करणेत आलेल्या मुल्यांकनकारांची मुदत संपुष्टात आलेने याकामी नव्याने मुल्यांकनकारांची नेमणूक करणेकरीता मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २६ जून २०१४ रोजीचे सभेतील **निर्णय क्र.५४९** अन्वये संस्थानला प्राप्त होणारे मौल्यवान खडे व मौल्यवान खडयांचे दागीने यांचे मुल्यांकन आणि त्याअनुषंगाने करावयाचे कामकाजासाठी मुल्यांकनकाराची नेमणूक करणेकामी विहित पध्दतीने वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात येऊन, आयकर/अबकारी विभागाकडून मान्यता असलेले किंवा सरकार मान्य प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांचेकडून मुल्यांकनाची दरपत्रके मागविण्यात यावी असे ठरले होते. त्यानुसार याकामी जनसंपर्क कार्यालयामार्फत जाहिरात देण्यात आलेली असून त्यात याकामी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० ऑगष्ट २०१४ पर्यंत ठेवण्यात आलेली होती. याकामी ७ दरपत्रके आलेली असून ती दिनांक ११ सप्टेंबर २०१४ चे सभेत उघडण्यात आली असून निर्णय क्र.७९५ नुसार त्याबाबतचा तपशिलवार तक्ता व्यवस्थापन समितीचे पुढील सभेत अंतिम निर्णयासाठी सादर करावा असे ठरले आहे.

खडयांचे मुल्यांकन करणेकामी आलेल्या दरपत्रकांचा सविस्तर तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला असून त्यातील महत्वाची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | सराफाचे नाव व गांव | कामाचा अनुभव | अपेक्षित मानधन |
|---|---|---|---|
| ०१ | श्री ज्वेलर्स,संगमनेर | १६ वर्षे (गोल्ड व्हॅाल्युअर) | ------- |
| ०२ | मेघना ज्वेलर्स, नवी मुंबई | ------- | रू.१५,००,०००/- |
| ०३ | साई गोल्ड अॅण्ड स्टुडेड ज्वेलरी, बॅंगलोर | १० वर्षे | मोफत |
| ०४ | डॉ.सी.ए.रत्नपारखी, राहुरी फॅक्टरी | २० वर्षे | रू.१००, रू.२५०, रू.३५०, रू.५०० |
| ०५ | पानजेम इन्टरप्राईजेस, पुणे | ३२ वर्षे | रू.९५/- प्रती नग + सर्व्हिस टॅक्स |
| ०६ | रिटाज जेम्स, ताडदेव मुंबई | २५ वर्षे | रू.८०/- प्रती नग + सर्व्हिस टॅक्स<br>१) मे.निल व्हाईट |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | एक्सपोर्ट प्रा.लि.<br>२) मे.प्रदिप कुमार जेव्हारी |
| ०७ | सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स मुंबई | ४० वर्षे | रू.८१/- प्रती नग + सर्व्हिस टॅक्स |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त दरपत्रकांचा विचार करता अ.नं. १ श्री ज्वेलर्स, संगमनेर हे गोल्ड व्हॅलुअर असल्याने त्यांचा सोने चांदी कस लावून तपासणे कामी सराफांच्या नेमणुकीकरीता विचार करण्यात यावा. अ.नं.२ मेघना ज्वेलर्स नवी मुंबई यांचे मानधन रू.१५ लाख मात्र असलेने त्यांचा या नेमणुकीकरीता विचार करता येणार नाही. अ.नं.४ डॉ.सी.ए.रत्नपारखी राहुरी फॅक्टरी यांचे दर खडयांचे वर्गवारीनूसार वेगवेगळे असलेने त्यांचा हिशोब करून मानधन देणे किचकट होईल. उर्वरीत अ.नं.०३ हे मोफत काम करणार असून ०५ ते ०७ या चार व्हॅल्युअर यांना त्यांनी दिलेल्या दरांऐवजी विचारणा करून प्रति खडा ७५/- रूपये अधिक सर्व्हिस टॅक्स इतके मानधन मान्य असल्यास त्यांचे पैकी दोघांना प्रती तिन महिन्यांनतर आलटून पालटून बोलावून त्यांचेकडून मौल्यवान खडे जड जवाहिर तपासणीचे काम करून घेता येईल. सदर व्हॅल्युअर यांची नेमणूक एका वर्षाकरीता असावी असे वाटते.

तरी उपरोक्त उर्वरीत अनं.०३ यांना मोफत व ०५ ते ०७ यांना त्यांनी दिलेल्या दरांऐवजी विचारणा करून प्रति खडा ७५/- रूपये अधिक सर्व्हिस टॅक्स इतके मानधन मान्य असल्यास त्यांचे पैकी दोघांना प्रती तिन महिन्यांनतर आलटून पालटून बोलावून त्यांचेकडून मौल्यवान खडे जड जवाहिर तपासणीचे काम करून घेणे बाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.९०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

-----------------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------

**विषय नं.२१ श्री साई चरित्र पोथीमध्ये शब्दकोश समाविष्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ मधील १७ (२) (ठ) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे. श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार– प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

या तरतुदीनुसार संस्थानमार्फत साईभक्तांना साईबाबांचे जीवनावर प्रकाशने उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

श्री शरद कृष्णाजी मेहेर, अहमदनगर यांनी दि.२४.०९.२०१४ चे पत्रान्वये त्यांचे सदगुरुतुल्य डॉ. वि.मा.पागे उज्जैन हे पी.एच.डी. (मराठी) असून त्यांनी श्री साई सच्चरित मराठी पोथीतील समजण्यांस कठीण अशा शब्दांचा शब्दकोश तयार केला आहे. सदरचा शब्दकोश संस्थानमार्फत प्रकाशित होणा-या श्री

साईसच्चरित मराठी पोथीत  हा शब्दकोश समाविष्ट झाल्यास त्याचा उपयोग वाचकांस होईल असे कळविले आहे.

संस्थान प्रकाशित श्री साई चरित्र रचनेचा काळ आज पासून ८३ ते ९० वर्षे जुना असल्यामुळे आणि पोथीचे रचनाकार कै. हेमाडपंत संस्कृत आणि भारतीय तत्वज्ञानाचे मर्मज्ञ-जाणकार असल्याने पोथीमध्ये असंख्य प्रचूर आणि समजण्यांस कठीण शब्द आहेत असे नमुद केले आहे.

श्री साईबाबांचे जीवनावरील कै.गोविंद रघुनाथ दाभोळकर कृत मुळ श्री साईसच्चरित- मराठी पोथी संस्थानमार्फत प्रकाशित करुन साईभक्तांना विक्रीसाठी काऊंटरवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर पोथीचा उपयोग साईभक्तांना पारायण करणेसाठी होतो.

संस्थानमार्फत सदर शब्दकोश समाविष्ट करावयाचा झाल्यास श्री साईसच्चरित मराठी पोथीचे ५३ अध्याय एकूण ७४४ पानानंतर शब्दकोषाचे २६५ पाने सामाविष्ट करता येतील किंवा स्वतंत्ररित्या श्री साई चरित्र पोथीतील मराठी शब्दकोश नावाचे पुस्तक संस्थानमार्फत प्रकाशित करुन भक्तांना उपलब्ध करुन देता येईल.

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.वि.मा.पागे, उज्जैन (पी.एच.डी.मराठी) यांनी तयार केलेल्या श्री साईचरीत्रातील ओव्यांमधील शब्दांचे सोप्या भाषेत रुपांतर केलेल्या मराठी शब्दकोशाच्या प्रतीची विश्वकोष मंडळ, महाराष्ट्र शासन यांचेकडून पडताळणी करुन घेण्यात यावी व त्यानंतर प्रस्ताव सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२२ श्री साईबाबा संस्थानचे साईटेक प्रकल्पाचे महाराष्ट्र शासनामार्फत करण्यात आलेल्या Third Party Audit Report ची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव:** 1) दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.799.

2) दिनांक 08/01/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 46.

**प्रास्ताविक :** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 799 नुसार माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना प्रकल्प उभारणीसाठी दिनांक 09/12/2009 चे अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. साईटेक प्रकल्प कार्यान्वीत करण्याची कार्यवाही

अंतिम टप्यात असल्याने प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या अडचणी व इतर अनुषांगीक विषयावर चर्चा करणेकामी मा.व्यवस्थापन समीतीचे समवेत आयटी कमीटी व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक दि.15/03/2014 रोजी आयोजीत करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये साईटेक प्रकल्पाचे Third Party Audit बाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे -

साईटेक प्रकल्पातील संगणकीय प्रणालीचे कामकाजाचे, पुर्ण प्रकल्पाचे आणि मुल्यांकणाचे, महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभाग यांचे मदतीने व मार्गदर्शनानुसार Third Party Audit करणेबाबत, तसेच याकामी महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागास पत्र देणेकामी सुचीत करण्यात आलेले आहे.

त्यानुसार दि.10/07/2014 चे मंजुर टिपणी अन्वये दि.28/07/2014 नुसार मा. श्री.राजेश अग्रवाल सोा.,प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई यांना श्री साईबाबा संस्थानचे साईटेक प्रकल्पातील संगणकीय प्रणालीचे कामकाजाचे, पुर्ण प्रकल्पाचे आणि वाढीव खर्चाबाबत मुल्यांकणाचे Third Party Audit करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार माहिती तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी श्री मुकेश सोमकुंवर कक्ष अधिकारी (Section Officer,Technical), DIT, Govt.,of Maharashtra व संस्थानचे आयटी कमीटी सदस्य, अशिष उपाध्ये, Senior Consultant, SEMT, DIT, Govt.,of Maharashtra, पुर्वा पाटील, Project Manager, Mahaonline ltd., यांनी दि. 14/08/2014 ते 16/08/2014 या कालावधीत शिरडी येथे येऊन साईटेक प्रकल्पाचे Third Party Audit केलेले असुन त्यांनी Third Party Audit चा अहवाल दि.25/08/2014 चे ई-मेलव्दारे कळविला असुन आपले माहितीसाठी सोबत जोडला आहे.

परंतु, सदर प्रकल्पावर माहिती व कायद्याचे अधिकारात श्री संजय काळे, कोपरगाव यांनी सदर प्रकल्पाची किंमती विषयी आक्षेप घेतलेला असुन त्यांनी याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना पत्र पाठवुन प्रकल्प मुंल्याकणाचे Third Party Audit करणेस विनंती केली आहे. सदर पत्राची प्रत व याबाबत सविस्तर अहवाल शासनास सादर करणेकामी विधी व न्याय विभागाने दि. 26/08/2014 चे पत्रान्वये विचारणा केली आहे. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्रान्वये व माहिती व कायद्याचे अधिकारात श्री संजय काळे, कोपरगाव यांनी सदर प्रकल्पाची किंमती बाबत घेतलेल्या आक्षेपासंदर्भात महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागाने केलेल्या Third Party Audit मध्ये प्रकल्पाच्या मुल्यांकणासंदर्भात कुठलाही खुलासा केला नसल्याचे दिसुन येत आहे.

विधी व न्याय विभागाने दि. 26/08/2014 चे पत्राची प्रत व संबंधीत कागदपत्रे महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागाने केलेल्या Third Party Audit प्रतिनिधी श्री मुकेश सोमकुंवर कक्ष अधिकारी व संस्थानचे आयटी कमीटी सदस्य यांना दि. 04/09/2014 चे ई-मेलव्दारे पाठवुन त्यांना प्रकल्पाचे

मुल्यंाकणाविषयी आपला अभिप्राय दि.25/08/2014 चे ई-मेलव्दारे पाठविण्यात आलेल्या Third Party Audit मध्ये नमुद करुन Third Party Audit Report संस्थानचे दि.28/07/2014 चे पत्रास अनुसरुन मा. कार्यकारी अधिकारी सोा., श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांना पाठविण्यात यावा असे दि. 04/09/2014 चे ई-मेलव्दारे कळविण्यात आले आहे.

याबाबत महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागाने Third Party Audit केलेल्या प्रतिनिधी श्री मुकेश सोमकुंवर कक्ष अधिकारी व संस्थानचे आयटी कमीटी सदस्य यांनी दि. 16/09/2014 चे ई-मेलनुसार It is suggest that complete project details can be shared which includes, hardware and software procurement, network deployment, no of application development, data centre with DR creation and manpower deployment.Operation and management of the entire project for 69 months after go live.These details will provide bifurgation of the cost involved.Further details about payment made till date and reasons for holding balance payable payment. विधी व न्याय विभागास प्रकल्पाचे उपरोक्त नमुद तपशिलासह सविस्तर माहिती पाठविण्यात यावी, असे सुचविले आहे. परंतु ,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांचे संगणकीकरण (साईटेक) प्रकल्पाबाबत विधी व न्याय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुबंई यांना जा.नं. एसएसएसटी /आयटी / 3602/2011 दि. 10/10/2011 रोजीचे पत्रान्वये यापुर्वी कळविण्यात आले आहे.

श्री साईबाबा संस्थानचे साईटेक प्रकल्पातील संगणकीय प्रणालीचे कामकाजाचे, पुर्ण प्रकल्पाचे आणि मुल्यांकणाचे तसेच कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी दिनांक 05/04/2014 रोजीचे पत्रान्वये मागणी केलेल्या वाढीव रक्कमेबाबत मा. प्रधान सचिव सो., माहीती तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुबंई यांचे मदतीने व मार्गदर्शनानुसार Third Party Audit बाबतचा अहवाल संस्थानला प्राप्त झाला असुन सदर अहवालाची नोंद मा. व्यवस्थापन समीतीचे सभेमध्ये घेण्यात यावी.

**मागणी :** मा.व्यवस्थापन समीतीचे दि.08/01/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 46 नुसार साईटेक प्रकल्पातील संगणकीय प्रणालीचे कामकाजाचे, पुर्ण प्रकल्पाचे आणि मुल्यांकणाचे तसेच कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी दिनांक 05/04/2014 रोजीचे पत्रान्वये मागणी केलेल्या वाढीव रक्कमेबाबत मा. प्रधान सचिव सोा., माहीती तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुबंई यांचे मदतीने व मार्गदर्शनानुसार Third Party Audit करण्यात आले असुन याबाबतचा अहवाल संस्थानला ई-मेलव्दारे प्राप्त झाला असुन सदर अहवालाची नोंद मा. व्यवस्थापन समीतीचे सभेमध्ये घेण्यात यावी, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** तांत्रिक,आर्थिक व कायदेशीर.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :** श्री साईबाबा संस्थानचे साईटेक प्रकल्पातील संगणकीय प्रणालीचे कामकाजाचे, पुर्ण प्रकल्पाचे आणि मुल्यांकणाचे तसेच कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी दि.05/04/2014 चे पत्रान्वये मागणी केलेल्या वाढीव रक्कमेबाबत मा. प्रधान सचिव सो., माहीती तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुबंई यांचे मदतीने व मार्गदर्शनानुसार Third Party Audit करण्यात आले असुन याबाबतचा अहवाल संस्थानला ई-मेलव्दारे प्राप्त झाला असुन सदर अहवालाची नोंद. मा. व्यवस्थापन समीतीचे सभेमध्ये घेणेचे मान्यतेस्तव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.९०७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानमधील साईटेक प्रकल्पाचे महाराष्ट्र शासनामार्फत करण्यात आलेल्या Third Party Audit Report ची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्राज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.२३ Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांचेमार्फत मोबाईल व वेबसाईट Online Darshan सुविधेद्वारे मिळणा-या रॉयल्टी/ देणगीबाबत.**

**प्रस्ताव- अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :**1) मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 13/02/2011 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 57. 2) मा. व्यवस्थापन समितीचे दि. 05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 399.

**प्रास्ताविक:** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 13/02/2011 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 57 अन्वये Vistaas Digital Media Limited., Mumbai यांना मोबाईलवर ऑनलाईन दर्शन सुविधा श्री साईभक्तांचे सेवेकामी तीन वर्षाकरीता सुरु करणेस मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार त्यांना दि. 07/03/2011 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता. श्रींचे मोबाईलवरील ऑनलाईन दर्शन सुविधा पुरविणेस Vistaas Digital Media Private Limited यांना देण्यात आलेल्या दि. 07/03/2011 चे कार्यादेशाची मुदत दिनांक 21/03/2014 अखेर संपुष्टात आली असल्याने निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सदर सुविधा कार्यादेशातील तिसऱ्या वर्षाच्या दरानुसार चालु ठेवणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 05/06/2014 रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर पुढील कालावधीकरीता जी उच्चत्तम रॉयल्टी ठरेल तो दर Vistaas Digital Media Private Limited यांना रॉयल्टी स्वरुपात संस्थानला द्यावा लागेल, या अटीवर श्रींचे मोबाईलवर लाईव्ह दर्शन सुविधा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत Vistaas Digital Media Private Limited यांचेमार्फत चालु ठेवणेत यावी व त्यांना लेखी कळविणेत यावे, असे ठरले. त्यानुसार संबंधीत कंपनीस दि.06/06/2014 व दि.11/08/2014 रोजीचे ई-मेल व्दारे कळविण्यात आले असुन त्यांनी सदर दर देणेस दि.06/06/2014 व

दि.11/08/2014 चे ई-मेलव्दारे त्यांनी तयारी दर्शविली आहे. सदरकामी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही होणेकामी विविध पुरवठाधारकांकडुन दि.08/10/2014 अखेर पुढील तीन वर्षाकरीता दर निश्चित करणेकामी ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत.

त्यानुसार दि.23/08/2014 चे ई-मेलव्दारे Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांना रक्कम रुपये 66,55,000/- मात्र (दि. 21/12/2014 अखेर) देणगी स्वरुपात तातडीने दि. 07/03/2011 कार्यादेशाचे अधिन राहुन संस्थान खाती RTGS व्दारे तातडीने जमा करणेबाबत कळविले आहे. त्यास त्यांचे प्रतिनिधी श्री राज यांनी दुरध्वनीव्दारे यांनी सहमती दर्शविली असुन, सदर रक्कम दि. 27/08/2014 चे ई-मेल अन्वये दि. 27/09/2014 अखेर संस्थान खाती RTGS व्दारे जमा करणार असल्याचे कळविले होते.

परंतु Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांनी मोबाईलवरील श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधेकामी येणे बाकी असलेली रक्कम रुपये 66,55,000/- मात्र (दि. 21/12/2014 अखेर दि. 07/03/2011 चे कार्यादेशानुसार) व वेबसाईट वरिल लाईव्ह दर्शन सुविधेकामी येणे बाकी असलेली रक्कम रुपये 3,00,000/- मात्र (दि.31/11/2014 अखेर दि. 18/07/2011 चे कार्यादेशानुसार) असे एकुण रक्कम रुपये 69,55,000/- मात्र त्यांनी दि. 27/08/2014 चे ई-मेल व पत्राव्दारे दि.27/09/2014 अखेर भरण्याचे नमुद केले होते. परंतु त्यांनी सदर रक्कम दि. 29/09/2014 अखेर न भरल्याने त्यांची मोबाईल व वेबसाईटवरील श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा उत्सव काळात भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणुन दिनांक 06/10/2014 पासुन बंद करण्यात यावी तसेच सदर कंपनीचे नाव Black List मध्ये समाविष्ट करण्यात येऊन संस्थानचे विधी विभागामार्फत कंपनीवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

**मागणी:** Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांचेकडे मोबाईल व वेबसाईटवरील श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधेकामी प्रस्तावीकात नमुद केलेली रक्कम त्यांनी दि. 27/08/2014 चे ई-मेल व पत्राव्दारे दि.27/09/2014 अखेर भरण्याचे नमुद केले होते. परंतु त्यांनी सदर रक्कम दि. 29/09/2014 अखेर न भरल्याने त्यांची मोबाईल व वेबसाईटवरील श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा उत्सव काळात भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणुन दिनांक 06/10/2014 पासुन बंद करण्यात यावी तसेच सदर कंपनीचे नाव Black List मध्ये समाविष्ट करण्यात येऊन संस्थानचे विधी विभागामार्फत कंपनीवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :**आर्थिक, तांत्रिक व कायदेशीर.

**विभागाचा अभिप्राय :** Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांचेकडे मोबाईलवरील श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधेकामी येणे बाकी असलेली

रक्कम रुपये 66,55,000/- मात्र (दि. 21/12/2014 अखेर दि. 07/03/2011 चे कार्यादेशानुसार) व वेबसाईट वरील लाईव्ह दर्शन सुविधेकामी येणे बाकी असलेली रक्कम रुपये 3,00,000/- मात्र (दि.31/11/2014 अखेर दि.18/07/2011 चे कार्यादेशानुसार) असे एकुण रक्कम रुपये 69,55,000/- मात्र दि. 27/09/2014 अखेर संस्थान खाती RTGS व्दारे जमा न झाल्याने त्यांची मोबाईल व वेबसाईटवरील श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा उत्सव काळात भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणुन दिनांक 06/10/2014 पासुन बंद करण्यात यावी तसेच सदर कंपनीचे नाव Black List मध्ये समाविष्ट करण्यात येऊन संस्थानचे विधी विभागामार्फत कंपनीवर कायदेशीर कार्यवाही होणेचे मान्यतेस्तव व सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.९०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांना रॉयल्टी/ देणगी रक्कम संस्थानकडे जमा करणेसाठी १५ दिवसांची (२३.१०.२०१४ अखेर) मुदत देणेत यावी. १५ दिवसांमध्ये (२३.१०.२०१४ अखेर) त्यांनी सदरहू रक्कम जमा केली नाही तर त्यांचेवर कार्यवाही करणेसाठी त्यांचेबरोबरच्या करारनाम्यातील पॅनल्टी, अरबीट्रेशन वगैरे कलमे तपासून सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्राज्ञान विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२४ अॅक्टर दिनो मोरीया यांचे www.ibhakti.com या संकेतस्थळाद्वारे श्री साईबाबांचे प्रसाद विक्रीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**प्रास्ताविक :** संस्थानची www.shrisaibabasansthan.org ही अधिकृत वेबसाईट माहे 1999 पासून भक्तांचे सेवेसाठी सुरु करण्यात आली आहे. या वेबसाईटमध्ये वेळोवळी बदल करुन ती सध्या इंग्रजी, मराठी व हिंदी अशा मुख्य तीन भाषेमधून प्रसारित करण्यात आली आहे. आपल्या अधिकृत वेबसाईटवर सर्व प्रकारच्या भाषेतील श्री साईचरित्र अपलोड करण्यात आले असल्याने, श्री साईभक्तांना त्यांच्या मायबोलीतून श्री साईंचे चरित्राचे पारायण करणे शक्य झाले आहे. संस्थानच्या प्रकाशीत होणारे सर्व साईलीला अंक वेबसाईटवर प्रकाशीत केले जातात. वेबसाईटवर संस्थानच्या विविध उपक्रमांची अद्यावत माहिती उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे श्रींचे मुळ छायाचित्रांसहीत विविध प्रासंगीक सध्याचे छायाचित्रे प्रसारित करण्यात येत असल्याने, श्री साईभक्तांचा आपली वेबसाईट पाहण्यासाठी उत्तम प्रतिसाद लाभत आहे. संस्थानच्या वेबसाईटला नियमित भेट देणाऱ्या साईभक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

दिनांक 12/09/2014 रोजीचा ई-मेलनुसार Actor Dino Morea यांनी www.ibhakti.com या संकेतस्थळावर प्रसाद विक्री व श्रींना प्रसाद अर्पन

करतांना थेट प्रक्षेपण सुविधा पुरविण्यात येत आहे. त्यांनी सदर ई-मेलव्दारे www.ibhakti.com या संकेतस्थळाव्दारे श्री सिध्दीविनायक गणपती मंदिर, लालबाग राजा (चतुर्थीचे दिवशी) या ठिकाणी प्रसाद विक्री व प्रक्षेपण सुरु करण्यात आल्याचे नमुद केले आहे. तसेच यापुढे साईबाबा संस्थानने प्रसाद विक्रीकामी परवानगी दिल्यास सदर सेवा www.ibhakti.com या संकेतस्थळाव्दारे All cost of service and the % sharing are pre decided with the Temple through a written contract करुन श्रींसाईबाबांचे प्रसाद विक्री करता येईल, असे नमुद केले आहे.

परंतु सदर प्रस्तावाचे अवलोकन करता संस्थानचे https://online.sai.org.in या संकेतस्थळावर भक्तांना दर्शन /आरती, रुम बुकींग, साईलीला पुस्तीका व इतर संस्थान संबंधीची सर्व आवश्यक ती माहिती श्रींचे भक्तांचे सोईसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा भक्तासाठी मोफत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच वेगवेगळया Platform (मोबाईल, टि.व्ही.चॅनेल, इंटरनेट, डी.टी.एच. इ.) वरती श्रींचे लाईव्ह दर्शन प्रक्षेपित करणेकामी संस्थानचे विहित पध्दतीने निविदा धारकांकडुन देणगी स्वरुपात स्विकारुन सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. तसेच संस्थान हे सेवार्थ असल्याकारणाने संस्थानने यापुर्वी श्रींचे प्रसाद विक्री बाबत इतर कोणत्याही खाजगी संस्थेशी व्यवहार केलेला नाही.Actor Dino Morea यांचे वेबसाईटवर (www.ibhakti.com) संस्थानची प्रसाद विक्री करण्यासाठी त्यांना अधिकृत प्रतीनीधीत्व दिल्यास भक्तांचा गैरसमज निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

**मागणी :** Actor Dino Morea यांचे वेबसाईटवर (www.ibhakti.com) संस्थानची प्रसाद विक्री करण्यासाठी अधिकृत प्रतीनीधीत्व त्यांना देणे उचित ठरणार नाही. यापुर्वी www.onlineprasad.com या खाजगी संस्थेने परस्पर लाडु प्रसाद विक्री सुरु केली होती. सदर www.onlineprasad.com या संकेतस्थळावर संस्थानचे विधी विभागामार्फत कायदेशीर कार्यवाही सुरु आहे. www.ibhakti.com यांना प्रसाद विक्रीची परवानगी दिल्यास इतर संस्था वेबसाईटव्दारे प्रसाद विक्रीसाठी मागणी करतील किंवा परस्पर विक्री सुरु करतील त्यावर कोणतेही नियत्रंण ठेवणे शक्य होणार नाही, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :** Actor Dino Morea यांचे www.ibhakti.com या संकेतस्थळावर त्यांनी श्री साईबाबांचे प्रसाद विक्रीबाबत मागणी केल्याने संस्थान हे सेवार्थ असल्या कारणाने संस्थानने यापुर्वी श्रींचे प्रसाद विक्रीबाबत इतर कोणत्याही खाजगी संस्थेशी व्यवहार केलेला नसल्याने

सदरहु विषय मा. व्यवस्थापन समीतीपुढे सादर करणेचे मान्यतेस्तव सविनय सादर

**निर्णय क्र.९०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, अॅक्टर दिनो मोरीया यांच्या www.ibhakti.com या संकेतस्थळाप्रमाणे श्रींचा प्रसाद विक्री करणेकामी इच्छूक असणा-या इतरही संकेतस्थळांचा समावेश होणेकामी संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत यावी व त्यानुसार सर्व इच्छुकांचा एकत्रित प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

**तसेच, संस्थानच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत अशा प्रकारचे उपक्रम साईभक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत, त्यासाठी संस्थानचे संकेतस्थळ अद्ययावत करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्राज्ञान विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२५ आयटी कमिटीचे अध्यक्ष, सदस्य यांच्या नेमणुका व कालावधीबाबत तसेच श्री.विजय मंडोरा, तांत्रिक सल्लागार, अहमदाबाद यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :** 01. दिनांक 20/05/2008 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 439.

02. दिनांक 06/09/2008 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 640.

03. दिनांक 19/07/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 650.

04. दिनांक 17/09/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 705.

05. दिनांक 11/09/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 775.

**प्रास्ताविक :** श्री. विजय मंडोरा यांची आयटी कमिटी मध्ये नेमणुक नसुन श्री. विजय मंडोरा यांची तांत्रिक सल्लागार म्हणून केलेली नियुक्तीची मुदत दिनांक 30 जुन, 2014 रोजी संपुष्टात आलेली असल्याने श्री. विजय मंडोरा यांनी तांत्रिक सल्लागार पदाची मुदतवाढ पुढील पाच वर्षाकरीता मिळणेकामी त्यांनी दि. 30/06/2014 रोजीचे पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार, सदर प्रस्ताव दिनांक 11/09/2014 रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला होता.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 11/09/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 775 अन्वये सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन आयटी कमिटी अध्यक्ष,

सदस्य यांच्या नेमणुका व कालावधीसह सविस्तर फेरप्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

त्यानुसार आयटी कमिटी अध्यक्ष व सदस्य यांच्या करण्यात आलेल्या नेमणुका व कालावधीचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे.:-

| अ. न. | आयटी कमिटी प्रतिनिधीं चे नाव | पदनाम | कामाचे स्वरुप | नियुक्तीचा कालावधी | मा. व्यवस्थापन समितीचा ठराव |
|---|---|---|---|---|---|
| 01. श्री के. व्ही. रमणी | शिरडी साई ट्रस्ट,चैन्नई. | अध्यक्ष आयटी कमिटी | Consultancy/ Senior Technical Consultant/ Technical Advice on saitech Project | नियुक्ती कालावधी दि.01/10/2008 ते दि.30/09/2013 जा.न. एसएसएसटी/आयटी /14654/2008 दि. 06/10/2008 रोजी कार्यादेश देण्यात आला | मा.व्यवस्थापन समितीचे दि. 06/09/2008 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 734 नुसार श्री के.व्ही. रमणी ,चैन्नई यांची कोणत्याही प्रकारचे मानधन न देता नेमणुक करणेच्या मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. |
| | | | | मुदतवाढ - दि. 01/10/2013 ते दि. 30/09/2015 जा.न. एसएसएसटी/आयटी / 3312/2013 दि. | मा. व्यवस्थापन समितीचे दि. 17/09/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 705 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | 23/10/2013 रोजी कार्यादेश देण्यात आला. | अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. |
| 02. | श्री. युसुप मोहम्मद, व्ही.पी. □न्ड हेड ऑफ बीझनेस कॉग्नीझंट , चैन्नई. | आय टी कमि टी सद स्य | To Provide the vision, direction and guidance to implement the most efficient & effective IT System for Sansthan. | माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि. 12/01/2010 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये जा.न. एसएसएसटी/ आयटी/878/ 2010 दि. 13/01/2010 रोजी Mid (जुन 2011 अखेर) नेमणुक करण्यात आली. | नाही. |
| 03. | श्री. एस. व्यकटरम णी, हेड ऑफ इंडीया बीझनेस, कॉग्नीझंट , मुंबई. | आय टी कमि टी सद स्य | To Provide the vision, direction and guidance to implement the most efficient & effective IT System for Sansthan. | माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि. 12/01/2010 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये जा.न. एसएसएसटी/आयटी /878/2010 दि. 13/01/2010 रोजी Mid (जुन 2011 अखेर) नेमणुक करण्यात आली. | नाही. |
| 04. | श्री. एस चंद्राशेखर न, प्रेसीडंट □न्ड मॅनेंजींग डायरेक्टर, कॉग्नीझंट | आय टी (स्टेरीं ग) कमि टी सद स्य | To Provide the vision, direction and guidance to implement the most efficient & effective IT System for Sansthan. | माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि. 12/01/2010 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये जा.न. एसएसएसटी/आयटी /878/2010 दि. 13/01/2010 रोजी Mid (जुन 2011 अखेर) नेमणुक | नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | करण्यात आली. | |
| 05. | श्री. एम के. सन्थानारामण, चैन्नई | आयटी (स्टेरींग) कमिटी सदस्य | To Advice the IT Comm.of Sansthan as a Honorary Advisor, especially in commercial and legal matters. | माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि. 19/03/2010 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये जा.न. एसएसएसटी/आयटी /5176/2010 दि. 26/03/2010 रोजी Mid (जुन 2011 अखेर) नेमणुक करण्यात आली. | नाही. |
| | | | Technical Advice/consultancy on saitech Project | मुदतवाढ - श्री के.व्ही. रमणी, चैन्नई यांनी दि. 28/10/2013 रोजीचे पत्रान्वये श्री. एम के. सन्थानारामण, चैन्नई यांना आयटी डव्हायझरी कमिटीचे सदस्य म्हणुन नेमणुक पत्र देणे बाबत कळवीले. दि. 01/04/2014 ते दि. 31/03/2015 जा.न. एसएसएसटी/आयटी / 2200/2014 दि. 05/08/2014 रोजी कार्यादेश देण्यात आला. | मा. व्यवस्थापन समितीचे दि. 15/03/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 236 अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. |
| 06 | श्री.राजीव वैष्णव, व्हाईस प्रेसीडेंट | आयटी (स्टेरींग) | Technical Advice/consultancy on saitech Project | श्री के.व्ही. रमणी, चैन्नई यांनी दि. 28/10/2013 रोजीचे पत्रान्वये श्री.राजीव वैष्णव, | मा. व्यवस्थापन समितीचे दि. 15/03/2014 रोजीचे सभेतील |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | नास्कॉम, मुंबई | कमिटी सदस्य | | यांना आयटी ॲडव्हायझरी कमिटीचे सदस्य म्हणुन नेमणुक पत्र देणे बाबत कळवीले. त्यानुसार त्यांना दि. 01/04/2014 ते दि. 31/03/2015 जा.न. एसएसएसटी/आयटी/ 2201/2014 दि. 05/08/2014 रोजी कार्यादेश देण्यात आला. | निर्णय क्रं. 236 अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. |
| 07 | श्री. मुकेश सोमकंुवर, कक्ष अधिकारी (तांत्रिक) माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुबंई | Member of Sansthan IT Comm | Honorary member of the IT Committee and give your valuable advice and guidance, for the implementation of Information Technology in Shri Saibaba Sansthan, Shirdi, for a period of 3 years. | श्री के.व्ही. रमणी, चैन्नई यांनी दि. 13/03/2014 रोजीचे ई-मेलनुसार श्री. मुकेश सोमकुवर, कक्ष अधिकारी (तांत्रिक) माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुबंई यांना संस्थान आयटी कमिटीचे सदस्य म्हणुन नेमणुक पत्र देणे बाबत कळवीले. त्यानुसार त्यांना जा.न. एसएसएसटी/ आयटी/ 3934/2014 दि. 21/03/2014 रोजीचे तारखेपासुन | मा. व्यवस्थापन समितीचे दि. 15/03/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 236 अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पुढील तीन वर्षाकरीता कार्यादेश देण्यात आला आहे. | |

परंतु दि. 28/02/2013 रोजीचे मा. कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे पत्रान्वये साईबाबा संस्थानने श्री. के. व्ही. रमणी. यांची आय. टी. ॲडव्हायझरी कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करताना त्यास शासनाची मान्यता घेणे उचित ठरले असते. तथापि, संस्थाने शासनाची मान्यता न घेता परस्पर नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला होता. भविष्यात अशाप्रकारे नियुक्ती करण्यापूर्वी त्यास शासनाची मान्यता घेण्याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश दिलेले आहेत.

व्यवस्थापन समितीचे दि.17/09/2013 रोजीचे सभेत मा. विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना माडंल्या व त्या निर्णय क्रं. 705 अन्वये मान्य करण्यात आल्या- मा श्री के.व्ही रमणी, चैन्नई हे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नामांकित व्यक्ती व एक निस्सीम साईभक्त असुन त्यांची दि.06/09/2008 रोजीचे सभेतील निर्णय क्रं 734 अन्वये संस्थानमध्ये राबविले जात असलेल्या साईटेक प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणुन दि.30/09/2013 पर्यत कोणत्याही प्रकारचे मानधन न देता नेमणुक करण्यात आलेली आहे. सदरहु मुदत संपुष्टात येत असुन साईटेक प्रकल्पाचे काम अद्याप बाकी असल्याने मा. श्री.के.व्ही. रमणी, अध्यक्ष, तांत्रिक सल्लागार समिती यांना दि. 30/09/2013 पासुन पुढे दोन वर्ष मुदतवाढ देणे विचाराधीन आहे.

परंतु विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुबंई यांनी दि. 28/02/2013 चे पत्रान्वये च्श्री साईबाबा संस्थानने श्री.के.व्ही.रमणी यांची आयटी अध्यक्ष ॲडव्हायझरी कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करताना त्यास शासनाची मान्यता घेणे उचित ठरले असते, तथापी संस्थानने शासनाची मान्यता न घेता परस्पर नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला होता. भविष्यात अशा प्रकारे नियुक्ती करण्यापुर्वी त्यास शासनाची मान्यता घेण्याची दक्षता घेण्यात यावीछ, असे सुचविले.

मा.श्री.के.व्ही. रमणी , चेन्नई, यांची तांत्रिक सल्लागार समितीच्या अध्यक्ष पदाची नविन नेमणुक नसुन त्यांच्या नेमणुकीस मुदतवाढ द्यावयाची आहे. तसेच, या प्रकल्पासाठी वाढीव खर्च येत असल्यास तांत्रिक वस्तुंच्या मुल्यांकणासाठी आवश्यकतेनुसार स्वतंत्र कन्सल्टंट नेमण्यात यावा.यास अनुसरुन पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

मा.श्री. के.व्ही.रमणी,चेन्नई यांची तांत्रिक सल्लागार समितीच्या अध्यक्ष पदाची मुदत दि. 30/09/2013 रोजीच संपुष्टात येत असुन साईटेक प्रकल्पाचे काम बाकी असल्याने मा. श्री.के.व्ही. रमणी चेन्नई, यांना त्यांची मुदत संपुष्टात येत असलेच्या कालावधीपासुन पुढे दोन वर्षाकरीता आहे त्याच अटी/शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी.

आयटी कमीटीचे अध्यक्ष श्री के. व्ही. रमणी व सदस्य यांचे नेमणुकीबाबत तसेच त्यांचे मुदतवाढीबाबत शासनाची कुठलीही परवानगी घेण्यात आलेली नाही. संबंधीत विषयी माहिती व कायद्याचे अधिकारात श्री संजय काळे यांनी दि. 15/07/2014 व दि.29/07/2014 रोजीचे पत्राव्दारे महाराष्ट्र शासनास याबाबत आपली पुर्व परवानगी न घेता व्यवस्थापन समितीचे दि. 17/09/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 705 अन्वये श्री के.व्ही. रमणी यांना दि. 30/09/2015 अखेर मुदतवाढ देण्यात आली आहे, असे निदर्शनास आणले आहे.

**मागणी:** माहिती तंत्रज्ञान विभागासाठी आवश्यक असणाऱ्या व आयटी क्षेत्रातील कुठलाही तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करतांनी खालील अटी/ शर्तींचा तसेच संस्थानचे दृष्टीने आवश्यक असणाऱ्या बाबींचा समावेश असावा, असे नम्र मत आहे.

1. Scope of work to provide technical advice in following areas -
   i. Networking & network security.
   ii. Data security.
   iii. Internet Broadband, Proxy server.
   iv. Database & domain control servers.
   v. Web Hositing Administration, Development & Upcoming broadband Website.
   vi. Present software systems.
   vii. Computerization of present manual systems in various departments.
   viii. Training to Technical Staff.
2. During Consultant each visit, you have to submit the status report in each area to the IT dept.
3. No honorarium will be paid from Sansthan to Consultant for the said work.
4. Consultant and its company can't participate in any tender process with Sansthan.
5. Stage wise onsite verification and certification of Hardware, Software, Networking, and Infrastructure etc procured in any project as per agreement/Sow with vendors.
6. As per approved realese plan, monitoring activity and plan for compliance of same.
7. Any issue arising of non-completion of project or Non-performance or Non-SLA performance or any such situation; where sansthan had to take legal action then all documentation need to submit to sansthan with appropriate format to take legal action on vender.
8. Approval for payment based on SLA on their compliance as per agreement.
9. If any addition of cost (RFC) required for this project need to evaluate and approved as per IT industry norms.
   Consultant Have to attend quartly meeting which will be held in shirdi.

**संस्थान अधिनियम ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छानणी करुन अनुमान :** शासन निर्देश

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:** उपरोक्त प्रस्तावातील नमुद केलेप्रमाणे आयटी कमीटीचे अध्यक्ष श्री के. व्ही. रमणी व सदस्य यांचे नेमणुकीबाबत तसेच मुदतवाढीबाबत शासनाची कुठलीही परवानगी घेण्यात आलेली नाही. महाराष्ट्र शासनाचे दि. 28/02/2013 रोजीचे पत्रानुसार, श्री. विजय मंडोरा यांचे मुदतवाढीसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घेणेकामी त्यांना उपरोक्त संदर्भीय टिपणी सोबतचे कागदपत्रे व ई-मेल सह पाठविणेकामी सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.९१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आयटी कमीटीचे अध्यक्ष व सदस्य यांचे नेमणुकीबाबत संस्थानचा स्पष्ट अभिप्राय देऊन, त्यांची नेमणूक रद्द करण्याचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना पाठविण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२६ साईटेक प्रकल्प सद्यस्थिती व कॉग्नीझंट यांचेकडून प्राप्त झालेले पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत मा.श्री.के.व्ही.रमणी सो. यांचे मार्गदर्शनाखाली साईटेक प्रकल्प उभारणीचे काम हाती घेण्यात आलेले आहे. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या कार्यप्रणाली कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संबधीत विभागांमध्ये कार्यान्वीत करुन दिलेल्या आहेत.

करारनाम्यानुसार साईटेक प्रकल्पातील सर्व कार्यप्रणाली ह्या अठरा (18) महिन्यांच्या कालावधीत, एकुण सहा टप्प्यांमध्ये कार्यान्वीत करण्यात येणार होत्या. मुळ करारनाम्यानुसार प्रकल्प जानेवारी 2010 ला सुरु होऊन जुन 2011 पुर्ण होणे अपेक्षित होते. परंतु सुरवातीच्या काळात आलेल्या विविध अडचणींमुळे उदा-सर्व्हर रुमच्या जागेतील बदल, फायबर केबल टाकणेकामी रस्त्याच्या कडेने असलेल्या दुकाने व रहदारी यांची अडचण इ. कारणास्तव प्रकल्प निर्धारीत वेळेत पुर्ण करणे अशक्य झाले होते. प्रकल्पासाठी तयार करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे व श्री साईबाबा संस्थान यांना सहमतीने निर्धारीत वेळेत बदल करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार प्रकल्प उभारणीचे कामास सुरवातीस 13/03/2013 व 30/08/2013 अशी मुदतवाढ घेण्यात आलेली असून त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे.

करारनाम्यानुसार प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील पहिली कार्यप्रणाली संस्थानने स्वीकारलेनंतर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना त्यांचे दरमहा पेमेंट संस्थानने करणे गरजेचे आहे. साईटेक प्रकल्पातील पहिली कार्यप्रणाली 01 ऑगष्ट 2011 रोजी स्वीकारण्यात आलेली आहे, सबब कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना करारनाम्यानुसार ऑगष्ट 2011 पासून पेमेंट अदा करण्यात येत आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून प्रकल्प उभारणीचे कामात विलंब झाल्याने करारनाम्यानुसार त्यांचे माहे जानेवारी 2013 ते ऑगष्ट 2013 चे पेमेंटमधून 7% रक्कम राखीव ठेवण्यात आलेली होती, सदरची रक्कम व माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर 2013 चे पेमेंट मा.व्यवस्थापन समितीचे दि. 15/03/2014 चे निर्णय क्रं. 262 अन्वये त्यांना अदा कराण्यात आलेली आहेत.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे दि. 26/08/2014 रोजीचे पत्राव्दारे त्यांना दि.01/09/2014 अखेर रक्कम रुपये 2,22,26,960/- मात्र न मिळाल्यास सपोर्ट व डेव्हलपमेंट दि. 01/09/2014 पासून बंद करणार असल्याचे त्यांनी नमुद केले होते. सदरचे पत्र अवलोकनार्थ तथा पुढील आदेशास्तव सादर केले असता त्यावर सर्व संबधीताचंी बैठक घेण्यात यावी, असे नमुद केलेले आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना दि. 17/07/2014 रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. 591 नुसार माहे डिसेंबर 2013 ते फेब्रुवारी 2014 च्या बीलच्या एकुण रकमेच्या 75% रक्कम त्यांना अदा करण्यात आलेली आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे दि. 04/09/2014 रोजीचे पत्राव्दारे त्यांना डिसेंबर 2013 ते फेब्रुवारी 2014 च्या बीलच्या राखीव ठेवलेली 25% रक्कम रु. 20,83,778/- व माहे मार्च ते जुलै 2014 च्या बीलांची रक्कम रु. 1,38,91,850/- अशी एकुण रक्कम रु. 1,59,75,628/- सात दिवसांचे आत मिळावी अशी विनंती केलेली आहे. सदरचे बीलांची रक्कम सात दिवसाचे आत न मिळाल्यास दि. 26/08/2014 रोजीचे पत्रानुसार डेव्हलपमेंट व सपोर्टचे काम थांबविण्यात येईल, असे या पत्रात नमुद केलेले आहे.

दि. 08/09/2014 रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे कक्षात कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधी व आयटी विभाग यांची बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये कॉग्नीझंट यांचेकडून वेळोवेळी येणाऱ्या पेमेंटसंदर्भातील पत्राबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती मा.उपकार्यकारी अधिकारी सो. यांनी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंट अदा करणेसाठीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला असून, यापुढे संस्थानला अशा स्वरुपाची पत्र पाठवू नये असे निर्देश कॉग्नीझंट यांचे प्रतिनीधींना दिलेले आहेत.

माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि. 02/09/2014 चे टिपनीन्वये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे मार्च 2014 ते जुलै 2014 बीले, तसेच माहे डिसेंबर 2013 ते फेब्रुवारी 2014 पर्यंतच्या बीलांची राहीलेल्या 25% रकमेबाबत निर्णय होणेसाठी, सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे ऑगष्ट 2014 चे बील दि. 13/09/2014 रोजी इकडील विभागास प्राप्त झालेले आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून आतापर्यंत पुढीलप्रमाणे कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत.

**नेटवर्क -**

साईटेक प्रकल्पाअंतर्गत विविध विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली ह्या सर्व्हरला जोडण्यासाठी पुढीलप्रमाणे नेटवर्कची उभारणी करण्यात आलेली आहे.

1. कॅट-6 केबलद्वारे विविध विभागांमध्ये एकुण 349 डेटा पॉईंट कार्यरत करण्यात आलेले आहेत.

2. शिर्डीमधील संस्थानचे विविध इमारतीमध्ये असलेल्या विभागांना जोडण्यासाठी फायबर केबलद्वारे दोन मार्गांची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. काही कारणांमुळे पहिला मार्ग बंद पडल्यास कार्यप्रणाली तात्काळ दुसऱ्या मार्गावार चालू करण्यात येतात.

3. फायबर केबलचे दोन्ही मार्ग काही कारणास्तव बंद पडल्यास Wi-Max या तंत्रज्ञानाचा उपयोग करुन कार्यप्रणाली कार्यरत ठेवण्याची तजवीज केलेली आहे.

4. संस्थानचे मुंबई, बैंगलोर, सिकंदराबाद व चेन्नई येथील कार्यालय व्हीपीएन या तंत्रज्ञानाचा उपयोग करुन सर्व्हरला जोडलेली आहेत.

हार्डवेअर -

प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून पुढीलप्रमाणे हार्डवेअर संस्थानला प्राप्त झालेले आहे.

1. संगणक - 168
2. संगणक (Dual Monitor) - 16
3. लॅपटॉप - 15
4. सर्व्हर - 16
5. किऑस्क (टच स्क्रीन) - 06
6. युपीएस - 26 (विविध क्षमतेचे)
7. प्रिंटर्स - 118

**डेटा सेंटर -**

प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत आलेल्या कार्यप्रणाली सुरळीत चालाव्यात व सर्व माहिती सुरक्षित राहावी या करीता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत अद्यायावत तंत्रज्ञानाचा आयटी विभागामध्ये उपयोग करुन डेटा सेंटरची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर डेटा सेंटरमध्ये पुढीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

1. फायर डिटेक्शन
2. फायर सप्रेशन
3. बायोमॅट्रीक व कार्ड रिडर आसेस कंट्रोल

काही तांत्रिक कारणांमुळे सदरचे डेटा सेंटर बंद पडल्यास कार्यप्रणाली चालू राहण्यासाठी डीआर सेंटरची उभारणी साईआश्रम 1 या ठीकाणी करण्यात आलेली आहे.

**<u>सॉफ्टवेअर -</u>**

करारनाम्यानुसार एकुण 37 कार्यप्रणाली साईटेक प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी विकसीत करुन विविध विभागात कार्यान्वीत करावयाच्या आहेत. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सदरच्या 37 कार्यप्रणालीसह संस्थानचे मागणीनुसार ऑनलाईन सर्व्हिसेस हि अतिरीक्त कार्यप्रणाली अशा एकुण 38 कार्यप्रणाली संबधीत विभागात कार्यान्वीत करुन दिलेल्या आहेत. ऑनलाईन सर्व्हिसेसद्वारे आजपोवतो अंदाजे 24,99,817 साईभक्तांनी विविध सेवांचा लाभ घेतलेला असून, त्याद्वारे एकुण रक्कम रु. 59,45,07,548/- ऑनलाईन संस्थानचे खात्यात जमा झालेले आहेत. कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | कार्यप्रणाली | सद्यस्थिती |
|---|---|---|
| 1 | अकाऊंट | अकाऊंट विभागात चालणाऱ्या सर्व व्यवहारांची नोंद सध्या कार्यप्रणालीमध्ये घेण्यात येत आहे.<br>नविन कार्यप्रणालीमध्ये ट्रायल बॅलंस व डेडस्टॉक संदर्भातील कार्यवाही अंतिम टप्प्यात असून 24/09/2014 पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे. |
| 2 | प्रसादालय | चालू आहे. |
| 3 | खरेदी | कार्यप्रणालीमध्ये 2013-14 चे पुरवठा आदेशासंदर्भात कार्यवाही विभागाने सुरु केलेली आहे.<br>वार्षिक खरेदीसाठी विविध विभागांनी त्यांचे प्रस्ताव कार्यप्रणालीमधून खरेदी विभागास पाठविलेले आहेत. सदर प्रस्तावांचर पुढील कार्यवाहीसाठी कार्यप्रणालीमध्ये अपेक्षित सुधारणा करण्याची कार्यवाही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून चालू आहे. |
| 4 | भांडार | विविध विभाग त्यांच्या मागणीपत्रकांची नोंद कार्यप्रणालीमध्ये घेत आहेत.<br>खरेदी विभागाकडून आवक घेण्याची कार्यवाही पुर्ण झालेनंतर सदरचा साठा भांडार विभागास कार्यप्रणालीमध्ये दिसणार आहे. |
| 5 | रुम रिझर्वेशन | चालू आहे. |
| 6 | दर्शन पास | चालू आहे. |
| 7 | चेक / डीडी | चालू आहे |

| | | |
|---|---|---|
| 8 | देणगी कार्यालय | चालू आहे. |
| 9 | पगारबील | चालू माहे नोव्हेंबर 2013 ते जुलै 2014 पर्यंतची कार्यवाही समांतर पद्धतीने कार्यप्रणालीमध्ये करण्यात आलेली आहे.<br>उपरोक्त कार्यवाही करताना आलेल्या अडचणी तथा सुधारणा कॉग्नीझंट यांना कळविलेल्या असून, त्यांनी सदरच्या अडचणी तथा सुधारणा 24/09/2014 पर्यंत पुर्ण करण्याचे कळविलेले आहे.<br>ऑगष्ट 2014 ची माहिती भरण्याचे काम सुरु आहे.<br>वेतन निश्चिती, फरक बीले, 100 बिंदु नामावली संदर्भातील कार्यवाही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून चालू आहे. |
| 10 | कामगार | कार्यप्रणालीमध्ये कर्मचाऱ्यांच्या रजासंबधी माहिती भरण्याचे काम चालू आहे.<br>विभागाने कार्यप्रणालीसंदर्भात काही सुधारणा तथा बदल सुचविलेले आहेत. त्यातील काही बदल तथा सुधारणा तांत्रिकदृष्ट्या शक्य होणार नाही असे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी कळविलेले आहे. |
| 11 | लाडू प्रसाद | कार्यप्रणाली पुर्ण झालेली असून काही रिपोर्टचे काम कॉग्नीझंट यांचेकडून चालू आहे. |
| 12 | मनी ऑर्डर | चालू आहे. |
| 13 | टेलिफोन बीलींग | चालू आहे. |
| 14 | कॅंटीन | चालू आहे. |
| 15 | इन्फॉर्मेशन फॉर सिनीअर ऑफीसर्स | चालू आहे. |
| 16 | इनवर्ड / आऊटवर्ड | इनवर्ड चालू आहे.<br>आउटवर्ड कार्यप्रणाली पुर्ण, वापर अद्याप सुरु झालेला नाही. |
| 17 | भक्तमंडळ सभासद | चालू आहे. |
| 18 | प्रकाशने | चालू आहे. |
| 19 | साईलीला | डेटा मायग्रेशनचे काम कॉग्नीझंट यांचेकडून चालू आहे. |
| 20 | विद्युत विभाग | चालू आहे. |
| 21 | किऑस्क | चालू आहे. |
| 22 | विधी विभाग | चालू आहे. |
| 23 | सभा कामकाज | चालू आहे. |

| | | |
|---|---|---|
| 24 | वाहन विभाग | चालू आहे. |
| 25 | पाणी पुरवठा | चालू आहे. |
| 26 | कापड कोठी / विक्री | चालू आहे. |
| 27 | बांधकाम | चालू आहे. |
| 28 | गेस्ट ईन्फॉर्मेशन | चालू आहे. |
| 29 | वैद्यकिय अनुदान | कार्यप्रणाली पुर्ण झालेली असून युजरने तपासली आहे. डेटा मायग्रेशनचे काम पुर्ण झालेनंतर प्रत्यक्ष वापर सुरु होईल. |
| 30 | एमआयएस | सर्व कार्यप्रणालींचा पुर्ण वापर सुरु झालेनंतर सदर कार्यप्रणाली विकसीत करण्यात येणार आहे. तुर्त कार्यान्वीत झालेल्या काही कार्यप्रणालींच्या रिपोर्ट कार्यप्रणालीमध्ये विकसीत करण्यात आलेले आहेत. |
| 31 | संरक्षण विभाग | चालू आहे. |
| 32 | शैक्षणिक संकुल | आयटीआय विभागात वापर सुरु आहे. कन्या विद्या मंदिर, इंग्लिश मेडीअम स्कूल विभागाने |
| 33 | उत्सव | चालू आहे. |
| 34 | इंटीग्रेशन वुईथ एचएमएस | एचएमएस हि कार्यप्रणाली संस्थान (रुग्णलये) मार्फत सुरु केलेनंतर सदरची कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात येणार आहे. |
| 35 | ओल्ड डेटा मायग्रेशन | साईलीला/वैद्यकिय अनुदान वगळता पुर्ण झालेले आहे. |
| 36 | Proxy & Email integration/setup | पुर्ण झालेले आहे. |
| 37 | रेकॉर्ड | चालू आहे. |
| 38 | दर्शन पास-2 | सदरची कार्यप्रणाली नविन दर्शन लाईन पुर्ण झालेंनतर कार्यान्वीत करण्यात येणार आहे. |
| 39 | ऑनलाईन सर्व्हिसेस | चालू आहे. |

कॉग्नीझंट यांनी आजपर्यंत सर्व कार्यप्रणाली संबधीत विभागांमध्ये कार्यान्वीत करुन दिलेल्या आहेत. कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालीपैंकी अकाऊंट, खरेदी, भांडार, पगारबील, कामगार, लाडू प्रसाद या कार्यप्रणालींबाबत काही पुर्तता करण्याचे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून चालू आहे. सदरच्या कार्यप्रणालींचा उपयोग सध्या प्रायोगिक तत्वावर समांतर पद्धतीने चालू आहे. तसेच सर्व कार्यप्रणाली वापरत असताना येणाऱ्या अडचणी तथा आवश्यक बदल कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना वेळोवेळी कळविण्यात येत आहेत, व त्या सोडविण्याचे काम कॉग्नीझंट यांचेकडून चालू आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि. 15/03/2014 चे सभेतील निर्णय क्रं. 262 तसेच दि. 17/07/2014 चे सभेतील निर्णय क्रं. 591 नुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी कार्यप्रणालीमध्ये असणा-या सर्व त्रुटींचे निरसण केलेनंतर त्यांना पुढील पेमेंट करण्यात यावेत, असे निर्देश देण्यात आलेले होते. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत कार्यप्रणालीतील त्रुटींचे निरसन करण्याचे काम चालू आहे. आजमितीस पगारबील व अकाऊंट विभागाच्या कार्यप्रणाली वगळता सर्व कार्यप्रणालीतील अत्यावश्यक त्रुटींचे निरसन करण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली आहे. कार्यप्रणाली वापरत असताना येणा-या नविन अडचणी तसेच आवश्यक बदल यामुळे अगोदर दिलेल्या त्रुटींचे निरसन करण्यास विलंब होत असल्याचे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून सांगण्यात येते.

पगारबीलाचे कार्यप्रणालीत सद्यस्थितीत मासिक पगाराचे प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या असून, आजपोवतो जुलै-2014 चे पगारबीलाची प्रक्रिया कार्यप्रणाली पुर्ण करण्यात आली असून ऑगष्ट-2014 ची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. 7 वा वेतन आयोग व इतर वेतन निश्चिती व शंभर बिंदू नामावली यासंदर्भातील कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करण्यात येईल, असे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून सांगितलेले आहे.

संस्थानचे विनंतीनुसार माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्रकल्पाचे 14/08/2014 ते 16/08/2014 या काळात शिर्डी येथे येऊन Third Party Audit केलेले आहे. सदर कामी माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनीधी श्री.मुकेश सोमकुवर, श्री.अशीश उपाध्याय व पुर्वा पाटील यांनी कॉग्नीझंट व आयटी विभाग यांचे समवेत संस्थानचे सर्व विभागांना भेट देऊन तेथे कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींचे अवलोकन केले व संबधीत कर्मचारी व अधिकारी यांचेशी कार्यप्रणालीबाबत समक्ष चर्चा केलेली आहे. Third Party Audit चा रिपोर्ट इकडील विभागास दि. 25/08/2014 रोजी ई-मेलद्वारे पाठविलेला आहे. सदर अहवालामध्ये प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली सर्व संबधीतांनी वापरणे आवश्यक असल्याने संबधींतांना वापरासंबधी सक्ती करण्यात यावी, असे कळविलेले आहे. तसेच कार्यप्रणाली वापरत असताना येणाऱ्या अडचणी कॉग्नीझंट यांनी त्वरीत सोडवाव्यात व आवश्यक तेथे कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात यावे, असेही सुचित केलेले आहे.

तसेच संस्थानचे विनंतीवरून लेखापरिक्षक अभयशास्त्री अँड असोसिएटस् यांनी शिर्डी येथे येऊन अकाऊंट विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालीची पाहणी करुन त्याचा अहवाल संस्थानला दिलेला होता. मा.उपकार्यकारी अधिकारी सा ो. यांचे निर्देशानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधी, अकाऊंट विभाग व आयटी विभाग यांनी दि. 16/09/2014 रोजी

एकत्रित सदर अहवालावर चर्चा केलेली आहे. अहवालामध्ये नमुद केलेल्या बहुतेक बाबींचे या अगोदरच निरसन झालेले असल्याचे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधींनी निदर्शनास आणून दिलेले आहे. अहवालात नमुद केलेले बाबींपैकी ट्रायल बॅलंस व डेडस्टॉक संबधीचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे.

अकाऊंट विभागाचे कार्यप्रणालीमध्ये प्रामुख्याने ट्रायल बॅलंस व डेडस्टॉक संदर्भात काही अपुर्तता आहेत, त्याबाबतची कार्यवाही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून चालू आहे. Third Party Audit रिपोर्ट व लेखापिरक्षक अभय शास्त्री यांचा रिपोर्ट यामध्ये सदरची पुर्तता झालेनंतर आवश्यक रिपोर्टची जुळणी करुन पुर्ण कामकाज नविन कार्यप्रणालीमध्ये करण्यास हरकत नाही, असे कळविलेले आहे.

ऑनलाईन सर्व्हिसेसला साईभक्तांचा लक्षणीय प्रतिसाद लाभत असल्याने सुरवातीस याकामी कार्यान्वीत करण्यात आलेल्या सर्व्हरची क्षमता अपुरी पडू लागली. सबब, साईभक्तांना सदर सुविधेचा लाभ घेण्यास अनेक अडचणी येऊ लागल्या. सबब कार्यप्रणालीसाठी वापरण्यात येणारी रिलायंस कंपनीची 2 एमबीपीएसच्या लिंकऐवजी बीएसएनएल ची 10 एमबीपीएस लिंक संस्थानमार्फत कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. बीएसएनएलची 10 एमबीपीएसची काही कारणास्तव बंद पडल्यास कार्यप्रणाली अखंड कार्यान्वीत राहावी यासाठी एअरटेल कंपनीची 512 केबीपीएसची लिंक घेण्यात आलेली आहे. एअरटेल कंपनीची 512 केबीपीएस लिंक अपग्रेड करुन 10 एमबीपीएस करणे कामी आयटी कमिटी अध्यक्ष मा.श्री.के.व्ही.रमणी सो. यांनी देणगीस्वरुपात एक वर्षाकरिता कपंनीस पुरवठा आदेश दिलेला आहे. कार्यप्रणाली सुरळीत चालावी व साईभक्तांना विनासायास या सुविधेचा लाभ घेता यावा, यासाठी मा.श्री.के.व्ही.रमणी सो. यांनी देणगीस्वरुपात उच्च क्षमतेचे दोन सर्व्हर दिलेले असून कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत ते कार्यान्वीत करण्यात आलेले आहेत.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत सद्यस्थितीत देणगी काऊंटर, रुम रिझर्वेशन, प्रसादालय कुपन विक्री, कॅन्टीन कुपन विक्री, प्रकाशने विभाग, भक्तमंडळ सभासद, जनसंपर्क कार्यालय, कापड कोठी/विक्री, ऑनलाईन सर्व्हिसेस व माहिती केंद्रे या सारखी साईभक्तांना द्यावयाच्या थेट सेवे संदर्भातील कार्यप्रणाली कार्यरत आहेत. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी त्यांचे संदर्भ क्रं. 1 चे पत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे डेव्हलपमेंट व सपोर्टचे कामकाज दि. 30/09/2014 पासून थांबविल्यास सदरच्या कार्यप्रणालीबाबत अडचण निर्माण होऊन ऐन उत्सवकाळात साईभक्तांची गैरसोय होऊ शकते.

तसेच कॉग्नीझंट कंपनीकडून करुन घ्यावयाची इतर कामेही उदा. ICICI बँक गेटवे व स्वीपींग मशीन कार्यान्वीत करणे, लाडू विक्री कार्यप्रणाली, श्रींना अर्पण करावयाच्या वस्त्राबाबतची कार्यप्रणाली, तेल-तुपाच्या रिकामे डबे, भक्तनिवासस्थान येथील कार्यप्रणाली प्रलंबीत राहण्याची शक्यता आहे.

साईटेक प्रकल्पाचा आढावा घेणेसाठी दर आठवड्याच्या बुधवारी दुपार 12.00 वा कां◌ॅफ्रंस कॉल घेतला जातो. सदरच्या कॉलमध्ये आयटी कमिटी अध्यक्ष मा.श्री.के.व्ही.रमणी सो., कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधी व संस्थानचे आयटी विभाग यांचा सहभाग असतो. दि. 17/09/2014 रोजी, मा.श्री.के.व्ही.रमणी सो. यांनी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना दि. 23/08/2014 पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व त्रुटींचे निरसण दि.30/09/2014 पर्यंत करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

उपरोक्तप्रमाणे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे सपोर्ट व डेव्हलपमेंट बंद करण्यासंदर्भीचे प्राप्त झालेले पत्रे व साईटेक प्रकल्पाची सद्यस्थिती, अवलोकनार्थ तथा पुढील आदेशास्तव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.९११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना मुदतवाढ देऊनही त्या कालावधीमध्ये काम पुर्ण केलेले नाही, त्यामुळे त्यांच्या पत्राची दखल घेण्यात येऊ नये. सदरहू पत्र दप्तरी दाखल करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्राज्ञान विभागप्रमुख)

-------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२७ साईटेक प्रकल्पाचे कामकाजासंबंधीचा Support व Development कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी बंद केल्यास खालील पर्यायी व्यवस्था राबविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** 17 (1) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्र.799.

**प्रास्ताविक :** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयांनुसार, माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना प्रकल्प उभारणी साठीचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. साईटेक प्रकल्प एकुण 6 टप्प्यामध्ये कार्यान्वीत करण्यात येणार आहे.

करारनाम्यानुसार, प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील पहिली कार्यप्रणाली संस्थानने स्विकारल्यापासून 18 महिन्याच्या कालावधीत साईटेक प्रकल्प उभारणीचे काम पुर्ण करावयाचे होते. परंतू नटवर्क व केबलींगचे कामासाठी वेळ लागल्याने तसेच कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांचे नेटवर्कींगचे व केबलींगचे साहित्य वेळेत न आल्याने अशा विविध अडचणींमुळे प्रकल्प निर्धारीत वेळेत पुर्ण करणे अशक्य झालेले होते. साईटेक करारनाम्यानुसार, कॉग्नीझंट कंपनी व श्री साईबाबा संस्थान यांना सहमतीने निर्धारीत वेळेत बदल करण्याचा अधिकार (Clause No.4.1 प्रमाणे) आहे. या अधिकारास अनुसरुन, कॉग्नीझंट कंपनीने सादर केलेल्या Revised Deployment Plan ला दिनांक 18/07/2012 रोजीच्या मा.त्रीसदस्यीय समितीच्या सभेतील निर्णय क्रं. 626 अन्वये, दि.

31/03/2013अखेर मान्यता देण्यात आलेली होती. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी विहित वेळेत संगणक प्रणालींसंबंधिचे कामे पूर्ण करणे गरजेचे होते. परंतू त्यानी सदरची कामे पूर्ण न केल्याने दिनांक 26/07/2013 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. 611 अन्वये दिनांक 31/08/2013 अखेर व मा. व्यवस्थापन समितीचे दि. 15/03/2014 रोजीचे सभेत दि. 30/04/2014 पर्यंत सदर प्रकल्पाचे कामकाज व प्रकल्पातील विकसित करण्यात आलेल्या सर्व प्रणालीेंचे त्रुटी पुर्ण करुन सर्व प्रणाली सुरळीत करणेसाठी वाढीव मुदत देण्यात आलेली होती.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 15/03/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 262 अन्वये दिनांक 30/04/2014 अखेर या कार्यप्रणालीतील सर्व अडचणींचे निरसन करु आणि यापुढे समाधानकारक सेवा देऊ अशी ग्वाही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधींनी मा. अध्यक्ष महोदय व सदस्य यंाना दिली. परंतु सदर कालावधीत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडुन कार्यान्वीत करण्यात आलेल्या प्रणालीतील त्रुटींची अपुर्तता असल्याने त्यांना देण्यात येणारे मासिक बीले थांबवीण्यात आली आहे. सदरवेळी तरी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी सदरची कामे विहित वेळेत करणे गरजेचे होते. सदर तीन्ही वेळेस मुदतवाढ देतांना कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यंाचे प्रतिनिधी यांचेशी चर्चा करुन मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर संगणक प्रणालींमध्ये असणाऱ्या त्रुटी /उणीवांबाबतची माहिती वेळोवेळी ई-मेलव्दारे तसेच Eventum व्दारे त्यांना देण्यात आलेली आहे.

परंतु कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी संदर्भीय ई-मेल केलेल्या त्रुटींबाबत संस्थानचे दैनंदिन कामकाजासाठी अत्यावश्यक असलेल्या त्रुटी त्यांनी सोडवीणेऐवजी त्यांनी त्यांचे रिपोर्ट मध्ये Future Requirement (एकुण त्रुटी संख्या 32) व Not applicable (एकुण त्रुटी संख्या 155) तक्त्यामध्ये नमुद केले आहे. उर्वरित सर्व विभागांचे मिळुन 45 त्रुटी अद्यापी सोडवीणे बाकी असुन त्यावर कार्यवाही सुरु असुन सदर त्रुटी लवकरात लवकर सोडवुन देऊ, असे त्यांनी नमुद केले आहे. तसेच साईटेक प्रोजेक्टसाठी सर्व काही Support देणेचे तयारी असल्याचे त्यांनी नमुद केले आहे. तसेच त्यांनी महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधींनी प्रकल्पाचे Third Party Audit केले असुन त्यात 32 कार्यप्रणाली लाईव्ह असल्याचे रिपोर्ट मध्ये नमुद केले आहे.

विविध विभागांचे संगणकीय प्रणाली परंतु कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडुन कार्यान्वीत करण्यात आलेल्या प्रणालीतील त्रुटींची अपुर्तता अभावी थांबवीण्यात आलेले बीले अदा झालेली नसल्याने इतर Vendor चे बीले आमचेकडुन अदा करण्यात आलेली नसुन Vendor केंव्हाही Support काढुन घेईल व त्यास कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे हे जबाबदार राहणार नसुन संस्थानने प्रलंबीत बीलाची रक्कम तात्काळ द्यावी जेणेकरुन कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे हे संस्थानला Continue Service देणार असल्याचे त्यांनी

संदर्भीय ई-मेलमेध्ये नमुद केले आहे. तसेच सदर विषयासंबंधी चर्चा करणेकामी मा. कार्यकारी अधिकारी सोा., यांचेसमोर मिटींग आयोजीत करुन आमची सद्यपरिस्थिती बाबत भेट घेणेबाबतचे मत नमुद केले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.26/09/2014 रोजीचे सभेत मा. अध्यक्ष सोा., यांनी चर्चेअंती साईटेक प्रकल्प कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी मध्येच Support व Development चे कामकाज सोडल्यास नविन निविदाधारक मिळेपर्यंत पर्यायी व्यवस्था असणे गरजेचे असल्याचे नमुद केले आहे. त्यानुसार खालील प्रमाणे पर्यायी व्यवस्थेबाबत कार्यवाही त्वरीत सुरु करता येईल, असे नम्र मत आहे.

**[अ]** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्पाची कार्यवाही कामी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. परंतु कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी त्यांचे बीले अदा झाले नाही तर प्रकल्पासंबंधीचे Support व Development चे कामकाज थांबवीणे कामी पत्र दिले होते. परंतु मा. अध्यक्ष सोा., यांनी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी साईटेक प्रकल्पाचे कामकाज थांबवील्यास पर्यांयी व्यवस्था कशा प्रकारे करता येईल, याबाबत सविस्तर अहवाल सादर करणेचे निर्देश दिले होते. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यंानी साईटेक प्रकल्पाचे Support व Development चे कामकाज थांबविल्यास खालील उपाययोजना राबविण्याची कार्यवाही तातडीने सुरु करता येईल.

**==>** मा.व्यवस्थापन समीतीचे दिनांक 08/01/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 48 नुसार साईटेक प्रकल्पासाठी मानधन तत्वावर प्रस्तावातील नमुद तंत्रज्ञाची सदरकामी किमान दोन वर्षाकरीता नेमणुक करणेकामी वर्तमान पत्रामध्ये तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी, असे ठरले व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

==> परंतु मा. व्यवस्थापन समीतीचे दिनांक 15/03/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 283 नुसार मुद्दा क्रं. 10 अन्वये साईटेक प्रकल्पासाठी मानधन तत्वावर तंत्रज्ञ नेमणेकामी मा.व्यवस्थापन समीतीचे दिनांक 08/01/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 48 नुसार भरावयाचे तांत्रिक पदे तुर्त भरु नयेत. साईटेक प्रकल्पाची कार्यवाही पुर्ण झालेनंतर यावर यथा - योग्य ती कार्यवाही विभागास आवश्यकता वाटल्यास करण्यात यावी .

==> उपरोक्त विषयासंबंधी मा.व्यवस्थापन समीतीचे दिनांक 15/03/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 283 (मुद्दा क्रं. 11) नुसार साईटेक प्रकल्प आढावा बैठकीत सविस्तर चर्चा होऊन साईटेक प्रकल्पाची व्याप्ती व दिवसेंदिवस माहिती तंत्रज्ञानातील होणारे बदल विचारात घेता साईटेक प्रकल्प व्यवस्थापनाचे सर्व कामकाज भविष्यात संस्थानचे विहित पध्दतीने Out Source करण्यात यावे, असे निर्देश देऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समीतीचे दिनांक 15/03/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 283 (मुद्दा क्रं. 11) साईटेक प्रकल्पाची व्याप्ती व दिवसेंदिवस माहिती तंत्रज्ञानातील होणारे बदल विचारात घेता साईटेक प्रकल्प व्यवस्थापनाचे सर्व कामकाज भविष्यात संस्थानचे विहित पध्दतीने Out Source करणेबाबतची कार्यवाही विभागामार्फत खालील पध्दतीने सुरु करता येईल.

1. सदरकामी संस्थानचे वेबसाईटवर व वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन त्यांना साईटेक प्रकल्पातील कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे मार्फत विकसीत करुन कार्यान्वीत करण्यात आलेल्या Software Application Solution, Hardware/Infrastructure Solution, Network Solution, Server & Backup Solution, Desktop & Laptop Solution, Printer Solution, Kiosks Solution, Q-management System, Steady State (FMS) IT Infrastructure Support, Data Centre (DC) and Disaster Recovery (DR) Site, Telecom Solution,On Line Services, Help Desk Services etc. कामासंबंधीची माहिती घेणेसाठी आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीस प्रत्यक्ष On Site Servey करण्यास निमंत्रीत करता येईल व त्यानुसार याकामी संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागवुन कंपनीशी करारनामा करण्यात येऊन कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे या कंपनीकडुन कामकाज नविन कंपनीकडे पुर्णत: तपासुन वर्ग करण्यात येईल.

2. नविन कंपनीशी करावयाचा करारनामा व निविदा मसुदा महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान संचनालय, मंत्रालय मुंबई यांचेकडुन तसेच संस्थानचे तांत्रिक सल्लागार, विधी विभाग व लेखाशाखा विभागाकडुन तपासुन घेण्यात येईल, त्यास मा. उच्च न्यायालयाचे मान्यता घेण्यात येईल.

सदर विषयाची कार्यवाही संस्थानचे विहित पध्दतीने होणेकामी साधारणत: चार ते सहा महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे.

**[ब]** साईटेक प्रकल्प कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना Turn key IT Solution या आधारावर देण्यात आलेला असल्याने कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सदर प्रकल्पासंबंधीचे Support व Development चे कामकाज थांबवील्यास पर्यायी उपाय योजनेकामी संस्थानचे माजी तांत्रिक सल्लागार श्री विजय मंडोरा यांचे याकामी मार्गदर्शन घेतले असता, त्यांनी सदर प्रकल्प संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागवुन कार्यवाही होणेस साधारणत: दोन ते तीन महिने कालावधी अपेक्षित आहे. सदर कालावधीत भक्तांची गैरसोय होऊ नये, म्हणुन ERP व इतर Services करीता लागणारे ERP Qualified & Experienced कर्मचारी विनामुल्य संस्थानला पुढील कंपनीचे Outsource Contract होईपर्यंत दोन - तीन महिने कालावधीकरीता सेवा देणेचे कळविले आहे. श्री विजय मंडोरा यांचे म्हणणे नुसार साईटेक प्रोजेक्टची व्याप्ती हि मोठी असुन ERP Smoothly Take over करतांनी त्यामध्ये प्रामुख्याने Source Code व इतर सर्व्हिसेसचे Password तपासुन कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडुन Take over

करतांनी ERP Experts व इतर आवश्यक तज्ञांची मदत सेवेकामी मोफत पुरविण्यास तयार असुन प्रकल्प Take over करतांनी खालील गोष्टी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे Expert कडुन तपासुन मिळणे आवश्यक आहे, असे सुचविले आहे.

* Source Code of all the applications Modules.
* User name and Password of all the system ( this includes Database server, Application, Servers, Network etc)
* Any other customised applications, source code, user name and password.
* Recent Backup of all the systems.
* Documentation & Manual.
* All recent updates of the system, enhancements.
* Design & Architecture of all the modules & applications.
* Hardware, Network Diagram, design, architecture, manual, credentials.
* All IP Scheme Details;BGP Configurations & its details.

सदर कामी प्रकल्पाची व्याप्ती (स्कोप) समजावुन घेतल्यानंतर जर कदाचीत या कामी Additional Experts ची आवश्यकता भासल्यास त्यांचे आवश्यकतेनुसार तासाचे /दिवसाचे चार्जेस फक्त संस्थानने द्यावे, अशी त्यांनी विनंती केली आहे. तसेच सदर कालावधीत सेवेसाठी मोफत पुरविण्यात आलेल्या कर्मचार्यांची राहण्याची, जेवणाची व आवश्यक ती व्यवस्था संस्थान मार्फत करणेकामी त्यांनी विनंती केली आहे.

सदर प्रकल्प ERP Smoothly Take over करतांनी आवश्यकतेनुसार ते स्वत: उपस्थित राहणार असल्याचेही त्यांनी चर्चेअंती सांगीतले आहे. साईटेक प्रकल्पाचे Source Code व इतर सर्व्हिसेसचे Password कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडुन तपासुन ERP Smoothly Take over करतांनी याकामी लागणारे ERP Experts व इतर आवश्यक तज्ञांची मदत माजी तांत्रिक सल्लागार श्री विजय मंडोरा यांचेकडुन पुढील कंपनीचे Outsource Contract होईपर्यंत मोफत घेतल्यास भक्तांची गैरसोय होणार नाही. सदर कामास ते आपणास सहकार्य करत असल्याने त्यांचे सदरकामी सहकार्य मिळणेस त्यांना पत्राव्दारे कळविता येईल, असे नम्र मत आहे.

उपरोक्त ब प्रमाणे कार्यवाही होणे उचित ठरेल जेणेकरुण भक्तांची कुठलीही गैरसोय निर्माण होणार नाही.

**[क]** कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सदर प्रकल्पासंबंधीचे Support व Development चे कामकाज थांबवील्यास पुढील कंपनीचे Outsource Contract होईपर्यंत संस्थानची जुनी संगणकीय प्रणाली गेल्या तीन वर्षापासुन बंद असुन ती कार्यान्वीत करावयाची झाल्यास सदरकामी साधारणत: 15/20 दिवस कालावधी लागु शकतो. त्यात प्रामुख्याने डोनेशन सिस्टीम, चेक डीडी मनीऑर्डर, क्लॉथ स्टोअर/ शॉप, मेंबरशिप, कॅशिअर गोल्ड सिल्वर सिस्टीम गेस्ट Information, Inward, प्रसादालय बुकींग, बुक शॉप कॅन्टीन

Accomondation System, Payroll System, इत्यादी प्रणाली कार्यान्वीत होऊ शकता. परंतु Network Infrastrcture/Design मध्ये झालेल्या बदलामुळे सदर प्रणालीत व्यत्यय निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भक्तांचे सेवसाठी सुरु असलेल्या ऑनलाईन सव्हिर्स्सचे व माहिती सुविधा केंद्राचे कामकाजासंबंधी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी Support व Development चे कामकाज थांबवील्यास त्यात अडचण निर्माण होऊन भक्तांची गैरसोय होऊ शकते.

**मागणी :** उपरोक्त च्अछ, च्बछ व च्कछ पर्यायाचा विचार करता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सदर प्रकल्पासंबंधीचे Support व Development चे कामकाज थांबवील्यास च्अछ नुसार साईटेक प्रकल्पाचे कामकाज मा.व्यवस्थापन समीतीचे दिनांक 15/03/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 283 (मुद्दा क्रं. 11) नुसार विहित पध्दतीने आऊट सोर्स होणेची कार्यवाही होईपर्यंत व संस्थानचे माजी तांत्रिक सल्लागार श्री विजय मंडोरा यांनी च्बछ मध्ये सुचविलेप्रमाणे साईटेक प्रोजेक्टची व्याप्ती हि मोठी असुन ERP Smoothly Take over करतांनी त्यामध्ये प्रामुख्याने Source Code व इतर सर्व्हिसे्सचे Password कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेेकडुन तपासुन Take over करतांनी ERP Experts व इतर आवश्यक तज्ञांची मदत सेवेकामी मोफत त्यांचेकडुन दोन- तीन महिने कालावधीकरीता घेता येईल, जेणेकरुन भक्तांची गैरसोय होणार नाही, तरी याकामी प्रस्ताव मार्गदर्शनास्तव तथा निर्णयास्तव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय.इ. छाननी करुन अनुमान :** तांत्रिक, आर्थिक व कायदेशिर.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :** उपरोक्त अ, ब व क पर्यायाचा विचार करता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सदर प्रकल्पासंबंधीचे Support व Development चे कामकाज थांबवील्यास च्अछ नुसार साईटेक प्रकल्पाचे कामकाज मा.व्यवस्थापन समीतीचे दिनांक 15/03/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 283 (मुद्दा क्रं. 11) नुसार विहित पध्दतीने आऊट सोर्स होणेची कार्यवाही होईपर्यंत व संस्थानचे माजी तांत्रिक सल्लागार श्री विजय मंडोरा यांनी च्बछ मध्ये सुचविलेप्रमाणे साईटेक प्रोजेक्टची व्याप्ती ही मोठी असुन ERP Smoothly Take over करतांनी त्यामध्ये प्रामुख्याने Source Code व इतर सर्व्हिसे्सचे Password कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडुन तपासुन Take over करतांनी ERP Experts व इतर आवश्यक तज्ञांची मदत सेवेकामी मोफत त्यांचेकडुन दोन-तीन महिने कालावधीकरीता घेणेकामी मार्गदर्शनास्तव तथा निर्णयास्तव सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.९१२** **उपरोकत प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन. त्यामध्ये नमुद केलेल्या परिच्छेद अ प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. तसेच सदरचा साईटेक प्रकल्प आऊटसोर्समार्फत चालविणेकामी माहिती तंत्रज्ञान विभाग,**

**महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे मदतीने व मान्यतेने संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख यांनी निविदाप्रक्रिया तात्काळ सुरु करुन दोन महिन्याच्या कालावधीमध्ये पूर्ण करावी, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२८ शिर्डी बसस्थानकाचे विद्युतीकरण कामास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे माध्यमातून शिर्डी येथील सर्व्हे नं. १७१/१२ मध्ये अद्यावत सेवासुविधायुक्त असे बसस्थानक व त्यावरील भक्तनिवासचे बांधकाम चालू आहे. सदरील बसस्थानकाच्या इमारतीचे बांधकाम ठेकेदार मे.पाटील कन्स्ट्रक्शन, पुणे यांना देण्यात आलेले आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०७-२०११ चे सभेतील विषय क्र.१२ निर्णय क्र.५०३ अन्वये मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्,▯▯▯▯ यांचे निम्नतम दर स्वीकारण्यात येऊन त्यांना बसस्थानकाच्या विद्युतीकरण कामाचा कार्यादेश उपरोक्त संदर्भ क्र.०१ नुसार देण्यात आलेला आहे. सदरील कार्यादेशामध्ये विद्युतीकरण कामाची मुदत सहा महिने अथवा सिव्हील वर्क १००% पुर्ण झाल्यानंतर दोन महिने अशी देण्यात आली होती.

बसस्थानकाचे बांधकाम संथ गतीने चालू असल्यामुळे विद्युत ठेकेदार यांना अद्यापपर्यंत फक्त ४५ % विद्युतीकरणाचे काम पुर्ण करता आलेले आहे. त्यामुळे विद्युतीकरण कामामध्ये बसस्थानकाचे वायरींग काम करणे,▯▯▯▯▯ टाईल्स बसविल्यानंतर स्विच बोर्ड बसविणे इमारतीमध्ये फॅन व लाईट फिटींग बसविणे, बसस्थानक परिसरामध्ये पथदिव्यांची उभारणी करणे, केबल अंडरग्राऊंड टाकणे ही कामे करुन घेणे आहेत.

सबस्टेशन व जनरेटर रुमचे बांधकाम अद्यापपर्यंत सुरु न झाल्यामुळे, महाराष्ट राज्य विज वितरण कंपनीकडून विद्युतपुरवठा जोडून घेणे, ट्रान्सफॉर्मर, पॅनेल व जनरेटर बसविणे ही कामे विद्युत ठेकेदार यांना करता येणार नाहीत. म्हणजे सिव्हील वर्क पुर्ण झाल्यानंतर इलेक्ट्रीकल कामे करावी लागतात. सदरील विद्युतीकरण कामाकरीता यापुर्वी दिनांक ३०-०९-२०१४ अखेर पर्यंत मुदतवाढ घेण्यात आली होती.

बसस्थानकाचे विद्युतीकरण कामाकरीता मुदतवाढ घ्यावी लागणार आहे. उपरोक्तप्रमाणे बसस्थानकाचे विद्युतीकरणाचे काम करणारे ठेकेदार, मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना दिनांक ३१-०३-२०१५ अखेर मुदतवाढ मिळणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी बसस्थानकाच्या बांधकामासाठी मुदतवाढ देण्यात आलेली नाही, त्याचप्रमाणे विद्युतीकरणाचे ठेकेदार मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांनाही मुदतवाढ न देता त्यांनी विद्युतीकरणाचे काम बांधकामाच्या बरोबरीने चालू ठेवून पूर्ण करावे, असे कळविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२९ साईआश्रम भाग-०१ परिसरातील इमारतीच्या खोल्यांमधील टॉयलेट, बाथरुम, नाईट लॅम्प तसेच बेसीनवरील आरशावर बल्कहेडसहीत सी.एफ.एल.लॅम्प खरेदी करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

साईआश्रम भाग-०१ श्री साईभक्तांचे निवासासाठी चालू होऊन दीड वर्षे होत आलेले आहे. या परीसरातील इमारतींच्या खोल्यांमधील टॉयलेट, बाथरुम, बेसीनवरील आरशावर तसेच नाईट लॅम्पकरीता मिळून प्रत्येक खोलीत ४ पी.एल. टयुब फिटींग्ज या बिल्डींगचे काम होतेवेळी देणगीदार, श्री.रमणीसर यांचेमार्फत बसविण्यात आलेले आहे. हे काम मे.पार्श्वनाथ बिल्डर्स यांनी केले होते.

या प्रत्येक रुममध्ये बसविण्यात आलेल्या पीएल टयूब फिटींग्ज या लोकल मेकच्या लावण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे तसेच त्यांचे सततच्या वापरामुळे ब-याच खोल्यांमधील पी.एल.टयूब फिटींग्ज वारंवार बंद पडलेल्या आहेत. शिवाय मेन्टेनन्स साठी बाजारात या पी.एल.टयुब फिटींगकरीता आवश्यक असलेले पी.एल.लॅम्प व चोकस् सहजासहजी उपलब्ध होत नाही.

या ऐवजी जर त्याठिकाणी बल्कहेड फिटींग्जसहित सी.एफ.एल.लॅम्प बसविण्यात आल्या तर वीज खर्चात बचत होऊन तसेच मेन्टेनन्ससाठी सी.एफ.एल.लॅम्प बाजारात सहजासहजी उपलब्ध होत असल्याने मेन्टेनन्समध्येही अडचणी येणार नाहीत. फक्त जर नुसत्या होल्डरवर

सी.एफ.एल.लॅम्प लावल्या तर त्या चोरी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता सी.एफ.एल.लॅम्प बल्कहेड फिटींगमध्ये बसविले तर सी.एफ.एल.लॅम्प चोरी जाणार नाही व लॅम्प सुरक्षित राहतील.

त्याकरीता साईआश्रम भाग-०१ परीसरातील बिल्डींग क्र.'ए', 'बी' तसेच 'सी' या इमारतींमधून बल्कहेड फिटींगसहीत सी.एफ.एल.लॅम्प बसविणेकरीता शासनमान्य सी.एस.आर.सन-२०१३-२०१४ नुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No | C.S.R.No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 2-3-10 | Supplying and erecting bulkhead fitting suitable for integral CFL upto 11 W fixed on wall. As per specification no. FG-IDF/BHF (Make- Havells / Wipro / Charmex / Klite) | 1536 nos. | Rs. 187.95 | Rs. 2,88,691.20 |
| 02) | 2-1-20 | Supplying and erecting CFL 5 W with ceramic adopter p.f.more than 0.9 (Make- Havells / Wipro / Crompton Greaves) | 384 | Rs.148.05 | Rs. 0,56,851.20 |
| 03) | 2-1-21 | Supplying and erecting CFL 11 W with ceramic adopter p.f.more than 0.9 (Make- Havells / Wipro / Crompton Greaves) | 1152 nos. | Rs. 153.30 | Rs. 1,76,601.60 |
| | | | | **Total :-** | **Rs. 5,22,144.00** |

साईआश्रम भाग-०१ परीसरातील इमारतींच्या खोल्यांमधील टॉयलेट, बाथरुम, नाईट लॅम्प तसेच बेसीनवरील आरशावर बल्कहेडसहीत सी.एफ.एल.लॅम्प खरेदी करुन बसविणेकामी महाराष्ट्र शासनाच्या सी.एस.आर. सन-२०१३-२०१४ नुसार रु.५,२२,१४४/- इतका खर्च अपेक्षित आहे. परंतू अपेक्षित खर्चाची रक्कम ही महाराष्ट्र शासनाच्या सी.एस.आर. सन-२०१३-२०१४ नुसार असून प्रत्यक्षात मार्केटमधील दर हे त्यापेक्षाही जास्त असल्याने प्रत्यक्षात प्राप्त होणारे टेंडरमधील दर हे महाराष्ट्र शासनाच्या सी.एस.आर.मधील दरापेक्षा जास्त येऊ शकतात. तरी प्रत्यक्षात येणा-या/ होणा-या खर्चास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन व संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३० दिपावली-२०१४ निमित्ताने मंदिर व मंदिर पसिरात फुलांची सजावट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत दिपावली निमीत्ताने दि. 23/10/2014 ते 24/10/2014 या काळात श्री साईबाबा मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करण्यात येणार आहे. संस्थान,संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर,व्दारकामाई,चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते, सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी स्वरुपात सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

मा. व्यवस्थापन समितीच्या दि. 05/06/2014 रोजीच्या सभेतील निर्णय क्र. 414 अन्वये पुढील प्रत्येक उत्सवापुर्वी, उत्सव निमीत्ताने मंदिर व मंदिर परिसरामध्ये फुलांची सजावट करणेकामी नावनोंदणी चालु आहे. या आशयाचे संस्थानचे संकेत स्थळावर व ठिक- ठिकाणी फलक लावणेत यावे त्याकरीता जास्त भक्तांनी नावनोंदणी केल्यास सर्वांना संधी देणेसाठी मंदिर व मंदिर परिसराचा भाग फुलांची सजावट करणेसाठी विभागुन देणेत यावा, असे ठरले. त्यानुसार दिपावली निमीत्ताने फुलांची सजावट करणेकामी इंटरनेटवरुन जाहीरात प्रस्धिद करण्यात आली तसेच मंदिर परिसरात फलक लावुन जाहिरात करणेत आली होती. सदर फुलसजावटीची मुदत दि. 04/10/2014 रोजी संपलेली असुन या कालावधीत साईभक्त श्री रविंद्र तलवार, दिल्ली यांचे 06/10/2014 रोजीच्या पत्रानुसार दिपावली-2014 निमीत्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करुन देण्यास तयार आहे. यासाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे. मागील वर्षी दिपावली निमीत्ताने श्री तलवार यांनीच फुलांची सजावट केलेली होती. दिपावली -2014 निमीत्ताने समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान व अन्य महत्तवाच्या ठिकाणी फुलांची सजावट करणेसाठी श्री रविंद्र तलवार दिल्ली, हे साईभक्त इच्छुक आहे. तरी

01) श्री रविंद्र तलवार दिल्ली, या साईभक्तांकडुन फुलांची सजावट ही देणगी दाखल स्वरुपात मिळत असल्याने त्यांना फुलांची सजावट करुन घेता येईल मान्यतेसाठी सादर

02) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 26/07/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्र.609 अन्वये देणगीदार यांना राहण्यासाठी 01 AC रुम, दर्शन, आरती, भोजन पास व फुल सजावट करणारे कारागीर यांना सामान ठेवणेसाठी हॉल व

जेवाणाची व्यवस्था संस्थान मार्फत मोफत करणेस मान्यता आहे. त्याप्रमाणे सुविधा श्री तलवार यांना संस्थानमार्फत मोफत करणेचे मान्यतेसाठी सादर

साईभक्त श्री रविंद्र तलवार, दिल्ली यांच्या आलेल्या दि. 06/10/2014 रोजीच्या पत्रानुसार त्यांच्याकडुन  दिपावली-2014 निमीत्तीने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करुन घेता येईल. तरी सदरचा विषय मा. त्रिसदस्य समितीसमोर ठेवणेस मान्यता मिळावी हि विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.रविंद्र तलवार, दिल्ली यांना दिपावली-२०१४ निमित्ताने मंदिर व मंदिर पसिरात फुलांची सजावट करणेस परवानगी देण्यात आली. फुल सजावटीचे देणगीदार यांना निवासासाठी ०१ ए.सी. रुम, सजावट करणारे कारागीर यांना निवास आणि सामान ठेवणेसाठी ०१ हॉल तसेच त्यांची प्रसादभोजन व दर्शनाची व्यवस्था विनामुल्य करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख/ श्रीसाईप्रसाद -द्वारावती निवासस्थान/ श्री साईप्रसादालय/ जनसंपर्क कार्यालय/ संरक्षण विभागप्रमुख)

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३१ व्दारावती इमारतीमधील लिफ्टचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मे.कोने इलेव्हेटर्स (I) प्रा. लि., पुणे यांनी व्दारावती इमारतीमध्ये भक्ताकरीता स्टेनलेस स्टील टोमॅटीक डोअर्सच्या लिफ्टस् बसवून चालू करुन दिल्या होत्या. लिफ्ट चालू झाल्यानंतर मे. कोने इलेव्हेटस र्(I) प्रा. लि. पुणे यंानी टेंडरमधील व कार्यादेशातील अटीनुसार सलग तीन वर्ष फ्रि सर्व्हिस उत्तम प्रकारे दिली आहे. त्यानंतर त्यांना दिनांक 01/11/2013 ते दिनांक 30/10/2014 या वर्षाकरीता (रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट) मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले आहे.  या कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक 30/10/2014 रोजी संपत आहे.

जर सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (रिस्क प्रोटेक्श्न कॉन्ट्रॅक्ट टाईप) केलेले नसेल आणि मशीनरीला मेकॅनिल प्रॉब्लेम आले व मशिनरीचे मेकॅनिकल स्पेअर्स बदलण्याची गरज लागली तर या स्पेअर्सचे वेगळे बील भरावे लागते.  शिवाय हे स्पेअर्स लगेच उपलब्ध होतील याची शाश्वती नसते.

या रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये सर्व मेकॅनिकल स्पेअर्स हे रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट असल्याचे त्या स्पेअर्सची कोणतीही किंमत न घेता स्पेअर्स बदलून मिळतात व शिवाय वर्षातून दरमहा कंपनीचा प्रशिक्षित एक्सपर्ट मेकॅनिल येऊन मशिनरीची साफसफाई करुन क्लिनिक करुन सेटींग करुन देत असतो. जेणेकरुन लिफ्ट सुरळीत चालू राहणे शक्य होणार आहे. सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (रिस्क प्रोटेक्श्न कॉन्ट्रॅक्ट टाईप) पिरिअडमध्ये मशिनरीचा कोणताही मेकॅनिकल पार्ट

नैसर्गिकरित्या (मशिनरीशी कन्झुमरने कोणतीही छेडछाड केलेली नसल्यास) खराब झाल्यास तो बदलून देणे कंपनीला सक्तीचे आहे.

आता त्यांनी दिनांक 01/11/2014 ते दिनांक 31/10/2015 या आर्थिक वर्षाकरीता (रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट) मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कामी लागणाऱ्या रकमेचा तपशील खालीलप्रमाणे कळविलेला आहे:

| अ. नं | तपशील | संख्या | कालावधी | दर रुपये | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | व्दारावती ए बिल्डींग लिफ्ट क्र. 55861 | 1 | दि. 01/11/2014 ते 31/10/2015 | 1,80,656.58 | 1,80,656.58 |
| 2 | व्दारावती बी बिल्डींग लिफ्ट क्र. 55862 | 1 | दि. 01/11/2014 ते 31/10/2015 | 1,80,656.58 | 1,80,656.58 |
| 3 | व्दारावती बी बिल्डींग लिफ्ट क्र. 55863 | 1 | दि. 01/11/2014 ते 31/10/2015 | 1,80,656.58 | 1,80,656.58 |
| 4 | व्दारावती सी बिल्डींग लिफ्ट क्र. 55864 | 1 | दि. 01/11/2014 ते 31/10/2015 | 1,80,656.58 | 1,80,656.58 |
| | | | | **एकूण :** | **7,22,626.32** |

दिनांक 20/05/2007 रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. 33 निर्णय क्र. 386 अन्वये दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशिनरीचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईबाबा रुग्णालयातील विविध मशीनरी, एअर कंडीशनरस्, वायुवीजन यंत्रण वगैरे) वार्षिक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशिनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डिलरला देण्यात यावे, असे ठरलेले आहे.

<u>**मागणी**</u>: तरी उपरोक्त ठरावानुसार लिफ्टची उत्पादक कंपनी मे. कोने इलेव्हेटर्स (I) प्रा. लि., पुणे यांना दिनांक 01/11/2014 ते 31/10/2015 या कालावधीकरीता व्दारावती लिफ्टचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप) देणेकामी रक्कम रुपये 7,22,626/- (अक्षरी रुपये सात लाख, बावीस हजार, सहाशे सव्वीस) मात्र इतकी रक्कम आदा करावी लागणार आहे. या कामास तसेच येणाऱ्या खर्चास मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९१६ यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक ०१.११.२०१४ ते दि.३१.१०.२०१५ या कालावधीकरीता व्दारावती इमारतीमधील लिफ्टचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) मे.कोने इलेव्हेटर्स प्रा.लि., पुणे यांना देणेस व याकामी येणा-या रक्कम रु.७,२२,६२६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३२ सन २०१३-१४ मधील वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** अधिनियम २००४ मधील तरतुद – १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०७/२०१३ निर्णय क्रमांक ५६४ Clause No. ९ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

प्रास्ताविक – श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणा-या औषधे, सर्जिकल व कन्झुमेबल साहित्याकरिता सन २०१३-२०१४ या वर्षाकरिता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकूण ६६ पुरवठाधारकांना एकूण रक्कम रु. ३०,५२,८८,३५८/- चे दि. १९/०३/२०१४ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे. तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झुमेबल साहित्यांचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. वार्षिक मागणी पुर्ण झालेली आहे व ती औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी, व कन्झुमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे.

तसेच श्री साईबाबा रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना दि. १६/११/२०१३ रोजी कार्यान्वित झालेली आहे. तर वार्षिक मागणी प्राप्त होऊन त्यावर मा. त्रिसदस्य समिती सभा दि. २६/०७/२०१३ चे निर्णय क्र. ५६४ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे वार्षिक मागणी मधील संख्या कमी पडेल म्हणून जी औषधे / सर्जिकल साहित्य हे सदर योजने अंतर्गत रुग्णालयासाठी लागतील त्यांची अतिरिक्त मागणी वाढवण्यात आलेली आहे अशा एकूण ५८ औषधांसाठी एकूण रक्कम रु. १,३८,४७,४१२/- चे खर्चास मा. त्रिसदस्य समिती ची दि. १२/०४/२०१४ रोजी मान्यता मिळालेली असुन प्रस्ताव मा. उच्च

न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात मान्यतेसाठी सादर केलेला आहे. त्यास मान्यता मिळणे आहे.

त्यास मान्यता मिळालेनंतर अतिरिक्त मागणी वार्षिक मंजुर दराने खरेदी करता येईल. परंतु तो पर्यंत रुग्णांना उपचार चालु ठेवणेसाठी सोबतच्या यादीतील औषधांची गरज आहे.

सदर योजनेअंतर्गत होणा-या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासुन १ वर्षासाठी औषधे मोफत द्यावी लागतात त्यामुळे औषधांचा खप अचानक वाढलेला आहे, राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधांचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळतो. त्यामुळे जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झुमेबल साहित्य वार्षिक मंजुर दराने खरेदी करण्यात येत आहे. ती एकाच वेळी खरेदी करुन ठेवता येत नाही जर असे केले तर ती मुदत बाह्य होण्याची शक्यता जास्त असते. व त्यामुळे संस्थानला मोठे आर्थिक नुकसान होईल.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजुर पुरवठाधारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु.८,०९,१०३/- इतका खर्च येणार आहे.

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान – अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात. सदर रुग्णालयाकरिता औषधे / सर्जिकल / लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत– रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजनेअंतर्गत एक वर्षासाठी मोफत उपचार घेणारे रुग्णांकरिता द्यावयाची औषधे खरेदी करणे आवश्यक आहे. सदरची खरेदी वार्षिक मंजुर दराने आहे. सदरचे दर विहित पद्धतीचा अवलंब करुन एक वर्षाकरिता निश्चित केलेले आहे व त्यास मा. व्यवस्थापन सभा दि. १५/०३/२०१४ निर्णय क्र. २५४ अन्वये मान्यता देखील आहे. त्यामुळे त्याच मंजुर दराने खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी सदरचे औषधे खरेदीकरुन व याकामी येणा-या पुर्णांकित रक्कम रु.८,०९,१०३/- चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.९१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व झालेल्या खर्चाची नोंद घेणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३३ श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डिओलॉजी विभागाकरिता FFR मशिन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयात सन २००६ या वर्षात कार्डिओलॉजी विभाग नव्याने सुरु करण्यात आलेला आहे. सदर कार्डिओलॉजी विभागात ह्दय विकाराचे अशा प्रकारचे रुग्ण असतात की, ज्यांचे ह्दयाला रक्ताचा पुरवठा व्यवस्थित झाला नाही तर रुग्णाला अॅटॅक किंवा इतर आजार होण्याचा संभव असतो. अशा प्रकारच्या रुग्णांची त्यासाठी प्रथम Angiography करण्यात येऊन त्यामध्ये रुग्णांच्या ह्दयाला रक्तपुरवठा करणा-या मुख्य रक्तवाहिन्यांकडून इतर रक्तवाहिन्यांना किती प्रमाणात व कशा प्रकारे रक्ताचा पुरवठा होतो तसेच काही ठिकाणी रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा येऊन रक्तवाहिन्यांची साईज कमी (Blockage) झाले आहे किंवा कसे हे प्रथम कळते. त्यानंतर रुग्णांच्या शरीरात विशिष्ट प्रकारचे Stent टाकून त्यांची Angioplasty करण्यात येते.

उपरोक्त FFR मशिन जर आपण खरेदी केले तर रुग्णांची Angiography व Angioplasty न करताच सदर मशिनने तपासणी करुन ह्दयाला पुरवठा करणा-या मुख्य रक्तवाहिनी व इतर रक्तवाहिन्यांकडून किती प्रमाणात व कशा प्रकारचा रक्ताचा पुरवठा होतो, तसचे कोणती रक्तवाहिनी किती प्रमाणात Block झालेली आहे हे लगेच कळते, त्यामुळे Angiography व Angioplasty चा खर्च कमी होईल, व Angioplasty करताना किती व कोणत्या प्रकारच्या साईजचे स्टेंट लागतील याची अगोदरच माहिती मिळेल तसेच काही वेळेस Angioplasty करण्याची गरज देखील पडणार नाही इ. फायदे होतात. तेव्हा सदर मशिन आपल्याकडे उपलब्ध करणे जास्त गरजेचे आहे, कारण आपल्याकडे वर्षाला सरासरी २,००० ते २,५०० Angioplasty च्या शस्त्रक्रिया होतात.

**<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–</u>** उपरोक्त FFR मशिन जर आपण खरेदी केले तर रुग्णांची Angiography व Angioplasty न करताच सदर मशिनने तपासणी करुन ह्दयाला पुरवठा करणा-या मुख्य रक्तवाहिनी व इतर रक्तवाहिन्यांकडून किती प्रमाणात व कशा प्रकारचा रक्ताचा पुरवठा होतो, तसेच कोणती रक्तवाहिनी किती प्रमाणात Block झालेली आहे हे लगेच कळते, त्यामुळे Angiography व Angioplasty चा खर्च कमी होईल, व Angioplasty करताना किती व कोणत्या प्रकारच्या साईजचे स्टेंट लागतील याची अगोदरच माहिती मिळेल तसेच काही वेळेस Angioplasty करण्याची गरज देखील पडणार नाही इ.

फायदे होतात. तेव्हा सदर मशिन आपल्याकडे उपलब्ध करणे जास्त गरजेचे आहे, कारण आपल्याकडे वर्षाला सरासरी २,००० ते २,५०० Angioplasty च्या शस्त्रक्रिया होतात. त्यामुळे नवीन FFR मशिन खरेदी करावे असे मत आहे.

तरी उपरोक्त FFR मशिन विहित पद्धतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रु. १५,००,०००/- खर्चास मान्यता घेणेकामीचा तसेच सदरच्या प्रस्तावास मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव सादर करणेस मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.९१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डिओलॉजी विभागाकरिता आवश्यक असलेल्या FFR मशिन संस्थानने खरेदी करावे व त्या मशिनसाठी लागणा-या किटचे पुढील ५ वर्षाच्या कालावधीसाठी दर निश्चित करावे. तसेच सदर कंपनी FFR मशिन मोफत देत असेल तर त्या मशिनसाठी लागणारे किट विशिष्ट कालावधीसाठी संस्थानने त्यांचेकडून खरेदी करावे अशा दोन्हीही प्रकारे ई-निविदांची मागणी करणेत यावी. ई-निविदा प्राप्त झालेनंतर दोन्ही प्रस्ताव अंतीम निर्णयास्तव सभेसमोर सादर करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३४ श्री साईबाबा हॉस्पिटलकडील आर.एम.ओ. यांना वेतनश्रेणी लागू करणेबाबत.**

**निर्णय क्र.९१९** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३५ श्री.अनिल तुकाराम थोरात, मदतनीस, श्री साईनाथ रुग्णालय यांचे विनापरवानगी गैरहजेरीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री अनिल तुकाराम थोरात, मदतनिस, श्री साईनाथ रुग्णालय यांनी खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन केलेले असल्यामुळे इकडील जा. नं. एसएसएस/वशी 7बी/865/2013 दि. 07.12.2013 अन्वये त्यांचेवर आरोपपत्र ठेवण्यात आलेले आहे. जा. नं. एसएसएस/वशी 7बी/866/2013 दि. 07.12.2013 अन्वये सदरच्या आरोप पत्राचे खाते चौकशीकामी ॲड. बी. वाय. काळवाघे, कोपरगाव यांची खाते चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांनी नियमाप्रमाणे खाते चौकशी पूर्ण करुन दि. 27.09.2014 रोजीचा निष्कर्ष अहवाल सादर केलेला आहे.

अ) गैरशिस्त वर्तनाचा तपशिल:-

श्री थोरात यांनी दि. 07.12.2012 ते 08.12.2012 अखेर 02 दिवस आजारी रजा व त्यास जोडून दि. 09.12.2012 रोजीची आठवडा सुट्टी उपभोगलेनंतर दि. 10.12.2012 रोजी त्यांना नेमून दिलेल्या इंजेक्शन ओपीडी येथे दुपारी 2 ते 8 या डयुटीत कामावर हजर होणे आवश्यक होते. परंतू श्री थोरात

यांनी आजारी असलेचे दूरध्वनी व्दारे अधिसेविका कार्यालयास कळविले. त्यानंतर ते दि. 10.12.2012 पासुन सतत, सलग, विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहिले. कामावर हजर होणेबाबत त्यांना दि. 02.01.2013 व दि. 21.01.2013 रोजी रजिष्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठविण्यात आले होते परंतू सदरचे पत्र पोस्ट खात्यामार्फत परत आले आहे. श्री थोरात यांनी ते स्विकारले नाही.

त्यानंतर दि. 29.07.2013 रोजी पत्र पाठवून त्यांना कळविण्यात आले होते की, नोटीस मिळताच सात दिवसांचे आंत लेखी खुलासा सादर करुन कामावर हजर व्हावे. पत्र प्राप्त होवून देखील श्री थोरात कामावर हजर न झालेने पुन्हा दि. 21.08.2013 अन्वये पत्र पाठवून त्यांना कळविण्यात आले की, नोटीस मिळताच दोन दिवसांचे आंत विनापरवानगी गैरहजेरीबाबतचा लेखी खुलासा सादर करुन कामावर हजर व्हावे, अन्यथा तुम्हांस संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजून तुमचे नांव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल.

त्यानंतर श्री थोरात यांनी दि. 27.08.2013 रोजीचे अर्जान्वये कामावर हजर होणेस परवानगी मागितली होती. खुलाशात गैरहजेरी बाबत आजारपणाचे कारण कथन केले आहे. त्यांनी अर्जात असे म्हटले आहे की, माझी डयुटी इंजेक्शन ओ. पी. डी. येथे चालू होती. दि. 10.12.2012 दरम्यान गुडघ्याच्या दुखापतीत वाढ झाल्याने व डयुटीवर सतत उभे असल्याने वेदनेत वाढ झाली. त्यामुळेमी दि. 10.12.2012 पासून अदयापपर्यंत गैरहजर होतो. तसेच माझा हल्लीचा पत्ता रुई, ता राहाता असा असल्यामुळे या आधीच्या पत्त्यावर पत्र व्यवहार होत असल्यामुळे मला या आधीचे पत्र मिळाले नाही. तरी माझ्या आजारपणामुळे मी कामावर येऊ शकलो नाही. तरी मला कामावर हजर करुन घ्यावे ही विनंती.

त्यानंतर दि. 25.10.2013 अन्वये पत्र पाठवून श्री थोरात यांना कळविणेत आले की, दोन दिवसांचे आंत कामावर हजर व्हावे त्यानंतर ते दि. 31.10.2013 रोजी कामावर हजर झाले. येणेप्रमाणे श्री थोरात हे दि. 10.12.2012 पासून दि. 30.10.2013 अखेर विनापरवानगी रजा अर्जाशिवाय कामावर गैरहजर राहिले.

त्यानंतरही श्री. थोरात हे दि. 08.11.2013 पासून सतत, सलग, विनापरवानगी गैरहजर आहेत. दि. 06.12.2013 व दि. 19.12.2013 रोजी पत्र पाठवून कामावर हजर होणेबाबत त्यांना कळविले होते. सदरची पत्रे प्राप्त होऊन देखील श्री. थोरात अद्यापपर्यंत कामावर हजर झाले नाहीत.

अशा प्रकारे वरिष्ठांच्या परवानगी शिवाय सतत, सलग, दहा दिवसांपेक्षा जास्त दिवस विनापरवानगी रजा अर्जाशिवाय गैरहजर रहाणे ही श्री थोरात यांची कृत्ये इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅण्डींग ऑर्डर्स) ऍ़क्ट 1946 खालील स्थायी आदेशाचे कलम नं. 24 (ए), 24 (एफ) नुसार गंभीर गैरशिस्त वर्तने ठरतात. ती

गैरकृत्ये श्री थोरात यांनी केलेली असलेमुळे त्यांचेवर हे आरोपपत्र बजावण्यात येत आहे.

**ब) खाते चौकशी निष्कर्ष अहवाल:-**

ॲड. बी. वाय. काळवाघे, कोपरगाव खाते चौकशी अधिकारी यांनी चौकशी पूर्ण करुन दि.27.09.2014 रोजीचा निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढल्याचे नमुद केले आहे.

'श्री. अनिल तुकाराम थोरात यांना दि. 07.12.2013 रोजी दिलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झाल्याने दोषी आहेत.'

**क) श्री अनिल तुकाराम थोरात यांची वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे:-**

1. नाव- श्री. अनिल तुकाराम थोरात
2. हुद्दा- मदतनिस
3. विभाग- श्री साईनाथ रुग्णालय
4. जन्म तारीख- 24.04.1976
5. नेमणूक तारीख- 02.12.2006
6. संस्थानमध्ये झालेली सेवा- 07 वर्ष, 11 महिने, 03 दिवस
7. वेतनश्रेणी- 4,440-7,440 ग्रेड पे.-1,300/-

**ख) शिक्षेची तरतुद:-**

द इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅडींग ऑर्डर्स) ॲक्ट 1946 चे कलम 25 (1) नुसार गैरवर्तनाबद्दल दोषी असलेल्या कर्मचायास खालीलप्रमाणे शिक्षा सुचित केलेल्या आहेत.

अ. ताकीद दयावी किंवा ठपका दयावा.

ब. पेमेंट ऑफ मेजेस ॲक्ट 1946 च्या तरतुदीच्या मर्यादेत राहून आणि त्यानुसार दंड करावा.

क. चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीच्या आदेशाने सस्पेंड करावे.

ड. नोटीसीशिवाय बडतर्फ करावे.

वरिल शिक्षेपैकी द इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅडींग ऑर्डर्स) ॲक्ट 1946 चे कलम 25 (1) (ड) नुसार श्री. थोरात यांना नोटीसीशिवाय बडतर्फ करता येईल. कारण त्यांना अनेकवेळा संधि देऊनही ते कामावर हजर झालेले नाहीत, खाते चौकशीत त्यांचेवरील आरोप सिध्द झालेले आहेत. तरी श्री. थोरात यांना द्यावयाचे शिक्षेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९२०** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.अनिल तुकाराम थोरात, मदतनीस, श्री साईनाथ रुग्णालय यांचे विनापरवागी गैरहजेरीबाबत त्यांना द इंडस्ट्रीयल एम्प्लॉयमेंट (स्टॅडींग ऑर्डर्स) अॅक्ट १९४६ चे कलम २५ (१) (ड) नुसार नोटीसीशिवाय बडतर्फ करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

--------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ सन २०१४-१५ (ऑक्टो.१४ ते मार्च-१५) करिता प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी किराणा माल खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१४-१५ चे माहे एप्रिल-१४ ते मार्च-१५ अखेर प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक किराणा माल खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मा.त्रिसदस्य समितीचे दि.१३.१२.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.९६७ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली आहे. तसेच सदर खरेदीस मान्यता मिळणेसकामीचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे दाखल केला असता, मा.न्यायालयाने दि.१३.०३.२०१४ रोजीचे निर्णयानुसार सन २०१४-१५ चे प्रथम सहामाही करिता (माहे एप्रिल-१४ ते सप्टेंबर-२०१४) किराणा माल खरेदीस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.३५,००,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार कार्यवाही करुन एप्रिल-२०१४ ते सप्टेंबर-२०१४ अखेर किराणा माल खरेदी करण्यात आलेली आहे.

सदर खरेदीची मुदत माहे.सप्टेंबर २०१४ अखेर संपत असल्याने व पुढील खरेदीस मा.उच्च न्यायालयाची मान्याता मिळणेस अवधी शिल्लक असल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.१३.०३.२०१४ रोजीचे निर्णयास अधीन राहुन, माहे ऑक्टो-१४ ते मार्च-१५ अखेर किराणा माल खरेदीची पुर्वतयारी करणेकामी दि.०६.०९.२०१४ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०६.०९.२०१४ ते दि.२०.०९.२०१४ अखेर ई-निविदा मागणी करणेस मा.व्य.समितीचे दि.२८.०८.२०१४ चे सभेत मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार कार्यवाही करणेत येऊन, दि.०६.०९.२०१४ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०६.०९.२०१४ ते दि.२०.०९.२०१४ अखेर ई-निविदा मागणी करण्यात आलेल्या होत्या. तसेच दि.२०.०९.२०१४ अखेर तांत्रिक लिफाफा (निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले कागदपत्रे) व नमुन्यांची मागणी करणेत आलेली होती. मुदतीअंती शिर्डी कार्यालयात ३६ व व मुंबई कार्यालयात ०२ असे एकुण ३८ निविदाधारकांची तांत्रिक लिफाफे व नमुने प्राप्त झालेली होती. पैकी एका निविदाधारकाची निविदा ऑनलाईन दाखल झालेली नसतांनाही त्यांनी प्रत्यक्ष लिफाफा सादर केलेला होता. त्यामुळे तांत्रिकदृष्टया एकुण ३७ निविदाधारकांचे लिफाफे मुदतीअंती प्राप्त झालेले होते.

मंजुर टिपणीनुसार प्राप्त तांत्रिक लिफाफे उघडणेकामी दि.२२.०९.२०१४ रोजी मा.उप कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सभेचे अयोजन करण्यात आलेले होते. सदर सभेच्या सुरुवातीस मा.मुख्यलेखाधिकारी यांनी तांत्रिक

लिफाफ्याचे प्राप्त पाकिटे न उघडता निविदेसोबत ऑनलाईन स्कॅन करुन जोडलेले कागदपत्रांची तपासणी करणेबाबत सुचना दिल्या. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली. सदरचे कागदपत्रे वरिष्ठ लेखापाल यांचे मार्फत तपासणी करण्यात आलेली आहेत. त्याची तपशिलवार तक्ता मा.व्य.समितीचे सभेत सादर केला असता, त्यातील दोन निविदाधारकांनी निविदेत मागणी केल्याप्रमाणे वार्षिक उलाढालीचे अहवाल जोडलेले नसल्यामुळे त्यांच्या निविदा अपात्र ठरविण्यात येऊन, उर्वरीत ३५ निविदाधारकांच्या निविदा पात्र ठरविण्यात आलेल्या आहेत.

तसेच गावरान तुपाकरिता ०६ व खाद्यतेला करिता ०६ नमुने प्राप्त झालेली होती. त्यापैकी मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक यांचा खाद्यतेलाचा नमुना ग्राह्य धरलेला नाही. त्यामुळे त्यांचा नमुना वगळता, इतर ०५ निविदाधारकांचे खाद्यतेलाचे नमुने व ०६ निविदाधारकांचे गावरान तुपाचे नमुने दि.२१.०९.२०१४ रोजी प्रशासकीय अधिकारी खरेदी विभाग यांचेसमक्ष प्लॅस्टिक बरणीमध्ये सिलबंद करुन, त्यास गोपनीय कोड नंबर देऊन मे.अश्वमेघ लॅब, नाशिक येथे दि.२१.०९.२०१४ रोजी तपासणीसाठी पाठविण्यात आलेले आहेत. दिलेले गोपनीय कोड नंबर स्वतंत्र पाकिटात सिलबंद करण्यात आलेले आहेत. त्याचा तपसाणी रिपोर्ट इकडील कार्यालयाकडे दि.०४.१०.२०१४ रोजी प्राप्त झालेले आहे. सदरचे पाकिट मा.व्य.समितीचे सभेत उघडण्यात येईल.

तसेच प्राप्त नमुन्यातील योग्य प्रतीचे नमुने निवडणेकामी दि.२४.०९.२०१४ रोजी सभेचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर नमुने निवडणेकामी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील दोन तज्ञ समिती (डॉ.काटेचा व प्रा.कड), प्रसादालय विभागाकडील दोन अनुभवी आचारी, प्रसादालय व खरेदी विभाग प्रशासकीय अधिकारी, खरेदी, भांडार व प्रसादालय विभाग अधिक्षक यांची समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर सभेत प्राप्त नमुन्यांमधून उत्तम प्रतीचे नमुने निवडण्यात आलेले आहेत. सदरचे निवडलेले नमुने सिलबंद करुन ठेवण्यात आलेले आहेत. तसेच ज्या निविदाधारकांचे नमुने निवडण्यात आलेले आहेत, त्याची यादी सिलबंद करुन ठेवण्यात आलेली आहे. सदरची यादी मुळ निविदा उघडण्याचे अगोदर दोन दिवस प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडून, मालानुसार व निविदाधारकानुसार दरांचे रिकामे तुलनात्मक तक्ते तयार करता येतील.

सन २०१४-१५ (ऑक्टो.१४ ते मार्च-१५) चे द्वितीय सहामाहीचे किराणा खरेदीस मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.२८.१०.२०१४ रोजी मान्यता दिलेली आहे. सदरचा निर्णय आज दि.०८.१०.२०१४ रोजी वेबसाईटवर प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये मा.उच्च न्यायालयने खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

a. The applicant/sansthan is permitted to spend the amount for the purposes as detailed in these civil applications.

c. The applicant/sansthan shall take care to see that, best possible competitive prices are considered.
d. In case the matter is with regard to renewal of agreement and more particularly with the companies, who have provided the said machineries or the products, applicant/sansthan shall seek renewal of the agreement on the same terms and consitions.

तरी सन २०१४-१५ चे माहे ऑक्टोबर २०१४ ते मार्च २०१५ अखेर किराणा माल खरेदीकामी प्राप्त ३७ ई-निविदांपैकी पात्र ३५ निविदाधारकांच्या मुळ ई-निविदा (Financial Bid) आजचे सभेत समक्ष उघडणेत आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **निवडलेल्या नमुनेधारकांचे नांव** | **जात/प्रकार** | **मुळ दर प्रति क्विंटल/ नग/ लिटर व्हॅटसह रु.** |
|---|---|---|---|
| **१** | **गहु ४९६, मागणी ३५०० क्विंटल** | | |
| १ | **मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक** | ४९६ | **२०१४.००** |
| २ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | ४९६ | २४००.०० |
| ३ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | ४९६ | २०२५.०० |
| ४ | मे.महावीर प्रोव्हीजन स्टोअर्स, नाशिक | ४९६ | २१५९.०० |
| ५ | मे.आर.मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद | ४९६ | २०६५.०० |
| **२** | **हरबरा (गावरान), मागणी ५५० क्विंटल** | | |
| १ | मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक | | ३७५१.०० |
| २ | मे.संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ३४७१.०० |
| ३ | **मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड** | | **३१३१.००** |
| ४ | मे.कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ३४६८.०० |
| ५ | मे.साहील ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ३४७५.०० |
| **३** | **साखर (एम ३०), मागणी ७६५० क्विंटल** | | |
| १ | मे.आर.मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद | | ३१४५..०० |
| २ | मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | | ३२३१.०० |
| ३ | मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड | | ३३०५.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | ३१८८.०० |
| ५ | **<u>मे.महावीर प्रोव्हीजन स्टोअर्स, नाशिक</u>** | | **<u>२९९९.००</u>** |
| **४** | **तांदुळ सोना मसुरी जुना, बिगरपॉलीश मागणी ३०५० क्विंटल** | | |
| १ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | ३५७५.०० |
| २ | मे.कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ३३६९.०० |
| ३ | मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड | | ३३७२.०० |
| ४ | **<u>मे.संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड</u>** | | **<u>३३४१.००</u>** |
| **५** | **हरबरादाळ (बिगरपॉलीश, वाळलेली) मागणी ५००० क्विंटल** | | |
| १ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | ४०२०.०० |
| २ | मे.निकी अॅग्रो प्रॉडक्टस लि. जळगांव | | ४२५१.०० |
| ३ | मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड | | ३७९२.०० |
| ४ | **<u>मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड</u>** | | **<u>३६४०.००</u>** |
| ५ | मे.संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ३६९९.०० |
| **६** | **तुरदाळ (बिगरपॉलीश, वाळलेली) मागणी १२५० क्विंटल** | | |
| १ | मे.आर.मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद | | ६७००.०० |
| २ | **<u>मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव</u>** | | **<u>६४०१.००</u>** |
| ३ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | ६७६७.०० |
| ४ | मे.महावीर प्रोव्हीजन स्टोअर्स, नाशिक | | ६८५०.०० |
| ५ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | ७४००.०० |
| **७** | **मुगदाळ (बिगरपॉलशी, वाळलेली) मागणी १२५ क्विंटल** | | |
| १ | मे.आशिर्वाद ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | | ८७५५.०० |
| २ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | ७६९०.०० |
| ३ | **<u>मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक</u>** | | **<u>७४५०.००</u>** |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | **वाटाणा (हिरवा, इम्पोर्टेड) मागणी ३५० क्विंटल** | | |
| १ | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | | ४३४१.०० |
| २ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | ४२८६.०० |
| ३ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | ४८६०.०० |
| ४ | मे.संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ४२३२.०० |
| ५ | **मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे** | | **४२१०.००** |
| ९ | **मुग आख्खा, मागणी ५७५ क्विंटल** | | |
| १ | मे.निकी अॅग्रो प्रॉडक्टस लि. जळगांव | | ६९५०.०० |
| २ | मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे | | ७१९५.०० |
| ३ | **मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड** | | **६९००.००** |
| ४ | मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | | ८०५०.०० |
| १० | **मसुर आख्खा, मागणी १५० क्विंटल** | | |
| १ | मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड | | ६५१९.०० |
| २ | **मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड** | | **६३२५.००** |
| ३ | मे.संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ६५७५.०० |
| ४ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | ६५९०.०० |
| ५ | मे.आशिर्वाद ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | | ६८५५.०० |
| ११ | **मठदाळ, वाळलेली, मागणी ३६ क्विंटल** | | |
| १ | **मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव** | | **७०००.००** |
| २ | मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे | | ८५००.०० |
| ३ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | ७८००.०० |
| ४ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | ८६००.०० |
| १२ | **मठ, मागणी ५५० क्विंटल** | | |
| १ | **मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड** | | **५४११.००** |
| २ | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | | ५५०१.०० |
| ३ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | ६६९०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | मे.संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ५८७१.०० |
| ५ | मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे | | ५९९४.०० |
| **१३** | **रवा, मध्यम, मागणी ३२५ क्विंटल** | | |
| १ | मे.महावीर प्रोव्हीजन स्टोअर्स, नाशिक | | २११५.०० |
| २ | मे.आशिर्वाद ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | | २३१०.०० |
| ३ | **मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक** | - | **२०९७.००** |
| ४ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | २२६८.०० |
| ५ | मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे | | २५००.०० |
| **१४** | **मैदा, मागणी ३५० क्विंटल** | | |
| १ | मे.आशिर्वाद ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | | २३१०.०० |
| २ | **मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक** | - | **२०४५.००** |
| ३ | मे.महावीर प्रोव्हीजन स्टोअर्स, नाशिक | | २०६५.०० |
| ४ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | २१६०.०० |
| **१५** | **गुळ (कोल्हापुरी, तांबडा) मागणी २०० क्विंटल** | | |
| १ | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | | ३५००.०० |
| २ | **मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड** | - | **३१८०.००** |
| ३ | मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे | | ३७४९.०० |
| **१६** | **शेंगदाणा (वाळलेला, बोल्ड), मागणी २५० क्विंटल** | | |
| १ | **मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड** | - | **८२७५.००** |
| २ | मे.आर.मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद | | ८५००.०० |
| ३ | मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे | | ८४६०.०० |
| **१७** | **साबुदाणा (डबलहत्ती/कॅमल/मिल्कव्हाईट) मागणी १५५ क्विंटल** | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | ८४००.०० |
| २ | मे.आर.मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद | | ८५००.०० |
| ३ | **<u>मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड</u>** | - | **<u>७८४५.००</u>** |
| **१८** | **भगर, मागणी २५ क्विंटल** | | |
| १ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | ८०००.०० |
| २ | मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे | | ७६००.०० |
| ३ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | ७२५०.०० |
| ४ | **<u>मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक</u>** | - | **<u>६३९७.००</u>** |
| **१९** | **खोबरेवाटी (राजापुरी, काळीपाठ, वाळलेली) मागणी १०० क्विंटल** | | |
| १ | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | | २१०००.०० |
| २ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | २४७००.०० |
| ३ | **<u>मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड</u>** | - | **<u>१९१००.००</u>** |
| **२०** | **काजू पाकळी (2 पाकळी, वाळलेली) मागणी १३० क्विंटल** | | |
| १ | **<u>मे.गणेश ड्राय फ्रुटस, पुणे</u>** | - | **<u>४९०००.००</u>** |
| २ | मे.आर.मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद | | ५०८००.०० |
| ३ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | ४९६००.०० |
| ४ | मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे | | ५६७००.०० |
| **२१** | **मगज बी, मागणी १ क्विंटल** | | |
| १ | मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | | २०५००.०० |
| २ | मे.स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगांव | | २४०००.०० |
| ३ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | २०५००.०० |
| ४ | **<u>मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड</u>** | - | **<u>१७८००.००</u>** |
| **२२** | **बदाम बी, मागणी ०.१० क्विंटल** | | |
| १ | **<u>मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक</u>** | - | **<u>७४९००.००</u>** |
| २ | मे.गणेश ड्राय फ्रुटस, पुणे | | ७५०००.०० |
| ३ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | ७८९००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | मे.स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगांव | | ९७२००.०० |
| ५ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | ७९६००.०० |
| **२३** | **खिसमिस (लाल, बदामी), मागणी १३० क्विंटल** | | |
| १ | **मे.गणेश ड्राय फ्रुटस, पुणे** | - | **२८०००.००** |
| २ | मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे | | २९०००.०० |
| ३ | मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | | ३४१००.०० |
| ४ | मे.ए.एस.गंगवाल, शिर्डी | | ३५०००.०० |
| **२४** | **हिरवी विलायची (बोल्ड) मागणी ३८ क्विंटल** | | |
| १ | मे.धर्मपाल सत्यपाल लि., भिवंडी | | ९३४५०.०० |
| २ | **मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे** | - | **९००००.००** |
| ३ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | ९८२००.०० |
| **२५** | **हळद (अखंड, वाळलेली) मागणी ६५ क्विंटल** | | |
| १ | मे.गणेश ड्राय फ्रुटस, पुणे | | १००००.०० |
| २ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | ८५००.०० |
| ३ | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | | ८७००.०० |
| ४ | **मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे** | - | **८१००.००** |
| ५ | मे.आशिर्वाद ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | | ८८५५.०० |
| **२६** | **मिरची (अखंड लाल, देठासह, वाळलेली) मागणी १०० क्विंटल** | | |
| १ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | ८८००.०० |
| २ | **मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड** | - | **७३००.००** |
| ३ | मे.धर्मपाल सत्यपाल लि., भिवंडी | | ७७००.०० |
| ४ | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | | ८१००.०० |
| ५ | मे.आशिर्वाद ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | | ८८५५.०० |
| **२७** | **धने (गावरान अखंड) मागणी ८७ क्विंटल** | | |
| १ | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | | १६०००.०० |
| २ | **मे.धर्मपाल सत्यपाल लि., भिवंडी** | - | **११७००.००** |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | १४८००.०० |
| ४ | मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड | | १३५००.०० |
| **२८** | **जीरे (डायमंड कट) मागणी ३७ क्विंटल** | | |
| १ | मे.स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगांव | | १८५००.०० |
| २ | **मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव** | - | **१२१००.००** |
| ३ | मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे | | १३३००.०० |
| ४ | मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे | | १४७००.०० |
| ५ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | १५१००.०० |
| **२९** | **सुंठ (वाळलेली) मागणी १.७५ क्विंटल** | | |
| १ | मे.धर्मपाल सत्यपाल लि., भिवंडी | | २८०३५.०० |
| २ | मे.स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगांव | | ४४६००.०० |
| ३ | **मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड** | - | **२७८००.००** |
| **३०** | **शहाजिरे, मागणी १ क्विंटल** | | |
| १ | **मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड** | - | **५६४००.००** |
| २ | मे.स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगांव | | ७४५००.०० |
| ३ | मे.धर्मपाल सत्यपाल लि., भिवंडी | | ६९३००.०० |
| **३१** | **मसाला विलायची मागणी १ क्विंटल** | | |
| १ | **मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड** | - | **१३९०००.००** |
| २ | मे.धर्मपाल सत्यपाल लि., भिवंडी | | १४२०६५.०० |
| **३२** | **लवंग मागणी ०.६० क्विंटल** | | |
| १ | मे.गणेश ड्राय फ्रुटस, पुणे | | ९८०००.०० |
| २ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | १०६०००.०० |
| ३ | **मे.धर्मपाल सत्यपाल लि., भिवंडी** | - | **९४२९०.००** |
| **३३** | **दालचीनी मागणी १.२५ क्विंटल** | | |
| १ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | २१५००.०० |
| २ | मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, | | २००००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | पुणे | | |
| ३ | **<u>मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक</u>** | - | **<u>१८७००.००</u>** |
| **३४** | **खसखस मागणी १ क्विंटल** | | |
| १ | **<u>मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड</u>** | - | **<u>४९८००.००</u>** |
| २ | मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | | ५७५००.०० |
| ३ | मे.स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगांव | | ६२१००.०० |
| **३५** | **काळे मिरे मागणी ०.५० क्विंटल** | | |
| १ | मे.गणेश ड्राय फ्रुटस, पुणे | | ७८०००.०० |
| २ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | ७७६००.०० |
| ३ | **<u>मे.धर्मपाल सत्यपाल लि., भिवंडी</u>** | - | **<u>६८०४०.००</u>** |
| **३६** | **नाकेश्वर मागणी १ क्विंटल** | | |
| १ | मे.स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगांव | | १०१५००.०० |
| २ | **<u>मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई</u>** | - | **<u>९३८००.००</u>** |
| **३७** | **तेजपान मागणी १ क्विंटल** | | |
| १ | **<u>मे.धर्मपाल सत्यपाल लि., भिवंडी</u>** | - | **<u>६०९०.००</u>** |
| २ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | ९८००.०० |
| ३ | मे.गणेश ड्राय फ्रुटस, पुणे | | १४०००.०० |
| **३८** | **दगडफुल मागणी ०.६० क्विंटल** | | |
| १ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | ५२०००.०० |
| २ | **<u>मे.गणेश ड्राय फ्रुटस, पुणे</u>** | - | **<u>५००००.००</u>** |
| ३ | मे.स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगांव | | ५१५००.०० |
| **३९** | **चक्रीफुल मागणी १ क्विंटल** | | |
| १ | मे.गणेश ड्राय फ्रुटस, पुणे | | २५०००.०० |
| २ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | २७१००.०० |
| ३ | **<u>मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड</u>** | - | **<u>२१५००.००</u>** |
| **४०** | **जायफळ मागणी ०.१० क्विंटल** | | |
| १ | **<u>मे.गणेश ड्राय फ्रुटस, पुणे</u>** | - | **<u>८६०००.००</u>** |
| २ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | ९४०००.०० |
| ३ | मे.धर्मपाल सत्यपाल लि., भिवंडी | | ९०३००.०० |
| **४१** | **जायपत्री मागणी १ क्विंटल** | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **<u>मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड</u>** | - | **<u>१३३८००.००</u>** |
| २ | मे.धर्मपाल सत्यपाल लि., भिवंडी | | १४७५२५.०० |
| ३ | मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | | १६४५००.०० |
| **४२** | **मोहरी मागणी ३२ क्विंटल** | | |
| १ | **<u>मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव</u>** | - | **<u>५३५१.००</u>** |
| २ | मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे | | ९५००.०० |
| **४३** | **सफेद तीळ मागणी ०.५० क्विंटल** | | |
| १ | मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे | | १६८००.०० |
| २ | मे.स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगांव | | २०४००.०० |
| ३ | **<u>मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड</u>** | - | **<u>१५५००.००</u>** |
| ४ | मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | | १८९००.०० |
| **४४** | **मेथी मागणी ०.७५ क्विंटल** | | |
| १ | **<u>मे.धर्मपाल सत्यपाल लि., भिवंडी</u>** | - | **<u>४०९५.००</u>** |
| २ | मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | | ७३७१.०० |
| ३ | मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे | | - |
| ४ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | ८५००.०० |
| **४५** | **हिंग पावडर (नागछाप, अॅगमार्क) मागणी १० क्विंटल** | | |
| १ | मे.आशिर्वाद ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | | ३१५५५.०० |
| २ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | २९६००.०० |
| ३ | मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | | ३२७००.०० |
| ४ | **<u>मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे</u>** | - | **<u>२३०००.००</u>** |
| **४६** | **खडा हिंग (नागछाप, अॅगमार्क) मागणी ०.५० क्विंटल** | | |
| १ | **<u>मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड</u>** | - | **<u>३१७००.००</u>** |
| **४७** | **बडीशोप मागणी ३ क्विंटल** | | |
| १ | मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | | १९५००.०० |
| २ | **<u>मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई</u>** | - | **<u>१९०००.००</u>** |
| **४८** | **उडीद पापड (लिज्जत) मागणी ५० क्विंटल** | | |
| १ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, | | १९०००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | नाशिक रोड | | |
| २ | मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे | | २१५००.०० |
| ३ | मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक | | १९०००.०० |
| ४ | **मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक** | - | **१८८००.००** |
| **४९** | **कच्चे पोहे मागणी ५ क्विंटल** | | |
| १ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | ३३००.०० |
| २ | **मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक** | - | **३१००.००** |
| ३ | मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे | | ३६००.०० |
| ४ | मे.महावीर प्रोव्हीजन स्टोअर्स, नाशिक | | ३१५०.०० |
| **५०** | **भाजके पोहे मागणी १५ क्विंटल** | | |
| १ | मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक | | ५०००.०० |
| २ | मे.महावीर प्रोव्हीजन स्टोअर्स, नाशिक | | ५०५०.०० |
| ३ | **मे.आशिर्वाद ट्रेडींग कंपनी, अहमदनगर** | - | **४४५५.००** |
| **५१** | **डाळया मागणी ४ क्विंटल** | | |
| १ | मे.आशिर्वाद ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | | ५०५५.०० |
| २ | **मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड** | - | **४९९०.००** |
| ३ | मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | | ५१९१.०० |
| **५२** | **चिंच, फोडलेली मागणी ७ क्विंटल** | | |
| १ | मे.आशिर्वाद ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | | ७७५५.०० |
| २ | मे.फ्लेक्झीपॅक लि.मुंबई | | १०४००.०० |
| ३ | **मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड** | - | **६६००.००** |
| ४ | मे.स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगांव | | ९९००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| **५३** | **आमसुल, ओलसर मागणी १७ क्विंटल** | | |
| १ | मे.स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगांव | | ६५००.०० |
| २ | **मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे** | - | **५२००.००** |
| ३ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | | ६१००.०० |
| **५४** | **खडे मिठ मागणी ३० क्विंटल** | | |
| १ | **मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक** | - | **४३०.००** |
| २ | मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे | | ४५०.०० |
| **५५** | **मिठ फ्रि फलो मागणी ६०० क्विंटल** | | |
| १ | मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक | | ६१०.०० |
| २ | **मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे** | - | **५७०.००** |
| ३ | मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे | | ६५०.०० |
| **५६** | **जीलेबी रंग मागणी १.७५ क्विंटल** | | |
| १ | **मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक** | - | **३३५००.००** |
| **५७** | **सुतळी बारीक थ्री फलाय मागणी २ क्विंटल** | | |
| १ | **मे.स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगांव** | - | **९५००.००** |
| **५८** | **पत्रावळ प्लेन मागणी १,३५,००० नग** | | |
| १ | **मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे** | - | **०.९०** |
| **५९** | **पत्रावळ चार/पाच कप्प्याची, (सिल्वर/पानांची) मागणी १२,५०,००० नग** | | |
| १ | **मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे** | - | **१.८०** |
| **६०** | **द्रोण (सिल्वर कोटेड) मागणी ३०,००० नग** | | |
| १ | **मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे** | - | **०.७०** |
| **६१** | **कुंकू मागणी १ क्विंटल** | | |
| **१** | **मे.ए.एस.गंगवाल, शिर्डी** | - | **६०००.००** |
| २ | मे.स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगांव | | ११०००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६२ | **खाद्येतल (सुर्यफुल, रिफाइंड, अॅगमार्क/FSSAI, १५ कि.ग्रॅ.नवीन डबा पॅकिंग) मागणी २२५० क्विंटल** | | |
| १ | मे.भारत राईस अॅण्ड ऑईल इंडस्ट्रीज, हैद्राबाद | विशालड्रॉप | ८००१.०० |
| २ | **मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक** | **अंबुजा गोल्ड** | **७६००.००** |
| ३ | मे.आर.मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद | किर्ती गोल्ड | ७६७६.१० |
| ६३ | **वनस्पती तुप (जेमिनी/विप्रो/राग, १५ कि.ग्रॅ.नवीन डबा पॅकिंग) मागणी ३०० क्विंटल** | | |
| १ | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | जेमिनी | ७२००.०० |
| २ | **मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक** | **जेमिनी** | **७१७५.००** |
| ३ | मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक | जेमिनी | ७३३३.०० |
| ४ | मे.महावीर प्रोव्हीजन स्टोअर्स, नाशिक | राग | ७३३३.०० |
| ५ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | राग | ७२९५.०० |
| ६४ | **गावरान तुप (गाईचे, अॅगमार्क/FSSAI, १५ कि.ग्रॅ.नवीन डबा पॅकिंग) मागणी ७,००० क्विंटल** | | |
| १ | **मे.अंजता राज प्रोटीन्स प्रा.लि., आग्रा** | **मोहक** | **२७४५०.००** |
| २ | मे.इंदापूर डेअरी अॅण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी | सोनाई | ३१५००.०० |
| ३ | मे.पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई | पंचामृत | २८८७५.०० |
| ६५ | **ग्लासिन/पोस्टर लॅमिनेटेड पेपर पिशवी, साईज ४X६, ७० जी.एस.एम., मागणी ५७.५० क्विंटल** | | |
| १ | मे.स्टार पॅकेजिंग, मुंबई | | १७५००.०० |
| २ | **मे.विशाल प्लॅस्टिक्स, कोल्हापूर** | - | **१५७७०.००** |
| ३ | मे.हरीओम फ्लेक्झीपॅक, कोल्हापूर | | १५८८०.०० |
| ६६ | **ग्लासिन/पोस्टर लॅमिनेटेड पेपर पिशवी, साईज ६X७, ६५ जी.एस.एम., ३ रंगात प्रिंटींग, मोफत लाड्डू पिशवी, मागणी ४०० क्विंटल** | | |
| १ | मे.स्टार पॅकेजिंग, मुंबई | | १४२००.०० |
| २ | **मे.विशाल प्लॅस्टिक्स, कोल्हापूर** | - | **१३८८०.००** |
| ३ | मे.हरीओम फ्लेक्झीपॅक, | | १३८९०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | कोल्हापूर | | |
| **६७** | **ग्लासिन/पोस्टर लॅमिनेटेड पेपर पिशवी, साईज ६X७, ६५ जी.एस.एम., ३ रंगात प्रिंटींग, लाडू पिशवी, मागणी १५० क्विंटल** | | |
| १ | मे.स्टार पॅकेजिंग, मुंबई | | १४२००.०० |
| २ | **मे.विशाल प्लॅस्टिक्स, कोल्हापूर** | - | **१३८८०.००** |
| ३ | मे.हरीओम फ्लेक्झीपॅक, कोल्हापूर | | १३८९०.०० |
| **६८** | **ग्लासिन/पोस्टर लॅमिनेटेड पेपर पिशवी, साईज ८X१०, ७० जी.एस.एम., १ रंगात प्रिंटींग, मागणी १५५ क्विंटल** | | |
| १ | मे.स्टार पॅकेजिंग, मुंबई | | १७५००.०० |
| २ | **मे.विशाल प्लॅस्टिक्स, कोल्हापूर** | - | **१६३२५.००** |
| ३ | मे.हरीओम फ्लेक्झीपॅक, कोल्हापूर | | १६३९०.०० |
| **६९** | **प्लॅस्टिक पिशवी, साईज ८X१०, मागणी १ क्विंटल** | | |
| १ | मे.स्टार पॅकेजिंग, मुंबई | | **१६५००.००** |
| **७०** | **चहा पावडर- डस्ट, (टाटा/ब्रुक बॉण्ड/सपट) मागणी - १०० क्विंटल** | | |
| १ | मे.शैला एंटरप्रायझेस, नाशिक | ब्रुक बॉण्ड ताजा | २३०००.०० |
| २ | **मे.लखमीचंद नेमीचंद ओस्तवाल, पुणे** | **टाटा अग्नी** | **१७२००.००** |
| ३ | **मे.स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगांव** | **टाटा अग्नी** | **१७२००.००** |
| **७१** | **कॉफी फिल्टर (ब्रुक बॉण्ड/कॅफे गोल्ड) मागणी ७.५० क्विंटल** | | |
| १ | **मे.शैला एंटरप्रायझेस, नाशिक** | **ब्रु ग्रीन लेबल** | **२९५००.००** |
| २ | मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे | ब्रु तृप्ती इन्सटंट | ४७५००.०० |
| **७२** | **बिस्कीट - ग्लुकोज छोटा पुडा (पारले/ब्रिटानिया/सनफिस्ट) मागणी ६,००,००० नग** | | |
| १ | मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी | पारले | ३.८७ |
| २ | **मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे** | **ब्रिटानिया** | **३.८५** |
| **७३** | **बिस्कीट - ग्लुकोज मोठा पुडा (पारले/ब्रिटानिया/सनफिस्ट) मागणी १,७५,००० नग** | | |
| १ | **मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी** | **पारले** | **७.७४** |
| २ | मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे | ब्रिटानिया | ७.७५ |
| **७४** | **बिस्कीट- नमकीन लहान पुडा (मोनॅको/टाईमपास/स्नॅकी)** | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | **(पारले/ब्रिटानिया/सनफिस्ट) मागणी २,५०,००० नग** | | |
| १ | मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी | पारले | ३.८२ |
| २ | **मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे** | **ब्रिटानिया** | **३.८०** |
| ७५ | **बिस्कीट - स्नॅक्स लहान पुडा (क्रॅकजॅक/५०-५०/स्विट अॅण्ड सॉल्ट) (पारले/ब्रिटानिया/सनफिस्ट) मागणी २,००,००० नग** | | |
| १ | मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी | पारले | ३.८२ |
| २ | **मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे** | **ब्रिटानिया** | **३.८०** |
| ७६ | **बिस्कीट - मारी लहान पुडा (पारले/ब्रिटानिया/सनफिस्ट) मागणी २,००,००० नग** | | |
| १ | मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी | पारले | ३.८२ |
| २ | **मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे** | **ब्रिटानिया** | **३.८०** |
| ७७ | **पेपर कप (पॉली इथिनील कोटेड, १०० मिली क्षमता) २०० जी.एस.एम. मागणी २०,०००,००० नग** | | |
| १ | **मे.सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद** | - | **०.४१** |
| २ | मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे | | ०.४८ |
| ७८ | **पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर, १ लिटर, आय.एस.आय., मागणी ९,००,००० नग** | | |
| १ | मे.साई अॅग्रो इंडस्ट्रीज, टाकळी | साईगंगा | ५.९० |
| २ | मे.स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव | राजहंस | ५.९० |
| ३ | **मे.पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी** | **साईझिल** | **५.३८** |
| ४ | मे.सुमेरु बेव्हरेजस, पुणे | सुमेरु | ८.४५ |
| ७९ | **पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर, ५०० मिली, आय.एस.आय., मागणी १,६०,००० नग** | | |
| १ | मे.साई अॅग्रो इंडस्ट्रीज, टाकळी | साईगंगा | ४.८० |
| २ | मे.स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव | राजहंस | ४.८० |
| ३ | **मे.पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी** | **साईझिल** | **४.१६** |
| ४ | मे.सुमेरु बेव्हरेजस, पुणे | सुमेरु | ५.२१ |
| ८० | **टोन्ड गाय दुध (होमोनाईज्ड अॅण्ड पाश्चराईज्ड, ३.५फॅट, ८.५ एसएनएफ, ५०० मिली पॅकिंग) मागणी दररोज ४५०० लिटर (दोन वेळेस पुरवठा)** | | |
| १ | **मे.स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव** | **राजहंस** | **३४.५०** |
| २ | मे.श्री स्वामी समर्थ स्वयंरोजगार महिला सेवा सह.संस्था मर्या., नाशिक | डेअरी पॉवर | ३८.०० |

**निर्णय क्र.९२१ यावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**०१. किराणा माल खेरदीकामी उपरोक्तप्रमाणे तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा.**

**०२. ज्या मालासाठी निवड समितीने एक किंवा दोन निविदाधारकांचे नमुने निवडलेले आहेत अथवा ज्या मालासाठी एकाच निविदाधारकाचे दर आलेले आहेत, अशा वेळी आलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**०३. ज्या मालासाठी दोन किंवा अधिक निविदाधारकांचे समान दर आलेले आहेत त्यांना समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**०४. श्री.गणेश ड्रायफुट, पुणे यांनी ई-निविदेमध्ये प्रति क्विंटल ऐवजी प्रती किलोचे दर नजर चुकीने दिलेले होते, तरी त्यांचे प्रती किलोचे दर हे प्रती क्विंटलमध्ये करण्यात येऊन, ते अंतीम समजण्यात यावे.**

**०५. तसेच ज्या निविदाधारकांच्या निविदा नामंजुर झालेल्या आहेत अथवा कोणत्याही मालासाठी पुरवठा आदेश नाही अशा निविदाधारकांना त्यांची बयाणा रक्कम परत करणेत यावी.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२ श्री.अशोक रभाजी औटी, लेखाधिकारी यांचे बदलीबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** श्री पुण्यतिथी उत्सव 2014 निमित्त नियोजन करणेकामी दिनांक 20 सप्टेंबर, 2014 रोजी मा.कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीचे वेळी श्री.अशोक रंभाजी औटी, लेखाधिकारी यांना लेखाशाखेसंबंधात विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे देता आली नाही. तसेच त्यांचे काम असमाधानकारक असल्याने त्यांची बदली करणेबाबत तोंडी निर्देश देणेत आले.

त्यास अनुसरुन व्यवस्थापनाचे व प्रशासकीय कामकाजाचे सोईच्या दृष्टीने श्री.अशोक रभाजी औटी, लेखाधिकारी व श्री साईबाबा हॉस्पिटलकडील श्री.साहेबराव पांडुरंग लंके, वित्त व्यवस्थापक यांची जा.क्र.एसएसएस/ वशी-आस्था/ 3033/ 2014 दि.29/09/2014 अन्वये एकमेकाच्या ऐवजी बदली करण्यात आलेली आहे. बदली झालेल्या कर्मचाऱ्यांपैकी श्री.साहेबराव लंके हे लेखाशाखा विभागाकडे हजर झालेले असून श्री.अशोक रभाजी औटी यांनी तक्रार (युएलपी) क्र.83/2014 अन्वये मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. सदर तक्रार अर्जात प्रामुख्याने खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

लेखाशाखा विभागाकडे मुख्य लेखाधिकारी पदानंतर लेखाधिकारी हे पद आहे. या पदावर तक्रारदार माहे एप्रिल 2014 पासून कार्यरत असुन त्यांची

वेतनश्रेणी रु.15,600/- ते 39,100/- आणि ग्रेड पे रुपये 5,400/- दरमहा आहे. सदरील पद जाब देणार यांचा दिनांक 12/02/2013 चा सामान्य प्रशासन विभाग आदेश पाहता बढतीला पात्र आहे. जाब देणाराकडील हॉस्पीटल विभागाकडील वित्त व्यवस्थापक पद पाहता जाब देणार क्र.4 यांची वेतनश्रेणी रु.9,300/- ते 34,800/- आणि ग्रेड पे रु. 4,400/- दरमहा आहे. जाब देणार यांचा दिनांक 12/02/2013 चा आदेश पाहता हे पद बढतीला पात्र नाही. तक्रारदाराने प्रशासकीय अधिकारी पदावरील बढतीसाठी तक्रार (युएलपी) क्र.219/2013 नुसार मा.न्यायालयाकडे विवाद केलेला आहे. विवाद सध्या अंतरीम आदेशाबाबतच्या अर्जावरील युक्तीवादासाठी आहे. तक्रारदाराची लेखाधिकारी, लेखाशाखा ते वित्त व्यवस्थापक हॉस्पीटल विभाग अशी बदली करण्याविषयक आदेश हा औद्योगिक विवाद अधिनियम 1947 कलम 9 (अ) अनुसूची 4 नुसार बेकायदेशीर बदलात बसणारा आदेश आहे. तक्रारदारास निव्वळ त्यांनी बढतीचा वाद केल्याने कमी वेतनश्रेणीच्या पदावर बढतीला अपात्र पदावर बदलीवर पाठविण्याविषयक आदेश दिनांक 29/09/2014 जाब देणार यांनी काढलेला असून आदेश तक्रारदारावर अद्याप बजावलेला नसुन त्यांस कार्यमुक्त केलेले नाही. सदरील बदली आदेश हा प्रथम दर्शनीय आकसाचा, बेकायदेशीर, पक्षपातीपणाचा अधिकाराचा दुरूपयोग करणारा, सेवाशर्तीत बेकायदेशीर बदल करणारा व सुडबुध्दीचा आहे. आणि त्यामुळे प्रथम दर्शनीय कामगार विषयक अनुचित प्रथांत मोडणारी आहे.

बदली आदेश अद्याप तक्रारदारावर बजावलेला नाही. तक्रारदाराच्याकडे आजही लेखा विभाग, लेखाधिकारी पदाचा कार्यभार आहे. मुळ तक्रारीचा अंतीम निर्णय लागण्यास बराच कालावधी लागणार असल्याने प्रथम दर्शनी पुरावा न्यायाचा समतोल तक्रारदाराच्या बाजुने आहे. बदली आदेश अंमलबजावणी झाल्यास तक्रारदाराचे अपरीमीत कधीही भरुन न येणारे नुकसान होईल. दिनांक 29/09/2014 चा तक्रारदाराच्या विषयी लेखाधिकारी, लेखाशाखा ते वित्त व्यवस्थापक, श्री साईबाबा हॉस्पिटल बदली आदेश मुळ तक्रारीच्या सुनावणीच्या काळात स्थगित केल्याविषयक आदेश करुन तक्रारदार यांना त्यांचे सध्याचे लेखाशाखा विभागाकडे लेखाधिकारी म्हणून तक्रार (युएलपी) क्र.219/2013 चे सुनावणीला अधिन राहुन सेवेत ठेवण्याविषयक आदेश जाब देणार यांना व्हावेत, असे नमूद केलेले आहे.

सदर तक्रारीमध्ये मा.न्यायाधिश औद्योगिक न्यायालयाने दि.३०.०९.२०१४ रोजी खालील आदेश केलेला आहे.

"Heard Adv.Modgekar for urgent issue show cause to refer returning at 9-10-2014 party shall maintain status-quo in the matter."

**ब)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधात लेखाशाखा विभागाचे आस्थापनेवर लेखाधिकारी हे पद मंजुर

असून सदर पदासाठी पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी 6500-10500 (सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबॅण्ड 9300-34800 अधिक ग्रेड पे 4400 मंजुर आहे.

श्री.अशोक रभाजी औटी यांची जा.नं.एसएसएस/वशी-01/9043/1998 दि.12/09/1998 चे आदेशान्वये अतिरिक्त लेखाधिकारी या पदावर वेतनश्रेणी रु.2000-60-2300-EB-75-3200 मध्ये नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर पदावर श्री.औटी यांना सलग 12 वर्ष सेवा झाल्यामुळे सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत कुंठीतता घालविणेसाठी जा.नं.एसएसएस/वशी-01/3009/2012 दि.22/10/2012 व जा.नं.एसएसएस/वशी-01/3019/2013 दि.12/12/2013 चे आदेशान्वये वरिष्ठ वेतनश्रेणी वेतनबॅण्ड रु. 15600-39100 अधिक ग्रेड पे 5400 लागू करण्यात आलेला आहे.

**क)** श्री साईबाबा हॉस्पिटलकडे लेखा विषयक कामासाठी वित्त व्यवस्थापक (फायनान्स मॅनेजर) हे पद मंजुर असून सदर पदासाठी पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी 6500-10500 (सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबॅण्ड 9300-34800 अधिक ग्रेड पे 4400 मंजुर आहे.

श्री.साहेबराव पांडुरंग लंके यांची सुरुवातीस लेखाशाखा विभागाकडे जा.नं.एसएसएस/वशी-01/2693/2003 दि.21 मार्च, 2003 अन्वये वरिष्ठ लेखापाल या पदावर वेतनश्रेणी रु.5500-175-9000 मध्ये नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने जा.नं.एसएसएस/वशी-01/3232/2008 दि.28 ऑक्टोबर, 2008 अन्वये श्री.लंके यांची श्री साईबाबा हॉस्पिटलकडील वित्त व्यवस्थापक (फायनान्स मॅनेजर) या पदावर वेतनश्रेणी रु.6500-10500 सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबॅण्ड 9300-34800 अधिक ग्रेड पे 4400 मध्ये पदोन्नतीने नेमणूक करण्यात आलेली आहे.

उपरोक्त 'ब' व 'क' मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रत्यक्ष वस्तुस्थिती विचारात घेता, मंजुर आकृतीबंधानुसार लेखाशाखा विभागाकडील लेखाधिकारी व श्री साईबाबा हॉस्पिटलकडील वित्त व्यवस्थापक या दोन्ही पदाची मुळची मंजुर वेतनश्रेणी पाचव्या वेतन आयोगानुसार रु. 6500-10500 सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबॅण्ड रु.9300-34800 अधिक ग्रेड पे 4400 ही एकच आहे. तसेच सदर दोन्ही पदाची कामे ही लेखा विषयक असल्याने जबाबदारी व कर्तव्य सारखेच आहे. फक्त श्री.औटी यांना लेखाधिकारी या पदावर सलग 12 वर्ष सेवेचा कालावधी झाल्यामुळे त्यांचे वेतनश्रेणीतील कुंठीतता घालवीणेसाठी त्यांना शासन निर्णयानुसार उच्च वेतनबॅण्ड लागू करण्यात आलेला आहे. तसेच श्री.औटी यांची लेखाधिकारी पदावरुन वित्त व्यवस्थापक या पदावर बदली केल्यामुळे त्यांचे दैनंदिन कामकाजात तसेच त्यांचे सध्याचे वेतनात कोणताही बदल करणेत आलेला नाही.

श्री.लंके यांची वित्त व्यवस्थापक, श्री साईबाबा हॉस्पिटल या पदावरुन लेखाधिकारी या पदावर बदली केल्याने नेमणूक तसेच श्री.औटी यांचे जा.नं.एसएसएस/वशी-01/9043/1998 दि.12/09/1998 चे नेमणूक आदेशात अ.नं.8 मध्ये वरिष्ठ अधिकारी निर्देश देतील त्याप्रमाणे काम करावे लागेल, असे नमूद केलेले आहे.

**ड)** संस्थान आस्थापनेवरील लेखाशाखा विभागाकडील लेखाधिकारी हे पद व संस्थान आस्थापनेवरील श्री साईबाबा हॉस्पिटल या विभागाकडील वित्त व्यवस्थापक हे पद समकक्ष असून या पदांची 6 व्या वेतन आयोगानुसार मंजुर वेतनश्रेणी समान आहे. (वेतनबँण्ड 9300-34800 अधिक ग्रेड पे 4400) यामध्ये केवळ श्री.अशोक रभाजी औटी यांचे एकाच पदावर सलग सेवेत 12 वर्ष पूर्ण झाल्याने त्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना या सेवेतील कुंठीतता घालविणेसाठी राबविणेत आलेल्या योजनेनुसार पदोन्नतीची उच्च वेतनश्रेणी वेतनबँण्ड रु. 15600-39100 अधिक ग्रेड पे 5400 ही दि.21-09-2010 पासून लागू करणेत आली. तथापि, त्यांना कार्यात्मक पदोन्नती देणेत आलेली नाही. श्री.औटी यांनी याबाबत अलाहिदा मा.न्यायालयात दावा दाखल केलेला असून तो न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहे व त्याबाबत कुठलेही आदेश झालेले नाहीत.

याव्यतिरिक्त संस्थान व्यवस्थापनास प्रशासकीय कामकाजाच्या सोयीचे दृष्टीने समकक्ष अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्या करण्याचे स्वायत्त अधिकार असून त्यानुसारच प्रशासकीय मान्यतेनुसार श्री.औटी व श्री.लंके यांच्या आपसात बदल्या करणेत आलेल्या आहेत. याशिवाय श्री.औटी यांचे काम असमाधानकारक आढळलेले आहे. तसेच या बदली आदेशात, संबंधीतांची पदोन्नती / पदावनती झाली आहे असे समजणेत येऊ नये असे स्पष्ट नमुद करणेत आलेले आहे.

याशिवाय सदरच्या आदेशाची अंमलबजावणी त्वरीत करण्यात आली होती. त्याची माहिती श्री.औटी यांना स्पष्टपणे देण्यात आली होती. शिवाय श्री.औटी यांनी आदेशाची प्रत प्रशासनाच्या माहितीच्या अपरोक्ष काढून घेतली असल्यामुळे त्याची माहिती त्यांना होती. ती प्रत त्यांनी दि.३०.०९.२०१४ रोजी मा.औद्योगिक न्यायालयात त्यांचे तक्रारीचे कामी दाखल केलेली आहे. आदेशाची अंमलबजावणी त्वरीत होणार असताना देखील ते जाणूनबुजून बदलीच्या ठिकाणी हजर न होता त्यांनी मा.औद्योगिक न्यायालयात बदलीचा आदेश चूकीचा आहे असे भासवून status-quo चा आदेश मिळविणेसाठी प्रयत्न करुन तसा आदेश मिळविला आहे. मात्र तत्पुर्वी दि.१९.०९.२०१४ चे आदेशा नुसार श्री.लंके हे श्री.औटी यांचे जागी दि.३०.०९.२०१४ रोजी हजर झाले. तांत्रिक दृष्टया श्री.औटी यांचेवर आदेशाची अंमलबजावणी दि.०६.१०.२०१४ रोजीच्या पत्राने करण्यात आली. मात्र एकाच जागेवर दोन कर्मचारी कार्यरतराहू शकत नसल्याने व श्री.औटी यांचे जागेवर श्री.लंके हजर झालेले असल्यामुळे श्री.औटी यांचे हक्कात मिळालेला status-quo चा आदेश अफलधारी (infructuous) झाला

आहे. तशी त्यांना स्पष्ट कल्पना दिली. तरीही श्री.औटी हे हजर न झाल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे गरजेचे वाटते.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, श्री.अशोक रंभाजी औटी, लेखाधिकारी, लेखाशाखा विभाग यांची जा.क्र.एसएसएस/ वशी-आस्था/3033/2014 दि.29/09/2014 चे आदेशान्वये करणेत आलेली बदली नियमानुसार उचित आहे, असे मत आहे. तथापि, श्री.औटी हे अद्याप बदली आदेशास अनुसरुन श्री साईबाबा हॉस्पिटल विभागाकडे बदलीचे ठिकाणी कामावर रुजू/ हजर झालेले नाहीत. तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.अशोक रभाजी औटी, लेखाधिकारी, लेखाशाखा विभाग हे बदलीच्या ठिकाणी रुजू/ हजर झालेले नाहीत, याकरिता त्यांना शिस्तभंग विषयक नोटीस देण्यात यावी व त्यांचेकडून येणारा खुलासा समाधानकारक नसल्यास त्यांची खाते चौकशी करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ कामगार विभाग)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ सोने-चांदी कस लावून तपासणेकामी सराफ (Gold Valuer) यांची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला दक्षिणापेटीव्दारे मिळणा-या व लेखाशाखेत वेळोवेळी देणगी स्वरुपात येणा-या सोने-चांदी वस्तु अलंकाराचा कस लावून तपासणे करणे कामी नेमणूक करणेत आलेल्या सराफांची मुदत संपूष्टात आलेने याकामी नव्याने सराफांची नेमणुक करणेकरीता मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक 26 जून 2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र.550 अन्वये सोने चांदी कस लावून नेमणूक करणेत आलैल्या प्रस्तावित सराफांची (Gold Valuer) मुदत संपूष्टात येत असल्यामुळे संस्थानचे कामकाजात सातत्य रहाणेच्या दृष्टीने नवीन सराफांची नेमणुक होईपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, सोने चांदी कस लावून तपासणेकामी स्थानिक / परिसरातील सरकार मान्य सोने चांदी कस लावणेचे प्रमाणपत्रधारकांकडून विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन त्यांचे मासिक मानधनाचे दर मागवून घेणत यावे असे ठरले होते. त्यानुसार याकामी जनसंपर्क कार्यालयामार्फत जाहिरात देण्यात आलेली असून त्यात याकामी अर्ज करण्याची अंतिम तारीख 30 ऑगष्ट 2014 पर्यंत ठेवण्यात आलेली होती. याकामी 8 दरपत्रके आलली असून ती दिनांक 11 सप्टेंबर 2014 चे सभेत उघडण्यात आली असून निर्णय क्र. 796 नुसार याबाबतचा तपशिलवार तक्ता व्यवस्थापन समितीचे पुढील सभेत अंतिम निर्णयासाठी सादर करावा असे ठरले आहे.

सोने चांदी तपासणीकरणेकामी आलेल्या दरपत्रकांचा सविंस्तर तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला असून त्यातील महत्वाची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | सराफाचे नाव व गांव | कामाचा अनुभव | स्थानिक आहेत नाहीत | अपेक्षित मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| ०1 | श्री ज्वेलर्स, संगमनेर | १६ वर्षे | नाही | आपणास योग्य वाटेल ते |
| ०2 | मे. खरोटे ज्वेलर्स मनमाड | ३० वर्षे | नाही | मासिक रु.5000/- |
| ०3 | श्री गणेश दत्तात्रय नागरे शिर्डी | ११ वर्षे | होय | कॅश काऊंटींगसाठी रू.5000/- सोने-चांदी तपासणे प्रती व्हिजीट रु.100/- |
| ०4 | लक्ष्मी ज्वेलर्स श्रीरामपूर | 4 वर्षे | नाही | रू.24000/- |
| ०5 | श्री योगेश नागरे शिरडी | ------ | होय | रू.101/- |
| ०6 | श्री लक्ष्मी अलंकार शिरडी | 25 वर्षे | होय | रू.151/- |
| 07 | श्री.अविनाश चंद्रकांत बागूल कोपरगांव | 35 वर्षे | नाही | रू.8000/- |
| 08 | श्री मदनराव बाबुराव ढाळे लोणी बु | 25 वर्षे | नाही | शेकडा 10 पैसे |

**विभागाचा अभिप्राय** :- उपरोक्त प्रमाणे प्राप्त दरपत्रकांचा विचार करता अ.नं. 4 लक्ष्मी ज्वेलर्स श्रीरामपूर यांचेवर फौजदारी खटला प्रलबिंत असल्याने ते नेमणुकीस अपात्र आहे. अ.नं.5 श्री योगेश नागरे शिरडी यांना अनुभव नसल्याने ते नेमणुकीस अपात्र आहे. अ.नं. 7 श्री अविनाश चंद्रकात बागुल कोपरगांव यांची दरमहा मानधन रु 8000/- मागणी असून ती इतरांच्या तुलनेत जास्त आहे. व अं.नं. 8 श्री मदनराव बाबुराव ढाळे लोणी यांचे दर वस्तुच्या किंमतीच्या शेकडा 10 पैसे दिले असल्याने मानधन अदा करताना देणगी आलेल्या वस्तुच्या किंमतीवरुन दयावे लागणार असल्याने ते अडचणीचे होणार आहे.

सध्या दक्षिणापेटी मोजणीचे काम आठवडयातून दोन दिवस चालते. यावेळी पेटीत निघणा-या सोने चांदीच्या वस्तु जास्त असल्याने ते तपासणी कामी दोन सराफ येत असून या कामी नेहमी दोन सराफांची आवश्यकता आहे. तसेच देणगीदार साईभक्त सोने चांदीच्या वस्तु देणगी देण्यास समक्ष येतात अशा वेळी त्यांनी आणलेली वस्तुची शुध्दता , वजन व दर स्थानीक सराफाकडून तपासून घेऊन त्याप्रमाणे देणगी पावती करण्यात येते. याकामी सध्या 1 सराफ असून तो उपलब्ध नसलेस साईभक्तांना सदर वस्तुची पावती देणे शक्य होत नसलेने ती वस्तु दानपेटीत टाकणेस भक्तास सांगावे लागते. त्यामुळे साईभक्त

नाराज होतात. याकामी दोन स्थानीक सराफांची नेमणूक केलेस त्यांचे पैकी 1 सराफ उपलब्ध नसलेस दुस-या सराफास बोलावून सदर काम करुन घेता येईल. यामुळे साईभक्तांना लवकर सेवा देता येईल. अशा प्रकारे दक्षिणा पेटी मोजणी कामी 2 व दैनंदिन सोने चांदी देणगी वस्तु तपासणी कामी 2 असे एकूण 4 सराफांची आवश्यकता आहे. याकामी 4 सराफांचे पॅनल तयार करुन आवश्यकतेनुसार त्यांचेकडून कामे करुन घेण्यात येतील.

अ.नं. 01 , 02, 03, 06 हे चार सराफांची नेमणूक करता येईल. त्यापैकी अ.नं. 1 व 2 हे स्थानिक नसल्याने त्यांना दक्षिणपेटी मोजणीच्यावेळी निघणारे सोने चांदी अंलकार तपासणी करता आठवडयातून दोन दिवस बोलविता येईल. तसेच अ.नं. 3 व 6 हे स्थानिक असल्याने साईभक्तांना सोने चांदी वस्तु देणगी देणे असल्यास त्या तपासणी कामी त्या त्या वेळी त्यांना बोलविता येईल. सदर सराफांची नेमणूक 1 वर्षाकरीता असावी. मानधनाबाबत अ.नं. 1 श्री ज्वेलर्स, संगमनेर यांनी संस्थान देईल ते मानधन मान्य आहे असे नमुद केले असून अ.नं. 6 श्री लक्ष्मी अलंकार शिरडी यांनी दरमहा रु 151 मागणी केलेली आहे. तसेच अ.नं.02 मे. खरोटे ज्वेलर्स मनमाड यांनी दरमहा रु 5000/- मागणी केलेली आहे व अ.नं. 03 श्री गणेश दत्तात्रय नागरे शिर्डी यांनी दरमहा रु 5000/- व सोने चांदी वस्तु तपासणी करीता प्रती व्हिजीट रु 100/- मागणी केलेली आहे. हे दोन्ही सराफ गेली पाच वर्षापासून संस्थानकडे समाधानकारक सेवा देत असून त्यांना सध्या दरमहा रु 2500/- मानधन देण्यात येत आहे. तरी अ.नं.1 व 6 यांना दरमहा रु 151/- इतके मानधनावर तसेच अ.नं. 2 व 3 यांनी मागणी केलेले मानधना ऐवजी त्यांना दरमहा 3000/- मानधन मान्य असल्यास त्यांची या मानधनावर नेमणुक करणेबाबत व्यवस्थापन समितीत निर्णय घेता येईल असे वाटते.

तरी संस्थानला 4 सराफांची आवश्यकता असलेने अ.नं. 01, 02, 03, 06 हे चार सराफांची नेमणूक करता येईल त्यापैकी अ.नं. १ व २ हे स्थानिक नसल्याने त्यांना दक्षिणपेटी मोजणीच्यावेळी निघणारे सोने चांदी अंलकार तपासणी करता आठवडयातून दोन दिवस बोलविता येईल. तसेच अ.नं. ३ व ६ हे स्थानिक असल्याने साईभक्तांना सोने चांदी वस्तु देणगी देणे असल्यास त्या तपासणी कामी त्या त्या वेळी त्यांना बोलविता येईल. सदर सराफांची नेमणूक १ वर्षाकरीता असावी. अ.नं. १ व ६ यांना दरमहा रु 151/- इतके मानधनावर तसेच अ.नं. २ व ३ यांनी मागणी केलेले मानधना ऐवजी त्यांना दरमहा 3000/- मानधन मान्य असल्यास त्यांची त्या मानधनावर नेमणुक करणेबाबत व्यवस्थापन समितीत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.९२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**वरील निर्णय क्र.८८६ ते ९२३ सर्वानुमते घेण्यात आले.**

**यानंतर रात्री ०७.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

(स्वाक्षरीत) (स्वाक्षरीत) (स्वाक्षरीत)

(राजेंद्र जाधव) (अनिल कवडे)

(शशिकांत कुलकर्णी)

कार्यकारी अधिकारी जिल्हाधिकारी, अहमदनगर

मुख्य जिल्हा न्यायाधीश

सदस्य सदस्य

अध्यक्ष

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी

व्यवस्था, शिर्डी